आणि **आयर्लंड**, ह्या तिन्ही देशांसंबंधीं कायदे, **इम्पीरियल पार्लमेंटां**त (साम्राजिक पार्लमेंटांत) पसार झालेले आहेत. **पिट्ट** ह्यानें **क्याथलिक्सांना** जे हक्क देऊं म्हणून वचन दिलेलें होतें, ते हक्क देण्यासाठीं एका **आक्टाचा** मसुदा **पार्लमेंटांत पिट्ट** ह्याला आणण्याला परवानगी देणें हें, आपल्या राज्याभिषेकाच्या वेळच्या शपथेला विरुद्ध आहें, असें दुर्दैवानें कोणीं राजाच्या मनांत भरविलें. त्यामुळें एक मोठें क्षत बरें व्हावयाचें राहिलें, आणि आपलें वचन रक्षण करण्याला आपण आपल्या प्रतिष्ठेकरितां बद्ध आहों असें **पिट्ट** ह्याला वाटून, त्याला आपला हुद्दा सोडण्यावांचून दुसरा इलाजच उरला नाहीं.

पिट्ट हा राजीनामा देतो, माहे जान्युअरी १८०१.

त्याच्या राजीनाम्यानें राजाला जो धक्का बसला त्यानें त्याला पुन: थोडावेळ बुद्धिभ्रंश झाला. तेव्हां **पिट्ट** ह्याला अतिशय दु:ख होऊन, त्यानें, **मिस्टर आडिंग्टन** (ह्याला पुढें **लार्ड सिड्मौथ** हा किताब मिळाला) हा पूर्वी **हौस आफ् कामन्सचा स्पीकर** (अध्यक्ष) असून आतां मुख्य प्रधान झालेला होता, त्याला, आपलें साहाय्य करण्याची त्वरा केली. **इंग्लंड** शत्रूंशीं आपली बलानें अतिशय विषमता असून अझून लढतच होतें. परंतु एक अल्पकालिक तह होण्याचा लाग जवळ येऊन ठेपला होता. **सर राल्फ आबरक्रॉंबी** ह्यानें १८०१ त मार्चच्या २१ व्या तारिखेस, **अलेक्झांड्रिया** एथें लढाई झाली तींत **फ्रेंचांचा** पराभव केला; आणि **इंग्लिशांना हिंदुस्तानांतून** नवी फौज येऊन पोहोंचली त्या योगें बळकटी येऊन, त्यांनीं **फ्रेंचांच्या इजिप्टां**तील चट साऱ्या फौजेला आगस्टच्या २७ व्या तारिखेस कलमबंदी करून किंवा कौलानें शरण येणें भाग पाडलें. मध्यावर्धीत,

एप्रिलच्या २ ऱ्या तारिखेस, **नेल्सनानें डेनिश** (डेन लोकांच्या) अरमाराचा **कोपनहेगन** एथें पराभव केलेला होता. तेथली लढाई इतकी निकराची झाली कीं, **सर हाइड पार्कर हा इंग्लिशांच्या** अरमाराचा अधिपति होता त्यानें माघारी हटण्याविषयीं सर्वत्र दिसण्यासारखा इशारा देखील केला, परंतु **नेल्सन** आपली दुर्बीन आपल्या अंधनेत्राला लावून मोठ्यानें म्हणाला, "मला तो इशारा दिसत नाहीं," आणि तो तसाच जय मिळे तोंपर्यंत लढला. ह्यावेळीं **नपोलियन इंग्लंडावर** हल्ला करण्यासाठीं **बूलोन** एथें जहाजें, बोटी, आणि तराफे खरोखर जमा करीत होता. परंतु **ईजिप्टांत** झालेल्या अनर्थापातांनी अल्पकालिक तह तरी हरप्रयत्न करून करून घेण्याविषयीं **फ्रेंच** लोक प्रवृत्त झाले. त्याप्रमाणें **आमीन** एथें तह होऊन त्यावर १८०२ च्या मार्च महिन्यांत सह्या झाल्या. त्या तहानें, **फ्रान्सानें इटली** देशाचा दक्षिण भाग परत दिला; आणि **इंग्लंडानें सिलोन** (सिंहलद्वीप), आणि **ट्रिनिडाड्** ह्या दोन बेटांखेरीज आपला इतर सर्व नवीन जिंकलेला मुलूख सोडून दिला; आणि **तिसरा एड्वर्ड** ह्याच्या कारकीर्दीपासून **"फ्रान्सचा राजा"** हा किताब **इंग्लिश** राजे धारण करीत आले होते, तो किताब टाकून दिला.

अलेक्झांड्रिया आणि कोपनहेगन एथील लढाया १८०१.

आमीन एथील तह, माहे मार्च, १८०२.

परंतु **नपोलियन** ह्याच्या चळवळ्या महत्त्वाकांक्षेला कोणत्याही तहाच्यानें आवरवलें नसतें. थोड्याच महिन्यांत त्यानें **पीएमोंग** आणि **पार्मा** हीं संस्थानें **फ्रान्सच्या** राज्याला जोडलीं, आणि **स्विट्झर्लंडांत** एक **फ्रेंच** फौज पाठविली; आणि जेव्हां त्यासंबं-

घानें **इंग्लिश सरकारानें** तकरार (कानझाडणी) केली, तेव्हां, **इंग्लंडांत** आश्रय करून राहणाऱ्या **फ्रान्सांतून** पळून गेलेल्या सर्व **फ्रेंच** लोकांना आपल्या देशांतून हाकवून द्या, आणि **फ्रान्साला माल्टा** हें बेट द्या, असें त्यानें त्या **सरकाराला** उलट मागणें केलें. ह्यावरून कांहींतरी हानि किंवा नुकसानी करावी असा त्याचा इरादा होता हें स्पष्ट झालें, म्हणून **इंग्लंडांतील** प्रधानांना युद्ध करणार असें जाहीर करण्यावांचून दुसरी आवडनिवड कांहीं उरलीच नाहीं. ह्यावेळेपासून १८१५ सालापर्यंत **इंग्लंड नपोलियन** ह्याच्याशीं सतत झगड्यांत गुंतलेलें होतें. १८०४ त तो **फ्रान्सचा** सार्वभौम राजा किंवा बादशाहा झाला. तो **फर्स्ट कॉन्सल** झाल्यादिवसापासून त्यानें **फ्रान्सवर** खंबीर किंवा टेकींचा अमल केलेला होता, त्यानें त्याला चांगले कायदे दिलेले होते, आणि त्यानें दंगा आणि बंडाळी सर्व मोडून टाकली होती, त्यामुळें तें पुन: मोठें बलाढ्य राज्य झालें. परंतु तेवढ्यानें तो तृप्त झाला नाहीं. सर्व **यूरोपाचा** स्वामी व्हावें अशी त्याची इच्छा होती, आणि **इंग्लंड** एवढा एकटा एक स्वतंत्र देश असून तो त्याचे सर्व प्रयत्न लटपटवीत होता, त्यामुळें त्याचा चुराडा करावा ही त्याची मुख्य हांव होती. **नपोलियन** एकदा म्हणाला, "आम्हांला सहा तासपर्यंत (इंग्लिश) **चानलचे** मालक होऊं दे, म्हणजे आम्ही साऱ्या पृथ्वीचे मालक झालोंच."

नपोलियन हा फ्रान्सचा सार्वभौम राजा किंवा बादशाहा होऊन इंग्लंडाशीं युद्ध आरंभतो, १८०३–१८१५.

इंग्लंडावर आलेलीं संकटें वाढत गेलीं तसतसें तें शौर्यानें दंड थोपटून उभें राहिलें. **पिट्ट** हा १८०४ त पुन: मुख्य प्रधान झाला; ३००००० लक्षांहूनही ज्यास्त लोक स्वदेशाचें रक्षण कर-

ण्यासाठीं आपखुशीनें शिपायांचें काम करण्यास तयार होऊन त्यांनीं अमलदार वगैरे नेमून आपली संजोग व्यवस्था केली, आणि **नेल्सन** हा **फ्रेंचांच्या** आणि **स्पानिशांच्या** अरमारांचा पाठलाग करण्यासाठीं **वेस्ट इंडिझ** नांवाच्या बेटांकडे जाण्याकरितां एकदम निघाला. मध्यावसरांत **नपोलियनाच्या** हुकुमानें, **इंग्लंडवर** हल्ला करण्यासाठीं, आणि ज्या सपाटतळांच्या बोटींतून तो १००००० एक लक्ष माणसांची फौज **चानलवरून इंग्लंडमध्यें** पाठविण्याची उमेद ठेवीत होता त्या असंख्य बोटींच्या समुदायाचें रक्षण करण्याकरितां तीं अरमारें माघारीं परतलीं होतीं. परंतु सर **राबर्ट काल्डर** ह्यानें **स्पानिशांच्या** अरमाराला **केप फिनिस्टेर** नांवाच्या भूशलाकेच्या बाहेरल्या आंगास गांठलें, आणि त्याला **केडिझ** बंदरांत माघारें हाकवून लावलें; आणि **नेल्सन** हा अतित्वरेनें माघारा आला होता, त्यानें, १८०५ त आक्टोबरच्या २१ व्या तारिखेस, **केप ट्राफल्गार** नांवाच्या भूशलाकेच्या बाहेरल्या आंगास **फ्रेंचांचें** अरमार गांठलें. तेव्हां ज्या लढाईंत त्या प्रतापी नाविक सेनापतीनें आपला देह ठेवला, ती स्मरणांत ठेवण्यालायक लढाई झाली. **"आजच्या दिवशीं प्रत्येक माणसानें आपलें कर्तव्य करावें अशी इंग्लंड प्रतीक्षा करतें,"** ही **नेल्सनाची** विख्यात सूचना, ती लढाई सुरू होण्यापूर्वी जो बावटा उभारला होता त्यावर आपल्या हाताखालच्या शिपायांना केलेली होती, आणि ते शब्द **इंग्लिश** लोकांच्या कानांत सदा घणघणत राहतील. **व्हिक्टरी** (जय) नांवाचें त्याचें जहाज होतें, त्याच्यावरील मजल्यावर बंदुकीच्या एका गोळीनें जखम लागून तो.

नपोलियन इंग्लंडावर स्वारी करण्याविषयीं यत्न करतो, १८०५.

ट्राफल्गारची लढाई, माहे आक्टोबर १८०५.

शूर अरमाराचा **अधिपति फ्रेंचांचा** पराभव झाला हें वर्तमान कांनीं पडत होतें तोंच मरण पावला. त्यानें आपलें काम उत्कृष्ट प्रकारें बजावलें होतें, आणि ज्या पुरुषानें त्या आज्ञावाचक साध्या शब्दांचें सर्व जन्मभर पालन केलें होतें, त्याच पुरुषापासून आलेले ते शेवटचे आज्ञावाचक साधे शब्द, हीच, आपल्या देशाला मरण-कालची जी अतिउत्तम म्हणून देणगी त्याच्यानें मागें ठेवली, ती होय.

इंग्लंडानें आपला अतिप्रतापी अरमाराचा अधिपति गमावला, आणि त्याचा अत्यंत विश्वासाचा राजनीतिविशारद पुरुष त्या अधिपतीच्या मागून लवकरच जावा असा योग होता. **पिट्ट** हा **ट्राफल्गार**च्या विजयाचें वर्तमान ऐकण्याला जिवंत होता. परंतु पुढें थोड्याच दिवसांनीं त्याला वाईट खबर पावली. **नपोलियनानें आस्ट्रियाच्या** आणि **रशियाच्या** फौजांचा १८०५ त डिसेंबरच्या २ ऱ्या तारिखेस **व्हिएन्ना** शहरानजीक **ऑस्टर्लिट्झ** एथें चुराडा केला. **वुइल्बरफोर्स** ह्यानें एका ठिकाणीं लिहिलें आहे, "**ऑस्टर्लिट्झानें**" (तेथील लढाईनें) "**पिट्ट** ह्याला ठार मारलें." इमानीपणें आपल्या देशाच्या सेवेला आपलें आयुष्य वाहून अल्पवयांत म्हणजे सत्तेचाळीस वर्षांच्या उमरींत तो १८०६ त जान्युअरीच्या २३ व्या तारिखेस, मरण पावला.

ऑस्टर्लिट्झ एथील लढाई, आणि पिट्ट ह्याचा मृत्यु.

पिट्ट ह्याच्या मृत्यूनंतर, "**धि मिनिस्ट्री आफ् आल धि टालेन्ट्स**" (सर्व बुद्धींचें म्हणजे बुद्धिमान पुरुषांचें प्रधानमंडल) ह्या नांवानें प्रसिद्ध झालेलें, प्रधानमंडल बनलें, त्यांत **लार्ड ग्रेन्व्हिल्ल** हा मुख्य प्रधान असून त्याला **फॉक्स** हा मिळालेला होता. त्या प्रधानमंडलाचें सदा सर्वदा

मिनिस्ट्री आफ् आल धि टालेन्ट्स ह्या नांवाचें प्रधानमंडल होतें, १८०६.

स्मरण राहील, कारण, त्यानें, **पिट्ट** आणि त्याचे दोस्त ज्या एका महत्वाच्या कायद्याकरितां फार दिवसांपासून झगडत होते, तो कायदा पसार केला. तो कायदा **गुलामांच्या व्यापाराची बंदी करण्याविषयीं** होता. **व्हाइट्फील्ड** आणि **वेस्ली** ह्यांच्या धर्मोपदेशांनीं धर्मपरायणतेंत आयुष्य घालविण्याविषयीं पुष्कळांची प्रवृत्ति झालेली होती. त्या धर्मोपदेशांच्या काळापासून मनुष्यप्राण्यांच्या क्लेशांविषयीं किंवा यातनांविषयीं लोकांच्या वृत्ति पूर्वींहून विशेष कोमल होत चालल्या होत्या. १७७३ त **जान हावअर्ड** नांवाच्या एका कळकळीच्या जगन्मित्रानें, **इंग्लंडां**तील भिकार आणि घाणीनें व्यापलेले तुरुंग पाहवयास जाऊन त्यांतील कैद्यांची स्थिति पूर्वींपेक्षां चांगली करण्याविषयीं प्रयत्न करण्यांत आपलें आयुष्य घालविण्याला आरंभ केला; आणि

तुरुंगांची सुधारणा.

मिस्ट्रेस फ्राइ नांवाच्या एका कुलीन स्त्रीनें पुढें चाळीस वर्षांनीं त्याचा कित्ता उचलून तसेंच वर्तन केलें. मध्यावधींत, १७८८ सालीं **वुइल्बरफोर्स**, **टामस क्लार्क्सन**, आणि **झाकरी मकॉले**, ह्या तिघां पुरुषांनीं **आफ्रिकें**तून **दक्षिण अमेरिकें**त हबशी किंवा शिद्दी जातीचे गुलाम नेऊन विकण्याचा व्यापार जारी होता तो मोडण्यासाठीं एक मंडळी स्थापली. हा व्यापार मुख्यत्वेंकरून **इंग्लिश** लोकांच्या हातीं पडलेला होता, आणि त्यांतील जुलुमाचे आणि क्रूरपणाचे प्रकार वर्णन सुद्धां करवत नाहींत इतके अतिभयंकर होते. त्या गरीब शिद्दी लोकांना त्यांच्या घरांतून झडप घालून पकडून नेऊन जहाजाच्या मजल्यांच्या दरम्यान बांधलेल्या घडवंच्यांच्या अरुंद फळ्यांवर मालासारखे खचून दडपून भरीत. वारंवार ते, भूक, तहान, कोंडमारा, आणि सर्व प्रकारचा क्रूरपणा, ह्यांनीं व्याकुळ

होत, आणि त्यांला फक्त वेळोवेळीं शेवटच्या मजल्यावर उघड्या हवेंत नेत, आणि त्यांच्याकडून उड्या मारवून व्यायाम करविण्यासाठीं त्यांना चाबुकांनीं मारीत. जे पशुतुल्य क्रूर मनुष्य त्यांचा व्यापार करीत, ते त्यांना विकण्याकरितां जिवंत ठेवण्यापुरती मात्र काळजी घेत, आणि त्यांतील दुखणेकऱ्यांना निर्दयपणानें ठार मारीत किंवा जहाजावरून समुद्रांत लोटून देत. तथापि ह्या व्यापारापासून इतकें पुष्कळ द्रव्य उत्पन्न होई कीं, **पार्लमेंटां**त सतत वीस वर्षें झगडा चालून, नंतर शेवटीं १८०७ सालीं, कोणाही **इंग्रेजा**ला किंवा **इंग्लिश** जहाजाला विकण्याकरितां गुलाम नेण्याची मनाई करणारा **आक्ट** (कायदा) पसार झाला. **फॉक्स** ह्यानें गुलामांचा व्यापार बंद करण्यासाठीं साऱ्या जन्मभर श्रम केलेले होते, तो, तो कायदा पसार झालेला पाहण्याला वांचला नाहीं. तो १८०६ त सेप्टेंबरच्या ३ ऱ्या तारिखेस मृत्यु पावला. ह्या कायद्यानें जरी गुलामांचा व्यापार बंद झाला, तरी **इंग्लिशां**च्या परदेशीय वसविलेल्या राज्यशाखांतून गुलामगिरी किंवा गुलाम बाळगण्याची वहिवाट बंद झाली नाहीं. ती वहिवाट पुढें अठ्ठावीस वर्षें, म्हणजे १८३४ सालापर्यंत, चालू राहिलेली होती.

गुलामांच्या व्यापाराची बंदी १७७३–१८०७

फॉक्स ह्याचा मृत्यु, १८०६.

इंग्लंड ह्या प्रकारें आपले कायदे सुधरीत असतां **नपोलियन** ह्याचा **इंग्लंड**चा व्यापार नाहींसा करण्याचा उद्योग चालू होता. १८०६ त त्यानें **रशिया** आणि **प्रुशिया** ह्यांच्याशीं दुसरा झगडा केला, त्यांत तो विजयी झाला, आणि **जेना** एथील प्रख्यात लढाईंत त्यानें जय मिळविला. तेव्हां बहुतेक साऱ्या **यूरोपा**चा

तो मालक होऊन बसला. आतां १८०६ त नोव्हेंबरच्या २१ व्या तारिखेस **बर्लिन** एथें, **इंग्लंडां**तील साऱ्या बंदरांची नाकेबंदी केली आहे, ह्यास्तव **यूरोपां**तील कोणत्याही राष्ट्रांतील लोकांनीं **इंग्लंडा**शीं बिलकूल व्यापार करतां कामा नये, अशा मनाईचें आज्ञापत्र त्यानें प्रसिद्ध केलें. हा **ब्रिटिश** व्यापाऱ्यांना जबर धका बसला, आणि **इंग्लंडां**तील प्रधानांनीं, **फ्रान्स** देश आणि त्याचीं दोस्त राज्यें ह्यांच्या बंदरांची नाकेबंदी केली आहे म्हणून जाहीर करून, आणि **नपोलियन डेनिश** लोकांचें अरमार **इंग्लंडा**च्या विरुद्ध कामीं लावणार आहे असें ऐकल्यामुळें १८०७ सालच्या सेप्टेंबर महिन्यांत **कोपनहेगन** एथें तें **डेनिशां**चें अरमार हिरावून घेऊन, त्याचें उसनें फेडलें. ह्या नाकेबंदीनें **युनायटेड स्टेट्स** ह्यांशीं (संयुक्त संस्थानांशीं) मोठा बखेडा उत्पन्न झाला, कारण; त्या संस्थानांचीं **फ्रान्सा**शीं व्यापार करणारीं जहाजें पकडलीं जाण्याला पात्र झालीं. ह्यास्तव, **इंग्लिशां**नीं केलेल्या त्या व्यापाराच्या प्रतिबंधानें, आणि परवानगी न घेतां पळून गेलेले **इंग्लिश** पलटणी लोक वर आहेत कीं काय हें तपासण्यासाठीं त्या संस्थानांच्या जहाजांचा झाडा घेऊं लागले, त्यामुळें चिडून, **ग्रेटब्रिटना**विरुद्ध लढाई करणार असें त्या संस्थानांतील **कान्ग्रेस**नें (प्रतिनिधिमंडलानें) १८१२ त जाहीर केलें, आणि तें युद्ध किंवा वैमनस्य १८१५ सालापर्यंत चालू राहिलें.

बर्लिन एथील आज्ञापत्र, तारीख २१ नोव्हेंबर, १८०६.

मध्यावसरांत, **नपोलियन** हा खुशकीनें सर्वत्र विजयी झालेला होता, आणि बहुतेक **यूरोप**भर तो आपल्या भावांना आणि नातेवाइकांना राजमुकुट (राजांच्या गाद्या) आणि मुलूख देत सुटला. परंतु

त्याच्या गमज्या बंद होण्याचा समय जवळ येऊं लागला होता. १८०८ त **स्पेन** देशच्या राजकुलांत तंटे उत्पन्न होऊन, त्याला त्या देशचें राज्य **जोसेफ बोनापार्ट** ह्याला मिळवून देण्याची संधि मिळाली; इतक्यांत त्यानें **पोर्टुगलवरही** हल्ला केला, तेव्हां तेथील **राजप्रतिनिधि ब्रझिल** देशीं पळून गेला. परंतु त्यानें (नपोलियनानें) यावज्जन्मांतील अति मोठी चूक जी, ती आतां केली.

नपोलियन स्पेनची गादी बळकावतो, आणि पोर्टुगलवर स्वारी करतो, १८०८.

स्पेन देशांतील लोक मोठे अभिमानी असून, त्यांच्यावर केवळ एका आगंतुक साहसी पुरुषाला राजा म्हणून जुलमानें लादल्यामुळें ते संतापले, आणि सर्व देशभर बंड करून उठून त्यांनीं **इंग्लंडाकडे** कुमक मागितली.

हें वृत्त घडण्याच्या थोडे दिवस अगोदर **सर आर्थर वेल्लेस्ली** (ह्याला पुढें **ड्यूक आफ् वेलिंग्टन** हा किताब मिळाला) हा **१८०३** पासून **१८०५** पर्यंत **हिंदुस्तानांतील मराठे** लोकांविरुद्ध युद्ध करून जय मिळवून **इंग्लंडांत** माघारा आलेला होता, आणि त्याला **आयर्लंडचा सेक्रेटरी** नेमलेलें होतें. **जार्ज कान्निंग** नांवाचा एक उदयास येणारा मुतसद्दी पुरुष होता, तो आतां परराष्ट्रसंबंधी सरकारी कामें करणारा प्रधान झालेला होता. त्यानें **स्पेनची** कुमकेकरितां ओरड मनावर घेऊन त्या **स्पानिशांच्या पेनिन्शुलेंत**, म्हणजे द्वीपकल्पांत, **नपोलियन** ह्याला प्रतिकार करून अडविण्याचा निश्चय केला. नंतर एकदम **वेल्लेस्ली** ह्याच्या हुकमतीखालीं एक, व **जनरल सर जान मूर** ह्याच्या हुकमतीखालीं एक, अशा दोन फौजा **पोर्टुगलदेशीं** रवाना केल्या; आणि जें युद्ध **"पेनिन्शुलर वॉर"** (द्वीपकल्पांतील युद्ध) ह्या नांवानें प्रसिद्ध आहे,

पेनिन्शुलर वॉर सुरू होते, १८०८.

त्या युद्धाची सुरवात झाली. दुर्दैवानें पाठविलेली फौज फारच थोडी होती, आणि **वेल्लेस्ली** आणि **मूर** ह्या दोघांना **जिब्राल्टरचा गव्हर्नर** आणि दुसरा एक वरिष्ठ अमलदार ह्यांच्या ताब्यांत दिलेलें होतें. म्हणून जरी **वेल्लेस्लीनें फ्रेंचांचा सेनापति जूनो** ह्यावर १८०८ त आगस्टच्या २१ व्या तारिखेस, **व्हिमाइरो** एथें जय मिळविला, तरी त्याला त्या जयाला अनुसरून पुढें वागणूक करण्याला परवानगी मिळाली नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु **फ्रेंचांशीं** आगस्टच्या ३० व्या तारिखेस **सिन्ट्रा** येथें करारमदार होऊन **वेल्लेस्लीला इंग्लंडास** माघारें बोलावून नेलें.

तेव्हां **सर जान मूर** हा एकटा **पोर्तुगलांत** राहिला. त्याला, पुढें चाल करून **स्पेन** देशांत जाऊन **स्पानिशांच्या** फौजेला मिळण्याचा हुकूम झाला. परंतु तो तिकडे जाऊं लागला असतां, **नपोलियन** स्वतः येऊन, त्या **स्पानिश** फौजेचा सप्पा उडवून, **माड्रिड**वर चाल करून येत आहे, अशी त्याला मार्गांत खबर कळली. **मूर** हा अनुभवी आणि शूर सरदार होता, आणि **नपोलियना**बरोबर ७०००० फौज असून त्याच्याजवळ अवघी २५००० फौज होती, तेव्हां समुद्रकांठीं माघारें हटून जाऊन आपली फौज जहाजांवर परत चढविलीच पाहिजे, त्याशिवाय इलाज नाहीं, ही गोष्ट **मूर**च्या लक्ष्यांत आली. आजवर युद्धांत अतिशय वस्तादगिरीचीं फौजांचीं मागें हटणीं म्हणून जीं लिहिलेलीं असतील त्यांपैकीं त्याचें मागें हटणें एक होतें. **नेपोलियन** आवेशानें पाठीस लागलेला असतां, त्यानें **व्हाइगो** नांवाच्या बंदरची वाट धरली, तेव्हां आपल्या सैन्याला जहाजांवर चढविण्याला तें बंदर सोईचें नाहीं अशी वाटेंत खबर लागतांच, तो

कोरन्ना एथें माघारें हटून झालेली लढाई, १८०९.

गालिशिया नांवाच्या परगण्यांतील **कोरन्ना** नांवाच्या बंदराकडे वळला. तेथें जान्युअरीच्या १० व्या तारिखेस पोहोंचून तो पाहतो, तों त्याला नेण्याकरितां येत असणारें अरमार प्रतिकूळ वाऱ्यानें अटकून राहिल्यामुळें तें येऊन पोहोंचलें नव्हतें, आणि तें १४ व्या तारिखेस पोहोंचलें त्या पूर्वीच **मार्शल** (एक लष्करी हुद्दा) **सूल्ट** ह्याच्या हुकमतीखालीं **फ्रेंचांची** फौज तेथें पोहोंचून हल्ला करण्यासाठीं व्यवस्थेनें रचलेली होती. **फ्रेंचांनीं** १६ व्या तारिखेस मध्यान्हीं लढाई दिली तेव्हां नेटानें आणि टेकीनें **इंग्लिश** त्यांच्याशीं लढले. **फ्रेंचांना** चहूंकडून मागें हटविलें, आणि ३००० **फ्रेंचांना** रणभूमीवर मेलेले टाकून मध्यरात्रीं ती **इंग्लिशांची** सर्व फौज जहाजांवर चढली. परंतु ज्या शूर **इंग्लिश** सेनापतीनें त्या आपल्या फौजेचा बचाव केलेला होता तो सेनापति स्वतः ठार मेला, आणि त्याच्या सरदारभावांनीं त्या आडवळणी किंवा एकांत रणभूमीवर गुपचीपपणें आणि दुःखानें त्याला मूठमाती दिली. **वूल्फ** नांवाच्या कवीनें "**बेरियल आफ् सर जान मूर**" (सरजान **मूर** ह्याला मूठमाती देण्याचा प्रकार) नांवाचें काव्य रचलेलें आहे त्यांत पुढें लिहिलेल्या अर्थाचीं दोन पद्यें आहेत.

सर जान मूर ह्याला मूठमाती दिली तो प्रकार.

आम्हीं त्याचें प्रेत किल्ल्याच्या तटाकडे
त्वरेनें नेलें, तेव्हां एक देखील पडघम
ऐकूं आलें नाहीं, प्रेतसंस्कार-
निमित्त गीतवाद्याचा एकही शब्द किंवा
सूर ऐकूं आला नाहीं. आणि ज्या गर्तेंत
आम्हीं आपल्या वीराला पुरलें त्या गर्ते-

समीप एकाही शिपायानें आपल्या शे-
वटच्या सलामीचा बार काढला नाहीं.

. . . . .

त्या त्याच्या कीर्तीच्या रणापासून
ताजातवाना आणि रक्तबंबाळ
झालेला अशा स्थितींत त्याला उचलून
आम्हीं संथपणानें आणि दुःखानें त्या शव-
गर्तेत त्याला तळीं ठेवलें. आम्हीं
एक ओळ सुद्धां त्या शवगर्तेवर
कोरली नाहीं, आणि एकदेखील दगड
तीवर उभा केला नाहीं; परंतु त्याच्या
कीर्तीसवें त्याला तेथें एकटें सोडून दिलें.

जेव्हां **स्पानिशांच्या** फौजेच्या सत्यनाशाची आणि **मूर** ह्याच्या मागें हटण्याची खबर **इंग्लंडास** पावली, तेव्हां त्या सर्व राष्ट्रांतील लोकांचें बहुतेक धैर्य खचलें; परंतु **कान्निंग** ह्यानें पूर्वीचीहून बळकट फौज जमा करून तीसहवर्तमान **वेल्लेस्लीला** तावडतोब **पोर्टुगलांत** माघारें पाठविलें. ह्या वेळेपासून पुढल्या चार वर्षांमध्यें **नपोलियनाच्या** सर्वोत्तम सेनानायकांना **स्पेन** देशांतून पिटून लावण्याच्या कामांत **वेल्लेस्ली** एकसारखा गुंतलेला होता. तो अझून **नपोलियना**-इतका कीर्तिमान झालेला नव्हता; त्याला सैन्याचा आणि अन्नसामग्रीचा पुरवठा हवा तितका मिळाला नाहीं, आणि आपलें कर्तव्य करण्याच्या लोभाखेरीज दुसरा मोठेपणाविषयीं त्याला लोभ नव्हता. परंतु आपल्या तरफेला न्याय आहे, आणि हा जो जुलूमगार सर्व **यूरोपाला** ग्रासीत होता त्याला आपण परिणामीं जिंकू

वेल्लिंग्टन आणि नपोलियन.

असा त्याला भरवसा होता. तो विचारी आणि आपल्या हाताखालच्या माणसांविषयीं काळजी ठेवणारा असे; परंतु **नपोलियन** बेपरवेपणानें आपल्या माणसांचे प्राण खर्ची घाली. **वेल्लेस्ली** आपल्या फौजेंतील शिपायांना कधींही लोकांना लुटूं देत नसे, इतकेंच नव्हे, परंतु जें सर्व सामानसुमान तो लोकांपासून घेई, त्याची किंमत तो देई. **फ्रेंचांच्या** फौजा जिंकतां येतील ही गोष्ट त्यानें धिमाईनें, पावलामागून पावलानें, प्रत्ययास आणून दिली, आणि ज्या मंत्रबलानें **नपोलियनानें** सर्व राष्ट्रांना भारून अपल्या सत्तेखालीं ठेवलीं होतीं तें मंत्रबल त्यानें ह्या प्रकारें मोडलें.

त्यानें १८०९ त मेच्या १२ व्या तारिखेस **ओपोर्टो** एथें **मार्शल सूल्ट** ह्याचा, आणि जूलईच्या २८ व्या तारिखेस **टालाव्हेरा** एथें **मार्शल व्हिक्टर** ह्याचा, पराभव केला. ह्या दोहों जयांबद्दल त्या **वेल्लेस्लीला** **व्हाइकौंट वेलिंग्टन** ही पदवी दिली. नंतर **पोर्टुगलांत** माघारें जाऊन, त्यानें त्या सालच्या हिवाळ्यांत **टॉरेस व्हेड्रास** ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या किल्लयांच्या विस्त्यात तीन ओळी बांधविल्या. त्यांच्या योगें, जेव्हां १८१० त **मार्शल मास्सेना** ह्याला **इंग्लिशांच्या** फौजेला समुद्रांत पिटाळून लावण्यासाठीं पाठविलें, तेव्हां १८१० त सेप्टेंबरच्या २९ व्या तारिखेस, **बूसाको** एथें पहिल्यानें **वेल्लेस्लीनें** त्याला मागें हटविलें, आणि नंतर, बचावाकरितां बांधलेल्या त्या किल्लयांच्या पहिल्या ओळीसमोर आपण येऊन पडलों, असें त्या **मास्सेनाला** कळून आलें; त्याला त्या ओळींतून तर पार जातां येईना. पुढें, हल्ला करण्याला त्याला मार्गच सांपडेना, आणि त्याच्या फौजेंत अन्नाचा तुटवडा पडला, कारण, **वेलिंग्टनानें**

वेलिंग्टन ह्याचे स्पेनांत मिळविलेले जय, १८०९–१८१३.

मुद्दाम, त्या प्रदेशांतील पिकें व गुरेंढोरें हीं चट सारीं काढून टाकविलीं होतीं. सारांश, दुरून चकमकी झडत त्यांनीं, रोगानें, आणि उपासमारीनें, मास्सेनाचीं एकंदर ४५००० माणसें गमावलीं, आणि त्याला माघारें हटून स्पेन देशांत जाणें भाग आलें. तेथें स्पानियर्ड्स लोक हत्यारबंद लहान लहान टोळ्यांनीं जमले. त्या टोळ्यांना "गेरिल्ला बान्ड्स" (शिस्तीवांचून लढण्याकरितां हत्यारबंद तुटक टोळ्या) असें म्हणत. त्या टोळ्यांनीं जंगलांतून आणि डोंगरांतून फ्रेंचांना उपद्रव देऊन बेजार केलें. तशांत वेल्लिंग्टन, आणि त्याच्या हाताखालचे सरदार, ह्यांनीं एकसारखी पुढें चाल करून जाऊन, एकामागून एक अशा पुष्कळ लढाया जितल्या. ह्या लढायांतील अति विख्यात लढाया म्हटल्या म्हणजे, ह्या होत्या. सिऊडाड रॉड्रीगो आणि बाडाजॉस ह्या नांवांचे किल्ले १८१२ त हल्ला करून घेतले, तेव्हां झालेल्या लढाया; १८१२ आणि १८१३ ह्या दोहों सालांत सालामांका आणि व्हिक्टोरिया एथें झालेल्या लढाया; आणि १८१३ सालच्या हिवाळ्यांत सेन्ट सेबास्चियन ह्या शहराला फार दिवसपर्यंत वेढा घालून तें घेतलें तेव्हां झालेल्या लढाया. तें शहर हस्तगत होतांच स्पेन देशांतील फ्रेंचांच्या अमलाची समाप्ति झाली.

वेल्लिंग्टनाच्या विजयांनीं स्पानियर्ड्स लोक फ्रेंचांच्या अमलापासून मुक्त झाले इतकेंच केवळ नव्हे. त्या विजयांनीं साऱ्या यूरोपांतील राष्ट्रांना, त्यांच्या सर्वसामान्य शत्रूविरुद्ध उठण्याला धैर्य दिलें. नपोलियनाला अझून देश जिकण्याची हांव असल्यामुळें, तो १८१२ त रशियांत कूच करून गेला, आणि बॉरोडीनो एथील भयंकर लढाई १८१२ त सेप्टेंबरच्या ७ व्या तारिखेस होऊन, तो तसाच रगडून मॉस्को एथें गेला, परंतु वेल्लिंग्टनाच्या

टॉरेस व्हेड्रास एथील वर्तनाच्या उदाहरणावरून सावध होऊन, **रशियन्सांनीं** त्या **मास्को** शहराला आग लावली; आणि त्यामुळें **नपोलियनाच्या** शिपायांना खाण्यास अन्न किंवा राहण्यास निवाऱ्याची जागा नाहींशी होऊन, कहारी हिंवाळ्यांत असंख्य मैल बर्फानें आच्छादित भूमीवरून कूच करून माघारें जावें लागलें, आणि त्यांपैकीं हजारोंचे-हजार वाटेंत मृत्युमुखीं पडले. ४००००० लक्ष माणसांपैकीं फक्त २०००० माणसें धर्डी परत गेलीं. **नपोलियनाच्या** फौजेचा संहार झाला; तशांत **रशियन्स** लोक पिछाडीकडून पाठलाग करीत होतेच, आणि **आस्ट्रियन्स** आणि **प्रुशियन्स** लोक, त्याच्या दोहों बाजूंनीं उठले. तेव्हां **फ्रान्स** देशीं त्वरेनें माघारा येऊन, त्यानें नवी फौज जमा केली, आणि ती घेऊन तो परत गेला, आणि त्यानें **लूट्झेन, बौट्झेन,** आणि **ड्रेस्डन,** एथील आणखी तीन लढाया जितल्या. परंतु त्याचे शत्रु त्याला चहूंकडून घेरीत येत होते, आणि **लाइप्झिक** एथें, तीन दिवस लढाई चालून, १८१३ त आक्टोबरच्या १९ व्या तारिखेस त्याचा निस्तूक पराभव झाला. तेव्हां त्याला **ऱ्हाइन** नदीपर्यंत मागें हटत जावें लागलें, आणि १८१४ सालाच्या अवली-मध्यें, त्याच्या शत्रूंच्या त्याला गर्क करून टाकणाऱ्या लक्षावधि फौ-जांशीं तो झपाट्यानें झगडत होता. परंतु जेव्हां शेवटीं त्या विजयी साहाय्यसंकेती दोस्त राजांच्या फौजा १८१४ त मार्चच्या ३१ व्या तारिखेस **पारिसांत** शिरल्या, तेव्हां तो शरण आला, आणि एप्रिलच्या ६ व्या तारिखेस त्यानें राज्यत्याग केला, तेव्हां एप्रिलच्या २८ व्या तारिखेस त्याला देशपार करून **एल्बा** नांवाच्या बेटांत ठेवलें.

रशियन लोक मास्को शहराला आग लावतात, आणि फ्रेंचांना तो देश सोडून माघारें परतावें लागतें, १८१२.

नपोलियनचा राज्यत्याग.

नंतर **सोळाव्या लूई**चा भाऊ ह्याला **अठरावा लूइ** ह्या नांवानें **फ्रान्स**च्या गादीवर बसविलें, कारण, तरुण **डॉफिन** (फ्रान्सच्या राजाचा वडील पुत्र आणि गादीचा वारस ह्याला डाफिन हा किताब असे) ह्याला **सतरावा लूइ** असें म्हणत, तो राज्यक्रांतीच्या समयांत वारला. इतकें झालें तरी, अद्यापि, युद्ध संपलें नव्हतें, त्यांतील आणखी एक लढाई व्हावयाची होती. अकरा महिनेपर्यंत अस्थिर किंवा अनिश्चित अशी स्वस्थता राहून, नंतर **नपोलियन** हा **एल्बा** बेटांतून निसटून पळून आला, **कान** एथें जमिनीवर उतरला, त्याच्या जुन्या सरदार भावांनीं त्याचा चहूंकडे आदरसत्कार केला, आणि तो **पारिस**वर कूच करून येत आहे, ही खबर ऐकून सर्व **यूरोपाला** धडकी बसली. तीन आठवड्यांच्या आंत, तो पुनः सार्वभौम राजा किंवा बादशाहा झाला, आणि **फ्रान्स**चा राजा **अठरावा लूइ** हा पळून गेला. तेव्हां साहाय्यसंकेती दोस्त राजे ह्यांनीं वेळ गमावला नाहीं. **वेलिंग्टन** हा **व्हिएन्ना** एथें **कांग्रेस**, म्हणजे प्रतिनिधींची सभा किंवा मंडल, जमलेलें होतें तेथें गेलेला होता, तो एप्रिलांत **ब्रस्सेल्स** एथें पूर्वींच येऊन दाखल झालेला होता, आणि **इंग्लंड, प्रुशिया, आस्ट्रिया,** आणि **रशिया,** ह्या देशांतून फौजा येऊन **नपोलियनावर** हल्ला करण्यासाठीं एकत्र जमा होत होत्या. ह्यांपैकीं **इंग्लंड** आणि **प्रुशिया** ह्यांची मात्र तयारी होती, आणि त्यांचीं सैन्यें एकत्र होण्याच्या पूर्वीं त्यांपैकीं एकेकाच्या सैन्याला वेगळें वेगळें गांठून त्याचा पराभव करण्याची तो आशा करून होता. तीप्रमाणें, त्यानें जूनच्या १६ व्या तारिखेस, **प्रुशियन्स** ह्यांना **लिग्नी** एथें मागें हटविलें, परंतु त्याच दिवशीं **वेलिंग्टनानें**

नपोलियन एल्बामधून परत येतो, मार्च १८१५.

काट्रब्रा एथें **मार्शल ने** ह्याच्या हल्ल्याचें निवारण करण्यांत यश मिळवून, **ब्रस्सेल्स**पासून नऊ मैलांवर **वाटर्लू** नांवाच्या एका लहानशा खेड्याच्या वरल्याबाजूस **सान झान** नांवाची एक टेंकड्यांची ओळ आहे तीवर तो मजबूत ठाणें धरून राहिला.

जूनच्या १८ व्या तारिखेस, **नपोलियन** आणि **वेलिंग्टन** ह्यांची रुबरू किंवा समोरासमोर पहिल्यानेंच लढाईत गांठ पडली. **वेलिंग्टना**च्या हाताखालीं हुकमतींत वागविण्याला किंवा आधिपत्य करण्याला फारच कठीण अशी फौज होती. त्याचे फार दिवस वहिवाटलेले असे शिपाई हे, बहुतेक सारे **अमेरिकें**तील युद्धाकरितां पाठविलेले होते, त्यामुळें त्याचे **इंग्लिश** शिपाई अल्पवयस्क आणि कच्चे किंवा गैरमाहितगार होते. तशांत त्याच्या फौजेपैकीं अर्धं वांट्याहूनही जास्तीच फौज **नेदर्लंडर्स, हानोव्हीरियन्स, नास्सॉअर्स**, आणि **ब्रन्स्वुइकर्स**, ह्या लोकांची होती. त्याचे साहाय्यसंकेती दोस्त **प्रुशियन्स** हे, त्यांचा सेनापति **ब्लूचेर** ह्यानें दुसऱ्या दिवशीं तिसरे प्रहरीं लवकरच तुम्हांस येऊन मिळतों म्हणून त्याला १७ व्या तारिखेस निरोप पाठविला होता तरी, फारच दूर होते. जेव्हां **नपोलियना**नें १८ व्या तारिखेस भर दोनप्रहरीं लढाई सुरू केली, तेव्हां **वेलिंग्टन** ह्याला, फक्त कुमक येऊन पोहोंचे तोंपर्यंत आपण टिकाव धरूं शकूं, इतकीच उमेद होती. आतां एका भागांत, नंतर दुसऱ्या भागांत, ह्याप्रमाणें वारंवार **फ्रेंचां**च्या घोडदळानें **इंग्लिशां**च्या पायदळाच्या बांधलेल्या अढळ कोटांवर हल्ले केले, आणि त्या कोटांच्या सप्पा उडविणाऱ्या भडिमाराखालीं ते स्वार पटापट पडले. परंतु दिवस गुदरत चालला, आणि बारांवर चार वाजतां ते थकले-भागलेले शिपाई आपल्या दोस्तांची कुमक केव्हां येते म्हणून, व्यर्थ टक लावून वाट पाहत होते. शेवटीं

पांच वाजण्याच्या सुमारास, **फ्रेंच** कोठेंतरी दृष्टीच्या टप्याबाहेर **प्रुशियन्स** ह्यांशीं लढत आहेत असें स्पष्ट दिसून आलें. ते **प्रुशियन्स** लोक शेवटीं एकदाचे येऊन पोहोंचले, आणि संध्याकाळचे

वाटर्लूची लढाई, तारीख १८ जून, १८१५.

सात वाजतां **फ्रेंचांनीं इंग्लिशांच्या** फौजेच्या रांगांवर जिवावर उदार होऊन एक शेवटचा हल्ला केला, आणि नंतर त्यांचा घप्पाघोळ होऊन त्यांनीं पळ काढला. **प्रुशियन्स** लोक ऐन वेळेवर येऊन पोहोंचले, त्या योगें सुदामतपणें एक विख्यात जय झाला. २५००० हजारांहून ज्यास्तीच **फ्रेंच** शिपाई रणांत मरून पडले, आणि **इंग्लिशांचे** देखील १३००० हजार शिपाई गमावले. परंतु तें युद्ध शेवटीं आटपलें. **नपोलियन** त्या लढाईनंतर **पारिस** एथें पळून गेला, आणि त्यानें आपलें राज्य आपल्या पुत्राला सोडून दिलें. नंतर त्यानें फ्रान्सांतून पळून जाण्याविषयीं यत्न केला. परंतु सर्व बंदरांतून रखवाली ठेवलेली पाहून, **राचफोर्ट** नांवाच्या बंदरांत तो, **बेल्लेरोफॉन** नांवाच्या **इंग्लिश** जहाजाचा कप्तान (मालीम) **मेट्लंड** नांवाचा होता, त्याच्या आपण होऊन स्वाधीन झाला. नंतर त्याला **सेन्ट हेलीना** नांवाच्या बेटांत, ह्या वेळीं रखवालीला मजबूत पाहरा ठेवून, अटकेंत ठेवलें. तेथें तो १८२१ त मे महिन्याच्या ५ व्या तारिखेस मरण पावला. **अठरावा लूइ पारिस** एथे माघारा गेला, आणि राज्यक्रांतीची सर्व भीति अगदीं नाहींशी होईतों, पुढलीं तीन वर्षें साहाय्यसंकेती दोस्त राजांनीं **फ्रान्स** देश आपल्या

नपोलियनचा मृत्यु, १८२१.

फौजांनीं व्यापून त्यांत आपला अमल ठेवला होता. त्या दिवसापासून आजपर्यंत जरी **फ्रेंच** व **इंग्लिश** हे लोक परस्परांशीं सुलूख करण्याविषयीं दीर्घकाल यत्न करीत असून त्यांचे यत्न सुफळ झाले

नाहींत, तरी जेव्हां केव्हां ते लढले तेव्हां शत्रु होऊन न लढतां साहाय्यसंकेती दोस्त होऊन लढले आहेत.

जेव्हां तह झाला म्हणून जाहीर केलें, तेव्हां **इंग्लिश** लोक आनंदानें अगदीं वेडे झाल्यासारखे झाले. मागील बारा वर्षे स्वातंत्र्याच्या युद्धांत त्यांनीं भगीरथप्रयत्न केलेले होते, आणि त्या बारांपैकीं शेवटच्या तीन सालांत त्यांचें **युनायटेड् स्टेट्स** (संयुक्त संस्थानें) ह्यांच्याशीं युद्ध चाललें होतें, त्या युद्धांत **कानडा** देश गमावण्याचा धोका बसणार होता, परंतु १८१५ सालच्या अवलीला त्यांनीं नुकताच तह केलेला होता. ज्या देशांत खरोखर युद्ध चालू नव्हतें असा **इंग्लंड** देशच काय तो बहुतकरून एकटा होता, आणि समुद्रावरून माल वाहून नेण्याचा बहुतेक व्यापार **इंग्लंडा**कडेच होता, ह्या कारणांनीं जरी **इंग्लंडांत** व्यापार बऱ्याच आबादींत होता, तरी, जबर कर, धान्याची महागाई, आणि युद्धाची फार दिवसांपासून झिजवणारी चिंता, ह्यांनीं प्रत्येक माणूस अतिशय कसणीस लागलेलें होतें. १८१० त ताळ्यावर येण्याची आशाच उरली नाहीं इतकें राजाला वेड लागलें, आणि तो पुढें पुनः कधींही शुद्धीवर आला नाहीं, म्हणून **प्रिन्स आफ् वेल्स** हा **राजप्रतिनिधि** झाला. **पार्लमेंटाचें** लक्ष्य युद्धप्रकरणांत इतकें अतिशय व्यग्र झालेलें होतें कीं, १८०७ पासून १८०९ पर्यंत **पोर्टलंडचा ड्यूक**, १८०९ पासून १८१२ पर्यंत **मिस्टर पर्सीव्हल**, आणि १८१२ पासून १८२१ पर्यंत **लार्ड लिव्हर्पूल**, असे जे एकामागून एक तीन मुख्य प्रधान झाले, त्यांना उपयोगी सुधारणा करण्याला योगच

पारिसचा तह, १८१५.

प्रिन्स आफ् वेल्स हा राजप्रतिनिधि होतो, १८१०–१८२०.

जमून आला नाहीं. तशांत फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीनें जी दहशत, आणि जो अनिश्चितपणा, उत्पन्न झालेला होता, त्यांनीं लोकांचे सर्व वर्ग एकामेकांविषयीं साशंक झालेले होते. आतां स्वस्थता झाल्यानें जो आनंदाचा ऊत आला होता, तो जिरतांच, सर्व राष्ट्रांतील लोक त्या फार दिवस चाललेल्या युद्धाचे परिणाम अनुभवूं लागले.

राष्ट्रीय कर्ज चौऱ्यांयशीं कोटींपर्यंत वाढलें होतें, आणि त्याचें देशावर जबरदस्त ओझें झालें. जरी १८१९ त एका कायद्याचा खरडा पसार होऊन, त्याच्या आधारानें इंग्लंडच्या ब्यांकेनें द्यावयाचा पैसा पुनः सोन्याच्या नाण्यानें देण्याला आरंभ केला, तरी देशांत अद्यापि कागदाचें नाणें पुष्कळ होतें. फांटा मिळालेले शिपाई आणि दर्यावरदी स्वदेशीं परत आले त्यामुळें उद्योगधंदा नसणाऱ्या लोकांचा समुदाय वाढला. ज्या कारखानदारांनीं युद्धाकरितां लागणारें सामानसुमान व सामग्री पुरविली होती त्यांकडे त्यांच्या मजूरांना आतां काम उरलें नाहीं, आणि विशेष निवांतपणांत चालणारे धंदे ह्यांना निखार ओहट किंवा अतिशय उतार लागला. शेतकरी आणि जमीनदार ह्यांना धान्याची किंमत उतरल्यामुळें दहशत पडून, १८१५ त त्यांनीं एक **कॉर्न-लॉ** म्हणजे धान्याविषयीं कायदा, पार्लमेंटाचें मन वळवून त्याकडून पसार करविला.

जुलमाचा कॉर्न-लॉ (धान्याविषयीं कायदा), १८१५.

त्या कायद्यानें, दर क्वार्टरीं (क्वार्टर म्हणून एक माप आहे) ८० शिलिंगांहून कमी दराचें परदेशीय धान्य देशांत आणण्याची मनाई झाली, आणि तिचा परिणाम असा झाला कीं, १८१६ त जेव्हां सुगी वाईट झाली, तेव्हां दुष्काळ पडला. जिकडेतिकडे दंगे उद्भवले; केंट कौंटींतील शेत-

करी लोकांमध्यें, आणि **इंग्लंड**च्या पश्चिमेकडील भागांतील, आणि **मिडलंड्स,** म्हणजे मध्यप्रदेश, ह्यांतील, दगडी कोळशांच्या खाणींत आणि धातूंच्या खाणींत खपणाऱ्या मजूर लोकांमध्यें दंगे झाले; आणि **नार्टिंग्हमशायरांत लड्डाइट्स** अथवा यंत्रें मोडणारे हे लोक तर ताजा आवेशानें उठले. पुढलीं चार वर्षें फारच आपत्तीचीं झालीं. **वुईक्ली पोलिटिकल रेजिस्टर** (आठवड्याची राज्यप्रकरणी नोंद) ह्या नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र **वुइलियम काब्बेट्ट** नांवाचा माणूस छापून प्रसिद्ध करीत असे, त्या पत्रानें कारिगर व मजूर लोकांना, **पार्लमेंटाची** सुधारणा झाली म्हणजे त्यांच्या सर्व दुःखांचा परिहार होईल, हा विचार शिकविला. राज्यकारस्थानी मंडळ्या इतक्या पुष्कळ, आणि भयप्रद झाल्या कीं, **सरकारानें हेबियस कार्पस आक्ट** (शरीर हाजीर कर) ह्या नांवाच्या कायद्याचा अमल पुनः थोडे दिवस महकूब केला; आणि **मांचेस्टर** एथें दंगा झाला त्यांत घोडेस्वारांच्या पलटणींतील स्वारांनीं पन्नासांहूनही ज्यास्ती लोकांना जखमा करून मनस्वी घायाळ केलें त्या दंग्यामुळें प्रवृत्त होऊन **पार्लमेंटानें** लोकांच्या स्वातंत्र्याविरुद्ध कडक सहा कायदे पसार केले. ते "**धि सिक्स आक्ट्स**" ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

मांचेस्टर एथील कत्तल आगस्ट, १८१९.

राजप्रतिनिधिही लोकांना फार अप्रिय होता. त्यानें १७८५ त **मिस्ट्रेस्स फिट्झहर्बर्ट** नांवाच्या एक खुबसुरत विधवेशीं लग्न केलेलें होतें, परंतु तें लग्न कायदेशीर नव्हतें, कारण ती स्त्री **रोमन क्याथलिक** होती, आणि १७७१ त पसार झालेल्या "**रॉयल मारिज आक्ट**" (राजकीय लग्नासंबंधी कायदा)

ह्या नांवाच्या कायद्यानें, राजकुलांतील पंचवीस वर्षांच्या उमरीच्या आंतील कोणीही पुरुषाला किंवा स्त्रीला राजाच्या अनुमोदनावांचून लग्न करण्याची मनाई होती. ह्या कारणास्तव त्या **प्रिन्सानें** (राजपुत्रानें) १७९५ त त्या **मिस्ट्रेस्स फिट्झहर्बर्टचा** त्याग केला, आणि **ब्रन्स्वुइकच्या प्रिन्सेस्स** (राजपुत्री) **कारोलाइन** नांवाच्या एका अशिक्षित अनाडी स्त्रीशीं त्यानें विवाह केला. तिच्याशीं लवकरच त्याचा कज्जा झाला. त्या उभयतांचें **प्रिन्सेस्स** (राजपुत्री) **शार्लोट्ट** एवढें एकच मूल होतें. त्या राजपुत्रीवर लोकांचें फार प्रेम होतें. तिनें **साक्स-कोबर्गचा प्रिन्स** (राजपुत्र) **लियोपोल्ड** ह्याच्याशीं विवाह केला. परंतु ती १८१७ त नोव्हेंबरच्या ६ व्या तारिखेस वारली, आणि तिजबरोबर तिचें एकुलतें एक मूलही मरण पावलें. ह्यामुळें गादीला सरळ वारस राहिला नाहीं. पुढील सालीं, जेव्हां राजाच्या पुत्रांपैकीं तिघांनी लग्नें केलीं, तेव्हां त्या तिघांतून **केंटचा ड्यूक** एवढा एकच लोकांना संतोष करणारा होता. त्यानें **प्रिन्सेस्स शार्लोट्ट** हिचा विधुरपति, **लियोपोल्ड**, ह्याच्या बहिणीशीं विवाह केला. त्या दंपत्याला झालेलें एकुलतें एक मूल, आमची हाल्लींची **राणी, अलेक्झान्ड्रिना विक्टोरिया,** हें होतें. तिचें जन्म १८१९ त मे महिन्याच्या २४ व्या तारिखेस झालें. तिचा बाप पुढें आठ महिन्यांनीं वारला.

प्रिन्सेस्स शार्लोट्ट हिचा मृत्यु, १८१७.

राजकीय लग्नें.

आणि आतां **तिसऱ्या जार्जाचें** दीर्घायुष्य समाप्तीजवळ येत चाललें होतें. अंध आणि वेडा झालेल्या त्या गरीब वृद्ध राजावर, त्यानें केलेल्या सर्व चुकांकडे अलक्ष्य करून, लोकांचें अजून

तिसऱ्या जार्जाचा मृत्यु, १८२०.

फार प्रेम होतें, आणि आपल्या वयाच्या ८२ व्या वर्षी, आणि कारकीर्दीच्या ६० व्या वर्षी, जेव्हां तो १८२० त जान्युअरीच्या २९ व्या तारिखेस महानिद्रेप्रत गेला, तेव्हां सर्व राष्ट्रांतील प्रजेला अंतःकरणापासून दुःख झालें. तो तरुण वयांत "सजा होईन" अशा निश्चयानें गादीवर बसला तेव्हांपासून, मोठमोठ्या गोष्टी घडलेल्या होत्या. **अमेरिका** गमावलेली होती; **इंग्लिश सरकारानें हिंदुस्तानचें** राज्य मिळविलेलें होतें; **पिट्ट** ह्यानें गैर वहिवाटी होत्या त्या मोडून सुधारिल्या होत्या, आणि देशाला उंच पायरीला चढविलें होतें; **नपोलियनानें** त्या देशाचा नाश करण्याविषयीं होईल तितका प्रयत्न केलेला होता; आणि **नेल्सन** आणि **वेलिंग्टन** ह्या दोघांनीं त्या देशाला वांचविलेलें होतें. **आयर्लंड** निदान नांवानें तरी **इंग्लंडाशीं** एकरूप किंवा संयुक्त झालेलें होतें, आणि आम्ही उमेद बाळगतों कीं तें एकाद्या दिवशीं अंतःकरणानें देखील त्याच्याशीं एकरूप होईल. **इंग्लिशांनीं** हबशी किंवा शिद्दी गुलामांच्या अपकीर्तिकर व्यापारावर पाणी सोडून हात धुतले होते; आणि **अल्जीयर्स** देशाचा "**डे**," म्हणजे तद्देशीय राजा किंवा राज्याधिकारी, ह्यानें धामधुमीच्या काळांत ज्या **ख्रिस्ती** लोकांना लढाईत पकडून गुलाम केलेलें होतें, त्या सर्वांना, **अल्जीयर्सवर इंग्लिश** आणि **डच** ह्यांनीं १८१६ त कुलुपी गोळ्यांचा भडिमार करून त्या राजाला जेरीस आणून, सोडविलें.

ह्या राज्यसंबंधी गोष्टींबरोबर कुशीला कूस लावून नवीन कृति आणि शोध हीं त्वरेनें वाढत चाललीं होतीं. १८०७ **फुल्टन** आणि **लिव्हिंग्स्टन**, ह्या दोघां **अमेरिकन्सांनीं**, **हड्सन** नदींतून वर **न्यूयार्कापासून आल्बनीपर्यंत** एक जहाज वाफेच्या यंत्रानें चाल-

वीत नेलें, आणि १८१३ त एका वाफेच्या जोरानें चालणाऱ्या, दुसरीं सामान्य जहाजें ओढून नेणाऱ्या, जहाजानें, दोन जहाजें क्लाइड नदीच्या कालव्यांतून ओढीत नेलीं. वाफेनें चालणाऱ्या गाड्या (आगगाड्या) करण्याविषयींही यत्न झालेला होता, परंतु तो अद्यापि सुफल झालेला नव्हता. व्यापार आणि कारागिरीनें पदार्थ तयार करण्याचे कारखाने, नवीन यंत्रें कृतीनें तयार केलीं व समुद्रावर इंग्लिशांची हुकमत वाढली त्या योगें, अमर्याद वाढले.

शोध आणि कृप्ति.

फ्रान्स देशीं, **लामार्क**, **कुव्हियर**, आणि **लाव्हॉयझे**, ह्यांसारखे, आणि **इंग्लंडांत**, **हर्शेल**, **डेव्ही**, आणि **प्रीस्ट्ली**, ह्यांसारखे, थोर पुरुष, सर्व **यूरोपभर** युद्धाचा कहर उसळला असतां, आपआपल्या निवांत अभ्यासांच्या खोल्यांत पदार्थविज्ञानशास्त्रसंबंधी दिव्य शोध लावीत होते.

एलिझाबेथच्या कारकीर्दीपासून, विद्याग्रंथकलापाच्या संबंधानें ही कारकीर्द म्हटली म्हणजे, अतिप्रतापी युग होय. **आडम स्मिथ** ह्याचा **वेल्थ आफ नेशन्स** (राष्ट्रांची संपत्ति) ह्या नांवाचा ग्रंथ १७७६ त छापून प्रसिद्ध झाला. **राबर्टसन** ह्याचे **स्काट्लंडचा**, **बादशाहा पांचवा चार्लस** ह्याचा, आणि **अमेरिकेचा**, हे तीन इतिहास १७५९ आणि १७७७ ह्या दोहों सालांच्या दरम्यान लिहिले गेले, आणि **गिब्बनचा डिक्लाइन आंड फॉल आफ धि रोमन एम्पायर** (रोमन बादशाही राज्याचा अपकर्ष आणि अधःपात) ह्या नांवाचा विख्यात ग्रंथ १७७६ पासून १७८७ पर्यंत छापून प्रसिद्ध झाला. महाप्रतापी **साम्युएल जॉन्सन** (ह्याची आयुर्मर्यादा १७०९–१७८४) हा जि-

विद्याग्रंथकलाप.

भेनें तिखट परंतु अंतःकरणानें कोमल होता, त्यानें आपला बृहत्कोश **दुसऱ्या जार्जा**च्या कारकीर्दींत छापून प्रसिद्ध केला, तथापि तो **गोल्ड्स्मिथ**च्या मृत्यूबद्दल शोक करण्याला वांचला. **गोल्ड्स्मिथ**ची आयुर्मर्यादा १७२८ पासून १७७४ पर्यंत होती. त्यानें आपले **व्हिकार आफ वेक्फील्ड** (वेक्फील्ड गांवचा पुरोहिताचा प्रतिनिधि), **डिझर्टेड व्हिलेज** (उद्वस्त किंवा त्यागिलेलें खेडें), आणि इतर ग्रंथ, हे सर्व **तिसऱ्या जार्जा**च्या कारकीर्दींत लिहिले. नाटकांमध्यें **गोल्ड्स्मिथ**चें **शी स्टूप्स टु कॉन्कर** (ती जिंकण्यासाठीं लीनता धरते) ह्या नांवचें, किंवा **शेरिडन** ह्याचीं **राइव्हल्स** (प्रतिस्पर्धी) ह्या नांवाचें, आणि **स्कूल फॉर स्कान्डल** (अपवादशिक्षणशाळा) ह्या नांवाचें, ह्या हास्यरसप्रधान किंवा सुखपरिणामक नाटकांहून तज्जातीय विशेष मनोहर नाटकें आपणांला कधींही सांपडणार नाहींत. आणखी ह्या आणि ह्यांहून विशेष गंभीर नाटकांचे प्रयोग करून दाखविण्याला, नट किंवा सोंगाडी ह्यांचीही उणीव नव्हती, कारण **गारिक, फूट, केंबल,** आणि **मिस्ट्रेस सिड्डॉन्स,** हीं नाटकीमाणसें ह्या काळांतलींच होतीं. ह्या काळांत अकस्मात् कवींचा ऊत आला ही सर्वांत अतिशय ध्यानांत ठेवण्याजोगी विचित्र गोष्ट आहे. **कूपर, बर्न्स, शेली, कीट्स,** आणि **बैरन,** हे कवि त्या काळांतच नांदले, आणि त्यांनीं काव्यें रचलीं; आणि **कांबेल्ल, कोलिरज्ज, वर्ड्स्वर्थ, साउधी, वाल्टर स्काट्ट,** आणि **टॉम मूर,** हे, **तिसरा जार्ज** वारण्याच्या पूर्वी फार दिवस कवि म्हणून प्रख्याति पावलेले होते. **ब्रिटिश म्यूझियम** ह्या नांवाच्या चमत्कारिक–पदार्थसंग्रहालयाची सुरवात, १७५३ सालीं **सर ह्रान्स स्लोन** ह्यानें मोलवान उपयुक्त पुस्तकांचा संग्रह त्या **म्यूझियम**करितां मागें ठेवला त्यापा-

सून झाली; आणि **दुसरा जार्ज** व **तिसरा जार्ज** ह्यांनीं आपले राजकीय पुस्तकसंग्रह त्या **म्यूझियम**ला दिले, त्यांनीं त्या **म्यूझियम**ची वृद्धि झाली. तेंच **म्यूझियम** सर्व राष्ट्रांतील लोकांना गरज पडेल तेव्हां पाहिजे ते ग्रंथ पाहण्याला एक विशाल ग्रंथसंग्रहालय ह्यापूर्वींच होऊं लागलेलें होतें; आणि कोणी एका **एल्गिन** नांवाच्या गृहस्थानें जमविलेले वर कोरींव काम केलेले संगमरवरी पाषाण आणि त्याच पाषाणाच्या मूर्ति किंवा पुतळे हे राष्ट्रांतील लोकांनीं विकत घेऊन त्या **म्यूझियम**मध्यें १८१७ त ठेवले, त्यांनीं, प्राचीनकाळचीं मूर्ति किंवा पुतळे घडण्याची व दगडावर खोदींव काम करण्याची कला **ब्रिटनां**तील लोकांच्या नजरेस आणली. शेवटीं, **सर जॉशुआ रेनोल्ड्स** आणि **गेन्स्बरो** हे दोघे चितार्‍यांमध्यें, आणि **चान्ट्री** आणि **फ्लाक्समन** हे दोघे मूर्तिकारांमध्यें अग्रगण्य होते. ह्या कलांहून

कला.

कमी योग्यतेच्या परंतु सुंदर अशा कलेंत **जोसैआ वेज्जवूड** हा निष्णात होता. त्यानें **वेज्जवूड-वेर** (भांडीं किंवा सामान) ह्या नांवानें प्रसिद्ध असलेलीं मातीचीं सुंदर भांडीं निर्माण केलीं. त्यांकरितां नमुने **फ्लाक्समन** ह्यानें रेखाटून दिले. जेव्हां **तिसरा जार्ज** मरण पावला, तेव्हां **इंग्लंड**च्या ज्ञानसंबंधी आणि सामाजिक भावी ऊर्जित दशेविषयीं रागरंग, सर्व गोष्टींनीं बरा दिसला. परंतु **पार्लमेंटां**त सुधारणा आणि व्यापारसंबंधी कायद्यांत सुधारणा, ह्या दोन गोष्टींची अझून फारच जरूर किंवा अगत्य राहिलेलें होतें.

प्रकरण २५.

आमच्या कालांतील इतिहास

चौथा जार्ज, १८२०–१८३०. **चौथा वुइलियम**, १८३०–१८३७.

तुमचे आमचे आजे आणि बाप ह्यांना स्मरेल अशा कालावधीला आम्ही आतां येऊन पोहोंचलों आहों. **वाटर्लूच्या** लढाईंत हाजीर असलेले असे लोक आतां खरोखर थोडेच जिवंत राहिलेले आहेत; कारण त्या लढाईंत हाजीर असण्याला योग्य इतक्या उमरीचा, अति लहानांत लहान माणूस घेतला तरी तो हालीं (१८८७ त) जवळ जवळ नव्वद वर्षांच्या वयाचा झाला पाहिजे. परंतु **चौथ्या जार्जाचा** राज्याभिषेकसंस्कार, आणि **कारोलाइन राणीची** चौकशी, पोरवयांत असतांना पाहिलेले असे लोक हालीं पुष्कळ आहेत. ही भाग्यहीन बायको, तिच्या कवडीच्या मोलाच्या नवऱ्यानें हेळसांड केल्यामुळें मागलीं सहा वर्षे परदेशीं राहत होती. आतां जेव्हां राणी ह्या नात्यानें आपलें स्थान स्वीकारावें अशी तिला इच्छा झाली, तेव्हां राजानें तिच्याशीं आपला लग्नसंबंध तोडण्याकरितां एका कायद्याचा खरडा **पार्लमेंटांत** दाखल करण्यास, आपल्या प्रधानांना आज्ञा केली. इनक्यांत तिची चौकशी सुरू होऊन ती पुष्कळ दिवस चालली. तींत तिच्या तरफेचें बचावाचें काम विख्यात वकील **ब्रूम** ह्यानें चालविलें. त्या चौकशीनंतर त्या कायद्याच्या खरड्याचें नांव किंवा वासपूस सोडली. परंतु राजा देवळांतील उपासनेंत **कारोलाइन** राणीचें नांव वाचूं देण्याला परवानगी देईना, आणि जेव्हां तिनें राज्याभिषेकस-

कारोलाइन राणीची चौकशी, १८२०.

मयीं **वेस्टमिन्स्टर आबीं**त प्रवेश करण्याविषयीं प्रयत्न केला तेव्हां तिला माघारें हाकवून दिलें. नंतर थोड्याच दिवसांनीं ती मरण पावली. **इंग्लिश** लोकांना तिची काकळूत येई, त्यांची त्या **जार्ज राजा**वर पूर्वी कधींच झाली नसेल इतकी अप्रीति झाली.

तथापि त्या गोष्टीची फारशी मुजाखा नव्हती, कारण **चौथा जार्ज**, आणि त्याचा भाऊ **चौथा वुइलियम** (ह्यानें जार्जानंतर राज्य केलें), ह्या दोघांनीं देशाच्या राज्यकारभारांत फारशी ढवळाढवळ केली नाहीं. १८२७ त **नाव्हारीनो** एथें, **टर्की** आणि **ईजिप्ट** ह्या दोहोंच्याविरुद्ध **ग्रीक्स** लोकांचा बचाव करण्यासाठीं एक अरमारांची लढाई झाली, ती, आणि **हिंदुस्तान** आणि **आफ्रिका** खंड ह्या दोहोंत कांहीं स्थानिक युद्धें झालीं तीं जमेंत धरलीं नाहींत तर, **वाटर्लू**च्या लढाईपासून सुमारें चाळीस वर्षें **इंग्लंडांत** स्वस्थता होती. ह्या चाळीसांपैकीं पहिलीं सात वर्षें काळजीचीं आणि अविश्वासाचीं होतीं. **फ्रान्स** देशांतील राज्यक्रांति झाल्यापासून, **यूरोपां**तील राजे, आपल्या प्रजा स्वतंत्र राज्यव्यवस्था स्थापन करण्याविषयीं आपणावर जबरी करतील कीं काय म्हणून इतके भ्यालेले होते कीं, **आस्ट्रिया** आणि **रशिया** ह्या देशांचे **बादशाहा**, आणि **प्रुशिया**, **फ्रान्स**, आणि **स्पेन**, ह्या देशांचे राजे, ह्यांनीं, त्यांपैकीं कोणत्याही देशांत बंड करण्याविषयीं प्रयत्न होईल तर त्याचा चुराडा करण्याच्या कामीं एकामेकास कुमक करण्याविषयीं आपआपणांस बांधून घेऊन एक **"होली अल्लायन्स"** (पवित्र एकवळा किंवा कट) नांवाचा कट केला. ह्या कटांतील करारांस अनुसरून, **स्पेन देशांत** झा-

इंग्लंडांत स्वस्थता होते.

होली अल्लायन्स, १८१५.

लेलें बंड **फ्रेंच** फौजेनें, आणि **इटलींत** झालेलें बंड **आस्ट्रियन** फौजेनें, पूर्वीच मोडलेलें होतें; आणि जरी **इंग्लंड** त्या **पवित्र कटांत** सामील झालें नाहीं, तरी, **लार्ड कास्टलरे** (ह्याला पुढें **लार्ड लंडन्डेरी** हा किताब मिळाला) हा त्यासमयीं **परदेशीय** कामासंबंधीं **सेक्रेटरी** होता, तो त्या कटाला मिळण्याला तयार झाला असता, ही गोष्ट आबालवृद्धांस ठाऊक होती; तशांत, १८१९ सालीं पसार केलेले "**सिक्स आक्ट्स**" ह्यांनीं, **इंग्लंडां**-तील **सरकार**ही जुलुमी होईल, अशी लोकांना भीति पडली होती.

चौथा जार्ज हा राजपदारूढ होऊन फक्त एक महिना झाला होता, इतक्यांत, **लार्ड हार्रोबी** ह्याच्या घरीं मेजवानी होणार होती तींत सर्व प्रधानांना दग्यानें ठार मारण्यासाठीं, **थिस्टलवूड** नांवाच्या एका माणसाच्या पुढाइतीखालीं पंचवीस माणसांनीं संगनमत करून कट केला. त्या कटांत सामील असलेल्या लोकांना **एज्वेर** नांवाच्या रस्त्यावर **केटो-स्ट्रीट** नांवाच्या गल्लींतील एका तबेल्यांत पकडले. त्यांपैकी चौघांना देहांत शासन केलें, पांचांना जन्मभर काळ्यापाण्यावर पाठविलें, आणि तेथें तें प्रकरण संपलें.

केटो स्ट्रीट (गल्ली) ह्या नांवाचा कट, ता. २३ फेब्रुअरी १८२०.

परंतु राष्ट्रांतील लोक अस्वस्थचित्त झालेले होते, इतकें त्या प्रकरणावरून निदर्शनास आलें, आणि खरोखरच लोकांना इतकी जबर दहशत पडली होती कीं, व्हिएन्ना एथें एक **कांग्रेस्स** (राष्ट्रांचें प्रतिनिधिमंडल) भरणार होती तिला जाण्यासाठीं निघत असतां १८२२ त जेव्हां **कास्टलरे** ह्याला वेड लागून त्यानें आत्महत्या केली, तेव्हां, त्याच्या मृत्यूनें

कास्टलरे ह्याची आत्महत्या, तारीख १२ आगस्ट १८२२.

एका अरिष्टाचा परिहार झाला असें लोकांना वाटल्यावांचून राहीना. ह्यांत लोकांचा फारसा अपराध नव्हता, कारण, जरी तो कास्टलरे संभावित, कळकळीचा, गृहस्थ होता, तरी, लोकांच्या असंतोषाचें कारण शोधून काढण्याच्या बदली, त्यांना जुलमानें दडपून टाकावें अशी इच्छा करणाऱ्या पुरुषांमध्यें तो प्रमुख होता. त्याच्या मृत्यूबरोबर, राज्यनीतीचें नवीन धोरण सुरू झालें, तें इंग्लंडाला सुखकर झालें.

लार्ड लिव्हर्पूल हा १८१२ पासून सतत मुख्य प्रधान होता. परंतु त्याच्या बरोबर प्रधानकीचीं कामें करणाऱ्या माणसांमध्यें कित्येक फेरफार झालेले होते; आणि आतां १८२२ त राबर्ट पील नांवाचा एका कापसाचें सूत कांतण्याच्या कारखान्याच्या मालकाचा मुलगा, हा होम सेक्रेटरी, म्हणजे मुलकी खात्याचा चिटणीस, झाला. ज्याच्या राज्यकारस्थानानें नपोलियन ह्याचा स्पेन देशीं पराभव झालेला होता त्या कानिंगानें लार्ड लंडन्डेरीची फॉरन सेक्रेटरीची (परराष्ट्र व्यवहारसंबंधी चिटणिसाची) जागा पतकरली आणि ज्यानें ह्यापूर्वींच प्रधानमंडलांतील हलक्या हुद्यांची कामें केलेलीं होतीं, तो वुइलियम हस्किस्सन पुढील सालीं बोर्ड आफ ट्रेडचा (व्यापारसंबंधी कामदार मंडळाचा) प्रेसिडेंट, म्हणजे अध्यक्ष, झाला. हे तिघे पुरुष, जमीनदार लोकांपैकीं नसून, कांहींसे इंग्लंडांतील जो मोठा मध्यस्थित किंवा मध्यम वर्ग म्हणून आहे त्यापैकीं होते, म्हणून त्यांना सुधारणा कोणकोणत्या पाहिजे होत्या हें चांगलें समजत होतें.

कानिंग, पील, आणि हस्किस्सन.

कानिंग हा पिट्ट ह्याचा शागिर्द होता. इतर सर्व गोष्टींच्या पूर्वीं इंग्लंडचें इतर राष्ट्रांशीं साम किंवा सख्य असावा, आणि

परराष्ट्रांपैकीं प्रत्येकानें आपआपली राज्यपद्धति योग्य वाटेल तशी ठेवावी, त्याला इतरां कोणाकडून त्या संबंधानें उपसर्ग लागूं नये, अशी त्याची इच्छा होती. **होली अलायन्स**शीं (पवित्र कटाशीं) कसलाही संबंध ठेवण्याविषयीं त्यानें एकदम नाकारिलें, आणि दुसऱ्या पक्षीं, **ग्रीक्स** लोक त्या समयीं आपणांवरील **टर्किश** लोकांचा अमल उडवून देण्यासाठीं झगडा करीत होते त्यांविषयीं, आणि **दक्षिण अमेरिकें**तील **स्पेन** देशाच्या वसविलेल्या राज्यशाखा, **मेक्सिको, पिरू,** आणि **चिली,** ह्या **स्पेन**च्या अमलापासून स्वतंत्र होण्याविषयीं प्रयत्न करीत होत्या त्यांविषयीं, जरी त्याला कन्हवाळा वाटत होता तरी, तो कोणताही देश आणि त्याचे राज्यकर्ते ह्यांच्या दरम्यान पडण्याला राजी नव्हता.

कानिंग ह्याची परराष्ट्रव्यवहारपद्धति.

परंतु जेव्हां **दक्षिण अमेरिकें**तील लोकांनीं, आपल्या जातीच्या प्रयत्नांनीं आपलें स्वातंत्र्य मिळविलें, तेव्हां तीं स्वतंत्र राज्यें किंवा संस्थानें झालीं म्हणून त्यानें मान्य केलीं, आणि त्या राज्यांत राहण्याकरितां व्यापारसंबंधाचें **ब्रिटिश कॉन्सल्स** (वकील) पाठवून, तीं राज्यें जिंकून परत घेण्यास **स्पेन** देशाला कोणत्याही परकी राष्ट्राला **इंग्लंड** कुमक करूं देणार नाहीं, असें त्यानें जाहीर केलें. पुढें कांहीं वर्षांनीं, म्हणजे १८२६ त, जेव्हां **पोर्टुगल** देशावर हल्ला करण्यासाठीं आमची फौज **स्पेन**च्या फौजेला मिळणार अशी **फ्रें-चांनीं** दहशत घातली, तेव्हां **पोर्टुगीझ** लोकांनीं, आम्हांला कुमक करा असें **कानिंगा**कडे मागणें केलें. त्या समयीं त्यानें तत्काल **पोर्टुगलांत** सैन्य पाठविलें, त्या योगें युद्ध होणार होतें तें थांबलें. ज्या न्यायवासनेनें परमुलुखीं दुर्बलांना आश्रय देण्याविषयीं त्याला प्रवृत्ति झाली, त्याच न्यायवासनेनें प्रवृत्त होऊन, **रोमन क्याथ-**

लिक्स लोकांना त्यांचे हक्क देण्याविषयीं, आणि **वेस्ट इंडिझ** बेटांतील प्लांटर्स, म्हणजे फडकरी, मळेकरी, वसाहती करणारे लोक, ह्यांच्या गुलामांची स्थिति सुधारण्याविषयीं, त्यानें (सिद्धीस गेला नाहीं तरी) प्रयत्न केला.

फौजदारी, किंवा अपराध्यांस शिक्षा करण्याच्या संबंधाच्या, कायद्यांची सुधारणा, १८०८—१८२४.

मधल्या अवसरांत मुलकी खात्याचा **सेक्रेटरी पील** हा इंग्लंडांतील फौजदारी, किंवा अपराध्यांस शिक्षा करण्यासंबंधाचा, कायदा सुधरण्याच्या उद्योगास लागला. हा कायदा भयंकर प्रकारचा कडक होता, कारण त्या कायद्यानें दोनशेंहून एकही कमी नाहीं इतक्या प्रकारच्या वेगळाल्या गुन्ह्यांना (त्यांतून पुष्कळ गुन्हे फारच क्षुल्लक असतांही) मृत्यूची सजा ठरविलेली होती. बनाऊ कागद किंवा लेख करणें किंवा खून करणें ह्या गुन्ह्यांना जशी फांशीची सजा होती, तशी कोणीं पुरुषानें किंवा बायकोनें, एका दुकानांतून एक कापडाचा तुकडा चोरला, किंवा एकाद्या तळ्यांतून एक मासा धरला, तर त्याला किंवा तिला तीच फांशीची सजा होती. ह्याचा परिणाम असा झाला कीं, देहांत शासनांची संख्या फारच प्रचंड होऊं लागली. वीस वीस किंवा त्यांहून ज्यास्ती माणसांच्या एवढ्या मोठ्या दावणीच्या दावणी एका समयीं एका रांगेनें फांशी चढवीत. तशांत दुसऱ्या पक्षीं, पुष्कळ खरे अपराधी असून कसलीच सजा न होतां सुटत, कारण, क्षुल्लक गुन्ह्यांकरितां मृत्यूची सजा होणार म्हणून ज्यूऱ्या वारंवार आरोपी माणसाला अपराधी ठरवीतच नसत. ह्यापूर्वी, १८०८ त **सर साम्युएल रॉमिल्ली** ह्यानें हे अन्यायाचे कायदे पालटण्याविषयीं प्रयत्न केलेला होताच; आणि खिसे कातरण्याच्या गुन्ह्याला फांशीची सजा होती ती त्यानें बंद

करविली होती. त्या **रॉमिल्लीच्या** मृत्यूनंतर **सर जेम्स माकिन्टाश** ह्यानें तें काम हातीं घेतलें. शेवटीं, १८२४ त **पील** ह्यानें, हलक्या प्रतीच्या शंभरांहून ज्यास्तीच गुन्ह्यांना मृत्यूची सजा नाहींशी करण्याविषयीं प्रयत्न केला, तो सुफल झाला, आणि पुढें ते फौजदारी कायदे, थोडे थोडे, असे पूर्वींहून न्यायाचे होत गेले.

परंतु सर्व राष्ट्राच्या कल्याणाकरितां कदाचित् अत्यंत उपयोगी सुधारणा म्हटल्या म्हणजे, **हस्किस्सन** ह्यानें, ज्या कायद्यांनीं देशाचा व्यापार पंगू होत होता, त्या कायद्यांत केलेल्या सुधारणा होत. **क्रॉम्वेल्ल** ह्याचे **नाव्हिगेशन लॉझ,** म्हणजे कोणत्या जहाजांनीं कोणता माल आणावा न्यावा वगैरे गोष्टींविषयीं कायदे (४२१ वें पृष्ठ पहा), अद्यापि अमलांत होते. त्या कायद्यांनीं, माल वाहण्याचा सारा धंदा **इंग्लिश** जहाजांना देऊन, परदेशी जहाजांनीं वाहून आणलेल्या सर्व प्रकारच्या मालांवर जबर जकाती बसविल्या होत्या. ह्या तजविजीनें कांहीं काळपर्यंत उपयोग झाला असेल. परंतु शेवटीं, **इंग्लिश** जहाजें जो माल अन्य देशीं वाहून नेत, त्यावर जबर जकाती बसवून त्या देशांच्या सरकारांनीं उसनें फेडलें. त्यामुळें व्यापाराला मोठा अडथळा झाला. म्हणून १८२३ त, **हस्किस्सन** ह्यानें **"रेसिप्रॉसिटी आफ् ड्यूटिझ"** (करांची किंवा जकातींची परस्पर समता) ह्या नांवाच्या कायद्याचा मसूदा पसार करण्याविषयीं यत्न केला तो सुफल झाला. त्या कायद्यानें परराष्ट्रें त्या त्या राष्ट्रांच्या बंदरांत **इंग्लिश** जहाजें जातील तेव्हां करांच्या किंवा जकातींच्या बाबतींत स्वकीय जहाजांप्रमाणें लेखून त्यांना वर्तवितील तर **इंग्लंडांतील** बंदरांत त्या त्या परराष्ट्रांच्या जहाजांना करांच्या किंवा जकातींच्या बाबतींत **इंग्लिश**

रेसिप्रॉसिटी आफ् ड्यूटिझ ह्या नांवाच्या कायद्याचा मसुदा, १८२३.

जहाजांप्रमाणें लेखून वर्तविलें जाईल असा ठराव झाला. आणखी त्या **हस्किस्सनानें** रेशीम आणि लोंकर ह्यांवरील कर कमी केले, त्यामुळें ते कर रेशीम व लोंकर उत्पन्न करणारे, व त्या दोहोंचें कापड विणविणारे कारखानदार, ह्या उभयतांनाही विशेष न्यायाचे झाले; आणि ज्या कायद्यांनीं मजूरांची किंवा कारिगरांची मजूरी ठरवून देण्याचा माजिस्त्रेटांना अधिकार असे, आणि ज्या कायद्यांनीं काम शोधणाऱ्या मजूरांना किंवा कारिगरांना देशांतल्या वेगळाल्या भागांत प्रवास करून जाण्याची मनाई असे, ते कायदे त्यानें त्याच समयीं रद्द करविले. हे सर्व नवीन कायदे पसार करवितांना त्याला मोठ्या अडचणी आल्या; कारण, व्यापारी, कारखानदार, लोंकर उत्पन्न करणारे, ह्यांनीं, आणि मजूर किंवा कारिगर ह्यांनीं देखील, होणारा फायदा सर्व आपल्या तरफेचा नाहीं म्हणून फार ओरड केली. परंतु परिणामीं, व्यापाऱ्यांना आपला व्यापार दुप्पट वाढला असें अनुभवास आलें, आणि कारिगर किंवा मजूर लोकांना, माजिस्त्रेटाचा प्रतिबंध न उरल्यामुळें, धन्याशीं पहिल्याहून विशेष फायद्याचे करार करतां येऊं लागले, आणि सर्व लोकांना लागतील ते जिन्नस पूर्वीहून वाजवी किंमतीला विकत मिळूं लागले.

व्यापारासंबंधी सुधारणा, १८२४.

परंतु युद्ध संपून **यूरोपांतील** सर्व देशांत स्वस्थता होऊन स्थिरस्थावर होतांच, त्या देशांशीं, आणि मुख्यत्वेंकरून नवीन स्वतंत्र झालेल्या **दक्षिण अमेरिकेंतील** वसविलेल्या **ब्रझिल** आणि **मेक्सिको** ह्या राज्यशाखा, ह्या देशांशीं, एकाएकीं व्यापार वाढून, पहिल्यानें, वर सांगितलेले सुपरिणाम नष्ट झाले. नेहमीप्रमाणें नफा साधावा म्हणून हरएक माणूस उड्या घालूं लागले. भागीदारीनें भांडवल जमवून व्यापार करणाऱ्या कंपन्या (मंडळ्या)

निघाल्या. हरतऱ्हेच्या मूर्खपणाच्या उलाघाली, कारस्थानें, आणि कुलंगडीं, उत्पन्न होऊन त्यांत लोकांनीं पैसे घातले. उदाहरणार्थ **बोनस ऐरीस** एथील जंगली गुरांढोरांचीं दुधें काढून, त्यांपासून लोणी तयार करण्यासाठीं एक गौळणींची कंपनी झाली, आणि तें लोणी तयार करूं लागले तेव्हां तेथील रहिवासी लोकांना त्याची गरज नसल्यामुळें ते त्याकडे ढुंकून सुद्धां पाहीनात. सारांश **साउथ सी बब्बल** (दक्षिण समुद्रांत व्यापार करणारी मंडळी नांवाचा बुडबुडा) ह्या नांवाची मायावी कंपनी मागें झालेली होती तिच्या वेळच्या सारखीं बेताल उलेंढालीं उत्पन्न झालीं. नंतर सुमारें एका वर्षानें त्या अविचाराचा प्रत्याघात किंवा उलट मारा आला. सहा आठवड्यांत साठ आणि सत्तर ह्यांच्या दरम्यान इतक्या पेढ्यांनीं काखा वर करून लोकांचीं देणीं देणें बंद केलें, किंवा दिवाळीं काढलीं, त्यामुळें आपण सर्वस्वी बुडालों अशी जी लोकांत दहशत उत्पन्न झाली, ती केवळ, **सरकारानें** दररोज १५०००० दीड लाख ह्या दरानें नवे **सॉव्हरन्स** (ह्या नांवाचीं सोन्याचीं नाणीं) पाडविण्याची तजवीज करून, व्यापाऱ्यांना त्यांच्या मालांचीं तारणें घेऊन पैका उसनवार देण्याला **इंग्लंडच्या ब्यांकेची** समजूत करून मन वळवून दूर केली. पुढें लागोलाग जी मंदी आली, तिनें मध्यम वर्गातल्या आणि कनिष्ठ वर्गातल्या लोकांवर मोठी आपत्ति गुदरली.

व्यापार एकदम मनस्वी वाढून त्यामुळें उलेंढालीं उत्पन्न झालीं, १८२४.

गरीब लोकांना पुन: उपासमारीची वेळ आली म्हणून त्यांनीं दंगे केले, यंत्रांचा मोडून चकाचूर केला, आणि ते अन्नाकरितां जीव तोडून आक्रोश करूं लागले, ह्यांत कांहीं नवल नव्हतें.

अन्नाची चणचण, १८२५ आणि १८२६.

त्यांचा तो अन्नाकरितां आक्रोश इतका प्रचंड होऊं लागला कीं, शेवटीं सरकारानें, कायद्यानें ठरलेल्यापेक्षां कमी दराचें परदेशीय धान्य देशांत येऊं द्यावें, असा हुकूम दिला. त्या समयीं गोद्यांत परदेशीय धान्याचा पुरवठाही लोकांचें फारसें हित होण्यापुरता नव्हता; परंतु बाहेरचें धान्य येऊन आपत्ति थोडीशी दूर झाली तेवढ्यानेंच, फक्त देशांतले जमीनदार व शेतकरी ह्यांच्या हिताकरितां धान्याची किंमत वाढविण्यासाठीं परदेशीय धान्य देशांत येण्याची बंदी करणें हें किती दुष्टपणाचें किंवा क्रूरपणाचें काम आहे, ही गोष्ट माणसांच्या लक्ष्यांत येऊं लागली. १८२८ सालीं, जेव्हां **हस्किस्सन** हा वसविलेल्या राज्यशाखांकडील **सेक्रेटरी** होता, तेव्हां एक कायदा पसार झाला. त्या कायद्यानें, धान्यावरील जकात किंवा कर त्याची किंमत चढली म्हणजे उतरावा, आणि किंमत उतरली म्हणजे चढावा, असा ठराव केला. त्यामुळें चणचणीच्या दिवसांत खरेदी करीत त्यांच्यावर करांचें ओझें कमी पडूं लागलें. ह्या करांच्या प्रकाराला "**स्लाइडिंग स्केल**" (सरकतें किंवा ढळतें मान) असें म्हणत, आणि धान्याचा व्यापार निष्प्रतिबंध करण्याविषयीं ही पहिली तजवीज होती. तो व्यापार अगदीं करहीन किंवा करमुक्त होण्याला आणखी कंटाळवाणीं अठरा वर्षें लागणार होतीं.

धान्यावर ढळत्या किंवा सरकत्या मानाच्या जकाती, १८२८.

मध्यावधींत, त्या आपत्तीपासून दुसरा एक फार महत्वाचा परिणाम झाला. गरीब लोकांना काम मिळेना आणि अन्नही मिळेना अशी स्थिति झाल्यामुळें स्वदेश त्याग करून वसविलेल्या राज्यशाखांत राहवयास जाण्याला लोकांना मदत करावी असा विचार सरकारच्या मनांत येऊं लागला. ह्या शतकाच्या आरं-

भापासून, स्वदेश त्याग करून **कानडा** देशांत राहवयास जाण्याला भिकाऱ्यांना मदत करण्यासाठीं वेळोवेळीं रकमा देण्यांत आल्या, आणि १८१४ त तसल्या ५००० लोकांना, **केप** (केप आफ् गूड होप) एथें पाठविलें; आणि आतां जेव्हां कामकरी आणि मजूर, देशांत मिळण्याजोगें होतें त्याहून

स्वदेशत्याग करून परदेशीं गरीब लोक राहवयास. जातात, १८२६.

ज्यास्त काम पाहिजे म्हणून ओरड करूं लागले, तेव्हां राज्यशाखांसंबंधी सरकारचें खातें, तें आपलें एक कामच असें समजून, तसल्या लोकांना परदेशीं राहवयास पाठविण्याच्या तजविजीकडे लक्ष्य देऊं लागले. पहिल्यानें त्या तजविजीपासून फारच थोडा कार्यभाग झाला. परंतु त्या प्रकरणीं चौकशी करण्यासाठीं **पार्लमेंटानें** एक कमिटी नेमली, आणि त्यांनीं **पार्लमेंटाला** जो रपोट केला, त्यानें पुष्कळ लोकांना स्वदेशत्याग करून आपल्या खर्चानें परदेशीं राहवयास जाण्याला प्रोत्साहन झालें. १८२६ त १३००० रांइतके लोक, **कानडा, केप** (केप आफ् गूड होप), आणि **आस्ट्रेलिया** एथें निरंतर राहवयास गेले; आणि त्या काळापासून, स्वदेशीं महर्घता ज्या ज्या सालांत झाली त्या त्या सालीं अशा देशत्याग करून परदेशीं राहवयास जाणाऱ्या लोकांची संख्या सदा वाढत गेली. ह्या प्रकारें, समुद्रांच्या पलीकडे **"ग्रेटर ब्रिटन"**, म्हणजे मूळच्याहून मोठें **ब्रिटन,** उत्पन्न होऊन वाढूं लागलें.


आस्ट्रेलियामध्यें न्यू साउथ वेल्स ही आबादान राज्यशाखा ह्या पूर्वीच होऊन राहिलेली होती. १८०३ त **लेफटेनेन्ट मकआर्थर** ह्या नांवाच्या गृहस्थानें, **केप आफ् गूड होप** एथें **मेरीनो शीप,** म्हणजे मूळचीं स्पेन देशांत उत्पन्न झा-

आस्ट्रेलियांतील राज्यशाखांची स्थापना, १८०३–१८३६.

लेलीं नाजूक लोंकरीचीं मेंढरें, विकत घेऊन **न्यू साउथ वेल्सच्या** मोठमोठ्या उघड्या मैदान प्रदेशांत पहिला **"स्क्वाट्टर,"** म्हणजे नव्या मुलुखांत वस्ती करून राहणारा, बनून घरदार करून राहिला. १८१० त **कर्नल माक्वरी** ह्याला काळ्यापाण्यावर पाठविलेल्या गुन्हेगार कैदी लोकांच्या ठाण्याचा **गव्हर्नर** नेमून पाठविलेलें होतें. त्यानें, जे कैदी चांगली आब्रू मिळवितील त्यांना कैदेंतून सोडून द्यावें, हाच त्या ठाण्यांत अमल बसविण्याला उत्तम मार्ग, हें मर्म जाणलें, आणि त्या कैद्यांना **सिड्नी** नांवाच्या ठाण्याभोंवतालचा मुलूख रस्ते बांधवून खुला करण्याच्या कामाला लावलें. १८२२ त जेव्हां तो **इंग्लंडास** माघारा आला, आणि **सर टॉमस ब्रिस्बेन** हा त्याच्या जाग्यावर गेला, तेव्हां स्वेच्छेनें स्वदेशत्याग करून गेलेले पुष्कळ स्वतंत्र लोक त्या नवीन वसविलेल्या राज्यशाखेंत त्या पूर्वींच आपलीं घरेंदारें करून राहिलेले होते. नंतर ते १८२६ सालांतले विपत्तीचे दिवस आले तेव्हां तर, त्या राज्यशाखेंत आणखी शतावधि लोक राहण्याला जाऊन दाटी झाली. नंतर **न्यू साउथ वेल्सच्या** उत्तरेकडील धनत्तर कुरणी जमिनी ह्यांतच पहिल्यानें **ब्रिस्बेन** नांवाच्या काळ्यापाण्याच्या कैद्यांच्या ठाण्याभोंवतीं लोकांची वस्ती झाली; आणि ह्या प्रकारें एक नवी वसविलेली राज्यशाखा निर्माण झाली. १८५९ त जेव्हां **न्यू साउथ वेल्सपासून** ती राज्यशाखा विभागून वेगळी केली तेव्हां तिला **क्कुईन्सलांड** (राणीची भूमि किंवा राणीचा मुलूख) म्हणूं लागले. कांहीं काळानें, **ईस्टर्न आस्ट्रेलिया** (पूर्व आस्ट्रेलिया) ही इतकी आबाद झाली कीं, तेथील लोकांनीं, आम्हीं ह्यापुढें आमच्या वसाहतींत काळ्यापाण्याच्या कैद्यांना घेणार नाहीं, म्हणून साफ सांगितलें. तेव्हां **वेस्टर्न आस्ट्रेलियांत** (पश्चिम आस्ट्रेलियांत)

काळ्यापाण्याच्या कैद्यांना पाठवूं लागले. त्या भागांत १८२९पासून वसाहती होऊं लागल्या होत्या; परंतु गैरव्यवस्थेमुळें त्या वसाहती आबाद झाल्या नाहींत. **चौथ्या जार्जा**च्या कारकीर्दींत **आस्ट्रेलियांत** झालेल्या फक्त ह्याच वसाहती होत्या; शिवाय, **व्हान डीमेन्स लांड** ह्या नांवाचें काळ्यापाण्याच्या कैद्यांना ठेवण्याकरितां ठाणें घातलेलें एक बेट होतें, त्याला आतां **टास्मेनिया** असें म्हणतात, त्या बेटांत स्वतंत्र वसाहत करणारे लोक जाऊन राहूं लागलेले होते. परंतु थोड्या पुढल्या काळाकडे पाहिलें तर, **चौथ्या वुइलियमा**च्या कारकीर्दीच्या अखेरीच्या सुमारास, **साउथ आस्ट्रेलिया** नांवाची नवी वसविलेली राज्यशाखा बनूं लागलेली होती, असें कळतें. त्या राज्यशाखेच्या राजधानीला किंवा मुख्य शहराला **चौथ्या वुइलियमा**च्या राणीच्या नांवावरून **आडिलेड** असें नांव ठेवलें. नंतर १८३५ त **पोर्ट फिलिप** ह्याच्या किनाऱ्यावर जाऊन कांहीं लोकांनीं वसाहत केली, आणि त्यांनीं आपल्या मुख्य शहराला त्या दिवसांत **इंग्लंडांत मेल्बर्न** नांवाचा मुख्य प्रधान होता त्याच्या नांवावरून **मेल्बर्न** असें नांव ठेवलें. १८५१ त ही शेवटची वसविलेली राज्यशाखा **न्यू साउथ वेल्स**पासून विभागून वेगळी केली, आणि हालींच्या **राणी**च्या नांवावरून तिला **व्हिक्टोरिया** असें नांव ठेवलें. १८२६ ह्या आपत्तीच्या सालीं, ह्या राज्यशाखांपैकीं ज्या फार अवलीच्या राज्यशाखा होत्या, त्या अगदीं बालदशेंत होत्या. परंतु त्या सालांतील ती विपत्ति आणि ती हालअपेष्टा ह्यांनींच, जेथें श्रमाचें मुबलग प्रतिफल मिळेल, अशा नव्या मुलखीं जाण्याचें साहस करण्याला हजारों लोक प्रवृत्त झाले.

पुढील सालीं, म्हणजे १८२७ त, **लार्ड लिव्हर्पूल** नांवाचा


नकाशा नं ८
ऑस्ट्रेलेशिया.
वसाहती होत गेल्या त्या अनुक्रमाने रंग दिलेला आहे. गडद रंग ही अगलीच्या वसाहतीचा रखूण समजावी.
न्यू गिनी
विषुववृत्त
पोर्ट डार्विन
पश्चिम ऑस्ट्रेलिया
दक्षिण ऑस्ट्रेलिया
क्वीन्सलांड
न्यू साउथ वेल्स
व्हिक्टोरिया
पर्थ
आल्बनी
ब्रिस्बेन
सिडनी
मेलबर्न
टास्मानिया
होबार्ट
पासिफिक महासागर
फिजी बेटें
न्यू क्यालेडोनिया (फ्रेंच)
नाउमिया
नॉर्फक बेट
नॉर्थ आइलंड
आकलंड
न्यू प्लिमौथ
नेपियर
नेलसन
वेलिंग्टन
होकिटिका
क्राइस्ट चर्च
डनेडिन
साउथ आइलंड
न्यू झीलंड

पंधरा वर्षें मुख्य प्रधान होता, त्याला पक्षघात वायूचा झटका येऊन त्यानें राजीनामा दिला. तो दूरदर्शी, आणि समर्थ पुरुष होता खरा, तथापि तो दिव्य राजकारणी मुतसद्दी नव्हता. त्याच्या जागीं **कान्निंग** हा झाला, तो **इंग्लंडाचें** पुष्कळ हित करील अशी लोकांना आशा होती. परंतु दुर्दैवानें तोही दुखण्यांत पडून १८२७ त आगस्टच्या ८ व्या तारिखेस मरण पावला, आणि तदनंतर थोडे दिवस, **लार्ड गुडरिच** हा मुख्य प्रधान होता, त्यापुढें **ड्यूक आफ् वेलिंग्टन** हा राज्यकारभार कर्त्या प्रधानमंडलाचा प्रमुख झाला.

कान्निंगचा मृत्यु, १८२७.

ही गोष्ट थोडीं वर्षें अगोदर घडली असती, तर देशाचें फार अकल्याण झालें असतें, कारण **वेलिंग्टन** हा राजकारणी मुतसद्दी नसून सेनापति फार चांगला होता, आणि फौजेवर तो अमल करी त्या प्रकारें **पार्लमेंटावर** अमल करणें त्याला गोड वाटलें असतें. परंतु **कान्निंग** मरण पावला होता तथापि, त्यानें स्वातंत्र्य आणि न्याय ह्यांविषयीं हांव मागें जागृत ठेवली होती ती कशानेंही दडपून टाकवली नसती; आणि **वेलिंग्टनाच्या** राज्यकारभारांत, त्याची इच्छा बाजूला ठेवून, दोन महत्वाचे कायदे पसार झाले. त्यांतून पहिल्या कायद्यानें **"टेस्ट आक्ट"** आणि **"कार्पोरेशन आक्ट"** हे दोन कायदे रद्द केले. त्या दोन आक्टांनीं जवळ जवळ दीडशें वर्षें (४४५, ४५९ हीं दोन पृष्ठें पहा) दरसाल मुजरत कायदा पसार केल्याशिवाय, **डिस्सेन्टर्स**, म्हणजे स्थापित धर्माला अमान्य, अशा लोकांना, शहरांतून गांवखात्यांकडील, किंवा **सरकारी** हुद्दे

वेलिंग्टन ह्याचा राज्यकारभार, १८२८-१८३०.

किंवा अधिकाराच्या जागा पतकरण्याची मनाई होती. १८२८ त **लार्ड जान रस्सेल्ल** ह्यानें **पार्लमेंटां**त उठून काढून हे दोन्ही जुलुमाचे आक्ट रद्द करविले. दुसरा कायदा **" क्याथलिक इम्यान्सिपेशन बिल्ल "** (क्याथलिक्सांच्या बंधमोचनाच्या किंवा सोडवणुकीच्या कायद्याचा मसुदा) ह्या नांवाचा होता. १८१७ सालापासून **क्याथलिक्सां**ना लष्करी खात्यांत व अरमार खात्यांत शिरण्याला परवानगी मिळालेली होती. त्यांना **पार्लमेंटा**चें द्वार बंद होतें, तें तसेंच फार दिवस बंद राहणार नाहीं, असें स्पष्ट दिसूं लागलेलें होतें. **हौस आफ् कामन्स** ह्यांनीं **क्याथलिक्सांना पार्लमेंटां**त सभासद म्हणून घेण्याकरितां दोन **आक्टां**चे मसुदे पसार केले. परंतु **हौस आफ् लार्ड्स** ह्यांनीं ते मसुदे जेव्हां जेव्हां त्यांपुढें येत, तेव्हां तेव्हां रद्द करावे, असा क्रम चालला होता.

कार्पोरेशन आक्ट नांवाचा कायदा रद्द होतो, १८२८.

क्याथलिक अस्सोशिएशन (मंडळी) स्थापित होते, १८२३.

क्याथलिक्सांपैकीं पुष्कळ लोक **आयरिश** होते, आणि १८२३ त **आयर्लंडां**त **" क्याथलिक अस्सोशिएशन "** नांवाची एक **मंडळी** स्थापित झालेली होती, तिचा प्रमुख **डानिएल ओ' कॉन्नेल्ल** ह्या नांवाचा होता, तो सुगर, वक्ता, **बारिस्टर** (वकील) होता. परंतु ती **मंडळी** आणि **ऑरेन्जमेन** (प्राटेस्टंट पंथी लोक) ह्यांच्या दरम्यान कलह उत्पन्न होऊन ते इतके विकोपास गेले कीं, १८२५ सालीं ती **मंडळी** तीन वर्षें सरकारानें मोडून टाकली, आणि जरी **हौस आफ् कामन्स** सभेंत **सर फ्रान्सिस बर्डेट्ट** ह्यानें **क्याथलिक्सां**च्या बंधमोचनाकरितां आणखी एका कायद्याचा मसुदा पसार करविला तरी,

लार्ड्सांनीं तो झुगारून दिला, म्हणून त्या प्रकरणीं कांहीं विशेष झालें नाहीं. शेवटीं जेव्हां १८२७ त कानिंग मरण पावला, तेव्हां वेलिंग्टन आणि पील हे दोघेही क्याथलिक्सांच्या बंधमोचनाला प्रतिकूल आहेत हें आयरिशांना माहीत होतें, म्हणून ते फारच तडफडूं लागले. १८२८ सालच्या जून महिन्यांत अमर्याद संख्याक मतें पडून ओ'कॉन्नेल ह्याला क्लेर नांवाच्या कौंटीकरितां पार्लमेंटाचा सभासद किंवा प्रतिनिधि निवडलें. परंतु तो क्याथलिक असल्यामुळें पार्लमेंटांत त्याला आपलें स्थान स्वीकारतां येईना. तथापि त्याला पार्लमेंटांत घेतलें नाहीं तर त्याचीच पुनः पुनः निवडणूक होईल, आणि, शिवाय, आयर्लंडच्या इतर भागांत क्याथलिक्सांनाच सभासद निवडण्याविषयीं आयरिशांना तो प्रवृत्त करील, ह्या गोष्टी सरकार जाणून होतें.

ओ' कॉन्नेल ह्याची निवडणूक होते, १८२८.

सारांश तें प्रकरण, ह्यापुढें बाजूस टाकतां येण्याजोगें नव्हतें. पार्लमेंटानें कित्येक महिनेपर्यंत त्याविषयीं वाटाघाट केली, आणि शेवटीं १८२९ त मार्चच्या ५ व्या तारिखेस, तें क्याथलिक इम्यान्सिपेशन बिल्ल (क्याथलिक्सांच्या बंधमोचनाविषयीं कायद्याचा मसुदा) हौस आफ् कामन्स ह्या सभेंत पुनः पसार झाल्यावर, लार्ड्सांनीं त्याविषयीं आपला हेका सोडला, आणि तो मसुदा पसार केला. ह्या प्रकारें शेवटीं, मुख्यत्वेंकरून दुसऱ्या जेम्सानें इंग्लंडावर रोमन क्याथलिक धर्म जुलमानें लादण्याविषयीं केलेल्या प्रयत्नांनीं सर्व राष्ट्रांतील लोकांना रोमन क्याथलिक्सांविषयीं द्वेष वाटू

क्याथलिक इम्यान्सिपेशन बिल्ल पसार होतें, १८२९.

लागून जो फारा दिवसांपासून अन्याय माजलेला होता, त्याची समाप्ति झाली. पुढें थोड्या वर्षांनीं, म्हणजे १८३३ त, दुसरा एक आक्ट (कायदा) होऊन, त्यानें **क्रेकर्स**, आणि स्थापित धर्माला अमान्य असें इतर लोक, ह्यांना शपथ घेणें हें पाप आहे असें वाटत असे, त्यांना, शपथेबद्दल नुसती सत्य स्मरून प्रतिज्ञा करून, **पार्लमेंटां**त बसतां येऊं लागलें; परंतु पुढें १८५८ सालापर्यंत, चट सारा अन्याय दूर झाला नव्हता; त्या सालांत त्या शपथेचें इतकें स्वरूप पालटलें कीं, **ज्यू** किंवा **इस्राएल** लोकांना सुद्धां **पार्लमेंटां**त बसतां येऊं लागलें.

क्याथलिक इम्यान्सिपेशन बिल्ल पसार होतांच **ओ'कॉन्नेल्ल** ह्याला पुनः **क्लेर** कौंटीचा प्रतिनिधि निवडलें आणि **पार्लमेंटां**त त्यानें आपलें स्थान स्वीकारलें. एवढ्यानेंच जर तो फक्त तृप्त असता तर, तो **क्याथलिक्सां**चें बंधमोचन करणाऱ्या प्रतापी प्रमुख लोकांपैकीं एक असा लेखला जाऊन सन्मान पावला असता. परंतु लोकांना चिथवून चळवळ करावयास लावून उत्पन्न केलेल्या द्रव्यावर निर्वाह करण्याची त्याला चट लागलेली होती, त्यामुळें **आयर्लंडा**नें तृप्त राहवें हें त्याला नको होतें. त्यानें आतां प्रसिद्ध रीतीनें बोलून दाखविलें कीं, **इंग्लंडाशीं आयर्लंडाचा संयोग** रद्द होईपर्यंत मी स्वस्थ बसणार नाहीं, आणि तदर्थ त्यानें निरर्थक झगडा आरंभला, त्या योगें त्यानें मान्यता मिळविली होती ती गमावली.

१८३०.–**चौथा वुइलियम**–१८३७.

१८३० सालच्या जून महिन्यांत **चौथा जार्ज** वारला. त्याच्या मृत्यूनें पूर्वीच्या वस्तुस्थितींत फारसा फरक झाला नाहीं. मात्र

इतकेंच कीं, त्याचा भाऊ **चौथा वुइलियम** हा राजा झाला, तो लोकांचा आवडता असून, साधा, रंगेल दर्यावरदी होता. तो "आपली छत्री बगलेंत मा- "रून **लंडन**च्या रस्त्यांतून पायीं फिरे "आणि जुन्या ओळखीच्या माणसांशीं मो- "कळ्या मनानें हात हालवून सलाम करी." तो लोकांना प्रिय होता, ही गोष्ट सुदैवाची होती, कारण **फ्रान्स** देशांतील राजा, **दहावा चार्लस,** ह्यानें जुलमी प्रकारानें अमल करण्याविषयीं प्र- यत्न मांडला त्यामुळें त्याच्या विरुद्ध **फ्रान्स** देशीं नवीन बंड उत्पन्न होऊन राज्यक्रांति सुरू झाली होती. तेव्हां **चार्लस** रा- ज्याच्या त्याग करून **ग्रेट ब्रिटनां**त आला. तेथें **वुइलियमानें** त्याला **हॉलिरूड** नांवाचें राजमंदिर उसनें दिलें, त्यांत तो रा- हिला. त्याचा चुलतभाऊ **लूइ फिलिप्प, ऑर्लीन्स**चा **ड्यूक,** ह्याला प्रथम **फ्रान्स**चा **काप्टन-जनरल** (सरलष्कर) केलें, आणि पुढें राजा केलें. त्याच काळाच्या सुमारास **बेल्ज्यम्** हें **हालंडा**पासून पृथक् झालें, आणि पुढें दोन वर्षांनीं, त्यांतील लोकांनीं **साक्स-कोबर्ग**चा **लियो- पोल्ड,** म्हणजे **राजपुत्री शार्लॉट्ट** हिचा विधुरपति, ह्याला आपणांवर राज्य करण्याला पसंत करून नेमलें.

चौथ्या वुइलियमाचे गुणदोष.

फ्रान्स देशांतील दुसरी राज्यक्रांति, १८३०.

इतर राष्ट्रांमध्यें चाललेल्या ह्या धामधुमीनें **पार्लमेंटा**च्या सुधा- रणेविषयीं पुनः ओरड करण्याला **इंग्लिश** लोक जागृत होऊन प्रवृत्त झाले. **बर्मिंग्हम, मांचेस्टर,** आणि **लीड्झ,** ह्यांसारख्या मोठ्या शहरांना, त्यांच्या तर्फे बोलण्याला, आणि त्यांत वस्ती क- रून राहणाऱ्या लोकांच्या वाढत्या समुदायांकरितां कोणत्या काय-

ह्यांची जरूर आहे हें दाखविण्याला, **पार्लमेंटांत** एकही प्रतिनिधि किंवा सभासद नसावा, आणि कृत्रिमवनें, आणि फक्त थोडींशीं इकडेतिकडे विखरलेलीं खेडीं आहेत ज्यांमध्यें अशीं जंगलें, ह्यांच्या धन्यांकडे प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार असलेल्या नऊ किंवा दहा लहान लहान गांवांवर हुकमत असावी, आणि त्या धन्यांनीं आपल्या इच्छेस येतील त्या माणसांना त्या गांवांचे प्रतिनिधि नेमावे, हा उघड अन्याय होता. तथापि **रिफार्म बिल्लाची** (पार्लमेंटाच्या सुधारणेविषयींच्या कायद्याच्या मसुद्याची) गोष्ट मनावर घेण्याला **वेल्लिंग्टनाचें** मन वळवितांच येईना, आणि त्या मसुद्याच्या विरुद्ध त्यानें एका समयीं इतक्या निर्भरानें भाषण केलें कीं तो लोकांना अति अप्रिय झाला; इतका कीं, एका समयीं बरोबर रक्षणाकरितां बळकट पहारा घेतल्याशिवाय राजाच्या बरोबर त्याला सुरक्षितपणें जातां येईना म्हणून, राजाची **लंडन** शहरांत स्वारी जावयाची होती ती लांबणीवर टाकावी लागली. नवीन राजा झाला म्हणजे नवीन **पार्लमेंट** नव्या निवडणुका होऊन नेमलें जाण्याची वहिवाट असल्याप्रमाणें नवें **पार्लमेंट** निवडणुका होऊन भरलें, त्यांत **पार्लमेंटची** सुधारणा इच्छिणारे सभासद पुष्कळ होते, आणि **चौथा वुइलियम** त्यांच्या पक्षाला इतका स्पष्ट अनुकूल होता कीं, **वेल्लिंग्टनाला** राजीनामा देणें भाग आलें. त्या वेळेपासून तो पुनः लोकप्रिय झाला, कारण त्याची राज्य हाकण्याची रीति लोकांना आवडली नाहीं तरी, त्यांच्यासाठीं त्यानें मोठ्या शौर्यानें लढाया मारलेल्या होत्या, म्हणून त्या **"आयर्न ड्यूकावर"** (अयोदेह किंवा वज्रशरीर ड्यूकावर) त्याचें प्रेम होतें. तो आणखी बेवीस वर्षें, म्हणजे १८५२ पर्यंत, वांचला,

वेल्लिंग्टन राजीनामा देतो, तारीख १६ नोव्हेंबर, १८३०.

आणि त्यानें **वाटर्लूची** लढाई मारली तेव्हां ज्या पुष्कळांचे जन्म-सुद्धां झालेलें नव्हतें, त्या लोकांना त्याची ती वांकलेली मूर्ति **पार्क-**मधून, म्हणजे रमण्यांतून किंवा कृत्रिमवनांतून, घोड्यावर बसून जातांना पाहिलेली दखल होती. जेव्हां तो मरण पावला तेव्हां साऱ्या राष्ट्रानें हळहळून शोकसूचक वेष धारण करून सुतक पाळलें, आणि त्याच्या शवसंस्कारसमयीं जो हृदयवेधक प्रकारानें त्याला मान दिला, त्यावरून **इंग्लंड** आपल्या प्रतापी पुरुषांना कसें चाहतें ह्या गोष्टीची प्रतीति आली.

आतां १८३० त ज्या गृहस्थाला राजानें नवें प्रधानमंडल बनविण्याची आज्ञा केली, तो **लार्ड ग्रे** नांवाचा होता. त्यानें मागलीं चाळीस वर्षें, **पार्लमेंटाची** सुधारणा केली पाहिजे, अशी सतत टुमणी लावलेली होती; आणि त्यानें नवीन प्रधानमंडलांत आपल्या संगतीं काम करण्याला जे पुरुष निवडले ते त्याच्याच सारखे सुधारणेविषयीं उत्कंठित होते. आम्हांला, त्या पुरुषांचीं नांवें किती घसवटींतलीं किंवा परिचयांतलीं आहेत ! तीं येणेंप्रमाणें. **१ लार्ड ब्रूम, २ लार्ड मेल्बर्न, ३ लार्ड पामर्स्टन, ४ लार्ड जान रस्सेल, ५ धि ऑनरबल मिस्टर स्टान्ली,** हा पुढें **लार्ड डार्बी** हा किताब पावला, आणि **६ लार्ड लान्स्डाउन.** हे सर्व पुरुष सार्वजनिक व्यवहारांत अग्रगण्य, प्रमुख, किंवा पुढाईत, होते, ह्या गोष्टीची स्मृति अद्यापि जागृत आहे. परंतु सुधारलेलें **पार्लमेंट** प्राप्त होण्यापूर्वीं अझून एका वर्षाहून ज्यास्तीच दिवसपर्यंत लढाई मारावयाला पाहिजे होती. पहिलें **रिफॉर्म बिल,** म्हणजे

लार्ड ग्रे ह्याचा राज्यकारभार, १८३०-१८३४.

पहिलें रिफॉर्म बिल, १८३१ चा मार्च.

पार्लमेंटाची सुधारणा करण्याविषयीं कायद्याचा मसुदा, १८३१ त मार्चच्या १ ल्या तारिखेस, **लार्ड जान रस्सेल** ह्यानें **हौस आफ् कामन्स** सभेंत प्रविष्ट केला. तेव्हां त्याचें पहिलें वाचन व्हावें हा ठराव एकच अनुकूल मत ज्यास्ती पडून, म्हणजे अनुकूल ३०२ मतें आणि प्रतिकूल ३०१ मतें पडून, पसार झाला. परंतु त्या मसुद्याचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या "**कमिटींत**" म्हणजे तपशीलवार प्रत्येक भागाविषयीं वाटाघाट होतांना, तो मसुदा नामंजूर किंवा रद्द झाला. तेव्हां नवीन निवडणुका होतांना लोकांना आपल्या इच्छा प्रदर्शित करण्याला सवड मिळावी म्हणून, प्रधानांनीं राजाचें मन वळवून **पार्लमेंटाचें** विसर्जन करविलें.

प्रधानांना काय पाहिजे होतें ह्याचा पूर्णपणें खुलासा झालेला होता. **लार्ड्स** म्हणजे बडे लोक, धर्माधिकारी, आणि फौजेंतील व अरमाराकडील अमलदार, हे मुख्यत्वेंकरून त्या **बिल्लाला** विरुद्ध होते. परंतु कारखानदार, मध्यम वर्गांतले सुशिक्षित लोक, शहरांतले रहिवासी, आणि कामकरी व मजूर, ह्यांना **पार्लमेंटांत** आपल्या वतीनें बोलण्याला सभासद किंवा प्रतिनिधि पाहिजे होते, म्हणून ते सर्व लोक सुधारणेला अनुकूल होते. त्यामुळें, नवीन निवडणुका होऊं लागल्या तेव्हां, लोकांना स्फुरण अतिशय चढलें.

दुसरें रिफॉर्म बिल, तारीख २ सेप्टेंबर १८३१.

"तें **बिल**, तें सारें **बिल**, आणि त्या **बिल्लावांचून** दुसरें कांहीं नको," ही निवडणुकेच्या समयीं चहूंकडे ओरड चालली; आणि शेवटीं सुधारणेच्छु लोक इतके पुष्कळ निवडले गेले कीं, **दुसरें रिफॉर्म बिल हौस आफ् कामन्स** ह्या सभेंत १८३१ त सेप्टेंबरच्या २ ऱ्या तारिखेस, १०९

अर्धाधिक मतें पडून बहुमतानें, म्हणजे ३४५ अनुकूल मतें आणि २३६ प्रतिकूल मतें पडून, पसार झालें. परंतु जेव्हां तें **बिल लार्ड ग्रे** ह्यानें **हौस आफ् लार्ड्स** ह्या सभेपुढें नेलें तेव्हां त्यांनीं तें धुतकारलें.

तेव्हां देशाच्या सर्व भागांतून जणूं कीं, संतापाग्नीचे लोळ उठले, आणि **सरकाराला** (प्रधानमंडलाला) पाठबळ देण्यासाठीं सर्वत्र सभा झाल्या. **बर्मिंग्हम** एथें असलीच एक जंगी सभा भरली होती, तींतील भाषणें करणारांनीं, **लार्ड्स** (लार्डांची सभा) आपला दुराग्रह सोडणार नाहींत तोंपर्यंत आम्ही कर देणारच नाहीं असें जाहीर केलें; आणि **डार्बी, नाटिंग्हम,** आणि **ब्रिस्टल,** एथें भयंकर दंगे झाले. लोक, राज्यक्रांति होते कीं काय अशी भीति आहे, असें गंभीरपणानें बोलूं लागले. डिसेंबरांत **पार्लमेंट** पुनः भरलें तेव्हां, सर्व सभासदांच्या मुद्रा गंभीर दिसल्या; आणि पूर्वींच्या **बिलांत** थोडा फेरफार करून तिसरें **रिफार्म बिल हौस आफ् कामन्स** ह्या सभेपुढें आणलें तेव्हां, तें डिसेंबरच्या १८ व्या तारिखेस, १६२ अर्धाधिक अनुकूल मतें पडून बहुमतानें पसार झालें. जेव्हां **लार्ड्सांनीं** कमिटींत ३५ ज्यास्त प्रतिकूल मतें पडून बहुमतानें तें अझूनही धुतकारलें, तेव्हां, तें **बिल लार्ड्सांच्या** सभेंत पसार न होईल तर, त्यांतील विरोधी पक्षाच्या मतांहून अनुकूल मतांची संख्या ज्यास्त करण्यासाठीं पुरतील इतके मीं नवे **पीयर्स,** म्हणजे बडे लोक, सामान्य लोकांपैकीं लोकांना किताब देऊन बनवीन, असें त्या सभेला स्पष्ट कळविण्याला **लार्ड ग्रे** ह्यानें राजाला विनंति केली. राजानें ती गोष्ट पहिल्यानें नाकारली, परंतु **वेलिंग्टन** नवें प्र-

तिसरें रिफॉर्म बिल हौस आफ् कामन्स-मध्यें पसार होतें, ता. १८ डिसेंबर १८३१.

धानमंडल बनविण्यास असमर्थ होता, म्हणून लार्ड ग्रेचें पाहिजे होतें तसें चाललें, आणि लार्डसांपैकीं कित्येक सुधारणुकेला प्रतिकूल होते ते, आतां प्रतिपक्ष धरून उपयोग नाहीं असें पाहून पुढील प्रसंगीं जेव्हां तें बिल त्यांच्या सभेपुढें पुनः यावयाचें होतें तेव्हां, सभेंत न येतां घरीं राहिले, त्यामुळें त्या सभेंत ८४ ज्यास्ती अनुकूल मतें पडून बहुमतानें म्हणजे १०६ अनुकूल मतें आणि २२ प्रतिकूल मतें पडून तें बिल पसार झालें.

हौस आफ लार्ड्स तें बिल्ल पसार करतें, तारीख ४ जून १८३२.

ह्या बिल्लानें किंवा कायद्यानें, पूर्वी अठावन्न लहान लहान सनदी गांवांना मिळून एकंदर ११३ प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार होता, तो नाहींसा झाला; आणि दुसऱ्या अशाच तीस सनदी गांवांपैकीं, प्रत्येकाला दोन दोन ह्याप्रमाणें प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार होता, तो जाऊन त्यांना एकेकच प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार ठेवला. त्यामुळें १४३ सभासदांच्या जागा रिकाम्या झाल्या त्या मुख्यत्वेंकरून इंग्लंडांतील कौंटींना आणि मोठमोठ्या शहरांना वांटून देऊन, बाकीच्या स्काट्लंड आणि आयर्लंड ह्यांस दिल्या. पुष्कळ लोकांना पूर्वी निवडणुकांत मतें देण्याचा अधिकार नव्हता, त्यांना तो अधिकार दिला. त्यामुळें मध्यम वर्गांतील लोकांना कायदे करण्याच्या कामांत प्रतिनिधिद्वारा आपलें मत देण्याचा पूर्वीहून ज्यास्त अधिकार मिळाला; आणि १८३३ सालच्या जान्युअरींत जें नवें पार्लमेंट निवडणुका होऊन भरलें त्यांत साऱ्या राष्ट्रांतील लोकांकडील पूर्वीहून यथायोग्य प्रकारें प्रतिनिधि होते. ह्याप्रमाणें पार्लमेंटाच्या सुधारणेची जरूर स्पष्ट

रिफॉर्म बिल्लानें फेरफार झाले ते.

दिसत असतां, ती मोकळ्या मनानें योग्य वेळीं न करतां, इतके फार दिवस लांबणीवर टाकली, इतकी एकच गोष्ट खेदकारक होती. कारण, ती योग्य वेळीं न करतां, मागून फारा दिवसांनीं केल्यानें, ओरड आणि दंगा करणें हाच, आपल्याला पाहिजे असेल तें मिळविण्याचा मार्ग, असें लोक शिकले, आणि आमच्या हालींच्या दिवसांत त्या शिकवणीचे वाईट परिणाम आम्ही अनुभवतों. ह्या सुधारणेसाठीं चाललेल्या झगड्यामध्येंच, **टोरी** आणि **व्हुइग** ह्या प्राचीन नांवांच्या ठिकाणीं, जे प्राचीन मार्गांना अवलंबून राहूं इच्छिणारे होते, त्यांना **कॉन्सर्व्हेटिव्ह**, आणि लोक जें मागतील तें त्यांस मोकळ्या मनानें देऊं इच्छिणारे होते, त्यांना **लिबरल**, हीं यथाक्रम नांवें प्रचारांत आलीं. **राडिकल** हा शब्द फारा दिवसांपूर्वीं उत्पन्न झालेला होता. युद्ध संपल्यावर, १८१९ सालांत जी विपत्ति आणि जे दंगे उत्पन्न झाले, त्यांमध्यें जेव्हां **पार्लमेंटांतील** सभासदांच्या एका समुदायानें सर्व गोष्टींचें जें **रूट**, म्हणजे मूल, तेथपर्यंत जाऊन पराकाष्ठेच्या सुधारणा करण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली, तेव्हां, तो **राडिकल** शब्द त्या लोकांना संज्ञा म्हणून प्रचारांत आला.

कान्सर्व्हेटिव्ह, लिबरल, आणि राडिकल, हे तीन शब्द.

१८३४ च्या नोव्हेंबरपासून १८३५ च्या एप्रिलपर्यंत थोडे महिने, जेव्हां **सरराबर्ट पील** ह्याच्या प्रमुखतेखालीं **कॉन्सर्व्हेटिव्ह** पक्षाचें प्रधानमंडल होतें, तेव्हांचे ते थोडे महिने खेरीज करून, पुढील पांच वर्षें **लिबरल** पक्षाच्या लोकांचें **पार्लमेंटांत** मुख्यत्वें प्राबल्य होतें. ह्या पांच वर्षांमध्यें पूर्वींच ज्या उपयुक्त सुधारणांचा उहू निघालेला होता त्या तडीस गेल्या, आणि इ-

सऱ्या सुधारणांचे उद्दू निघाले. १८३३ त आगस्टच्या ३० व्या तारिखेस, ज्या विजयाकरितां **वुइल्बरफोर्स** हा इतके फार दिवस झगडत होता, तो विजय शेवटीं मिळाला. त्या दिवशीं, **इंग्लंडच्या** सत्तेखालीं असलेल्या सर्व मुलुखांत गुलामगिरीची मनाई करणारा कायदा पसार झाला; आणि पुढें एका वर्षानें, म्हणजे १८३४ त आगस्टच्या ३१ व्या तारिखेस, पृथ्वींतील सर्व भागांतल्या **ब्रिटिशांची** प्रजा म्हणविणाऱ्या लोकांचे गुलाम दास्यापासून मुक्त झाले. ते पुढें १८३९ सालापर्यंत आपल्या जुन्या धन्यांचे करारानें बांधलेले असे शागिर्द म्हणून राहिलेले होते. **वुइल्बरफोर्स** ह्याला त्यासमयीं पंचाहात्तरावें वर्ष लागलेलें होतें, तो, त्या गुलामगिरीच्या मनाईविषयीं कायद्याच्या मसुद्याचें दुसरें वाचन झालें, हें वर्तमान ऐके तोंपर्यंत वांचला, आणि नंतर, आपण आरंभलेलें काम शेवटास गेलें म्हणून कृतज्ञतेनें अंतःकरणपूरित होऊन, तो वारला. **इंग्लिश** राष्ट्राला, किंवा सरकाराला, ज्या ज्या गुलामांच्या मालकांचे गुलाम दास्यांतून मुक्त होऊन त्यांना नाहींतसे झाले, त्यांची नुकसानी भरून देण्यासाठीं दोन कोटि पौंड द्यावे लागले, परंतु तें द्रव्य योग्य कामीं खर्च झालें.

गुलामगिरीची कायद्यानें मनाई होते, तारीख ३० आगस्ट, १८३३.

त्याच १८३३ सालीं, **लार्ड आश्ली** (ह्याला पुढें लार्ड शाफ्ट्स्बरी हा किताब मिळाला) ह्यानें, कारखान्यांत काम करणाऱ्या मुलांना अति कष्ट किंवा श्रम करावे लागत आणि जाच भोगावे लागत, त्यांपासून त्यांच्या रक्षणाविषयीं कायदे पसार करविण्यासाठीं प्रयत्न केले ते सुफल झाले, आणि गरीब लोकांच्या मुलांना शिकविण्याकरितां शाळा घातलेल्या होत्या, त्यांना मदतीसाठीं सरकारी द्रव्याची प्रतिवार्षिक देणगी अमुक देत जावी म्हणून पहिल्या-

नें ठराव झाला. **आयर्लंडांत** लोकशिक्षणासाठीं १८३१ सालीं तीस हजार पौंड देण्यांत आले. आणखी त्याच सालीं **ईस्ट इंडिझ,** म्हणजे पूर्वेकडील देश, ह्यांच्याशीं व्यापार सर्व व्यापाऱ्यांना खुला केला, म्हणजे तो अमक्यांनींच करावा, इतरांनीं करूं नये असा प्रतिबंध होता तो दूर केला.

कारखान्यांविषयीं आणि लोकशिक्षणाविषयीं कायदे होतात, १८३३.

धि पूअर-लॉ, म्हणजे भिकाऱ्यांविषयीं कायदा, होता तो १८३४ सालीं पालटला. हा पालट अगत्य पडण्याच्या पूर्वी केला असें नाहीं. भिकाऱ्यांविषयींचा जुना कायदा हा लोकांना फार अवजड ओझ्यासारखा झालेला होता, कारण आपल्या गुजाऱ्यासाठीं जे काम किंवा श्रम न करणारे त्यांचा गुजारा लोकांकडून तो कायदा करवीत असे. आळशी आणि निर्धास्त लोक ह्यांचा गुजारा, **पूअर-रेट,** म्हणजे भिकारपट्टी नांवाचा कर, देणारे, उद्योगधंदा करून चार पैसे शिलकेंत टाकणारे, लोक ह्यांकडून चाले. नवा जो **पूअर-लॉ,** म्हणजे भिकाऱ्यांविषयीं कायदा, केला, त्यांत सर्व **इंग्लंडभर वर्कहौसिझ,** म्हणजे उद्योगगृहें, बांधण्याचा हुकूम झाला, आणि ज्या कोणाला आपला व आपल्या कुटुंबाचा गुजारा करण्याचें सामर्थ्य नसेल, त्यांनीं (त्यांच्या गृहांत त्यांला पैसा पोहोंचविण्याला कांहीं योग्य कारण नसेल तर) **वर्कहौसांत** गेलेंच पाहिजे अशी त्या कायद्यानें सख्ती झाली. ह्या फेरफारानें भिकारपट्टी पूर्वीपेक्षां कमी झाली, मजूरीचे दर वाढले, आणि मोलमजूरी करणाऱ्या लोकांचे वर्ग पूर्वीपेक्षां सुखी किंवा खातेपिते झाले. भिकाऱ्यांची संख्या त्या वेळापासून एकसारखी कमी होत आहे; इतकी कीं, तुलनेनें पाहतां प-

नवा पूअर-लॉ, म्हणजे भिकाऱ्यांविषयीं कायदा, १८३४.

त्रास वर्षांपूर्वी लोकसंख्येच्या मानानें जितके भिकारी होते, त्यांच्या निमेसुद्धां हालींच्या लोकसंख्येच्या मानानें भिकारी आतां उरले नाहींत.

१८३५ सालीं, जेव्हां **लार्ड मेल्बर्न** हा मुख्य प्रधान होता तेव्हां, शहरांतील स्थानिकराज्यव्यवस्थेची सुधारणा झाली. **मेयर** (कोतवाल किंवा नगराध्यक्ष) आणि **आल्डरमेन** (सनदी गांवाचे अधिकारीविशेष) हे, इतउत्तर (लंडन शहर खेरीज करून) शहरांतील गांवकीसंबंधाचे कर देणाऱ्या लोकांनींच निवडावे असा ठराव झाला, आणि **टाउन कौन्सिल्स** (शहरांतील गांवखात्याकडील स्थानिकराज्यकारभार करणारीं मंडळें) ह्यांनीं सार्वजनिक द्रव्याचा आपल्याकडून खर्च होईल त्याचे हिशेब छापून प्रसिद्ध केलेच पाहिजेत असा निर्बंध झाला. १८३६ सालीं एका कायद्याचा मसुदा पसार झाला, त्यानें, एका **रेजिस्ट्रर जनरल** (सर्वसाधारण नोंदणी करणारा अधिकारी) ह्या नांवाच्या अधिकाऱ्याच्या कचेरींत सर्व जन्म, मृत्यु, आणि लग्नें, ह्यांची नोंदणी करणें आवश्यक केलें; आणि **डिस्सेन्टर्स,** म्हणजे स्थापित धर्माला अमान्य असे लोक, ह्यांना त्यांच्या देवळांत किंवा त्या त्या देशविभागांतील **रेजिस्ट्रर,** म्हणजे नोंदणी करणारा अधिकारी, ह्याच्यापुढें आपले लग्नविधि करण्याला त्या कायद्यानें परवानगी दिली.

म्युनिसिपल रिफॉर्म (शहरांतील गांवखात्याकडील स्थानिकराज्यकारभाराची सुधारणा), १८३५.

ह्या सुधारणा करण्याचें काम **पार्लमेंटांत** चालू असतां, **पार्लमेंटाबाहेर** साऱ्या राष्ट्रांतील लोक निश्चल खुंटून राहिलेले नव्हते, १८१६ त, म्हणजे **वाटर्लूच्या** लढाईनंतर फक्त एका वर्षानें, लंडनांतील रस्त्यांत पहिल्यानेंच ग्यासाचे दिवे लावून प्रकाश करूं

लागले. त्या योगें, रस्त्यांत होणाऱ्या चोऱ्या आणि दांडगाई किंवा जुलूमजबरदस्ती ह्यांचें, फांशीच्या सजेनें झालें होतें, त्याहून विशेष निवारण किंवा बंदोबस्त झाला; आणि १८२९ सालीं

ग्यास आणि पोलीस.

जेव्हां **सर रॉबर्ट पील** ह्यानें जुने जागल्ये किंवा पहारेकरी काढून टाकून, त्यांच्या जागीं पोलीसचे (गांवखात्याकडील बंदोबस्ताकरितां नेमलेल्या कोतवालीचे) शिपाई (ह्यांना पीलच्या नांवावरून फार दिवस "**पीलर्स**" आणि "**बॉबिझ**" असें म्हणत) नेमले, तेव्हां दिवसा आणि रात्रीं, शहरचे रस्ते पूर्वींहून निर्भय किंवा सुरक्षित झाले. **मक् आडम** नांवाचा एक अंध **स्काचमन** होता, त्यानें, रस्त्यांवरील जमीन खणून सारखी करून तीवर, मोठे दगड फोडून त्यांची सारखी खडी करून ती पसरण्याची नवी रीति प्रथम चालू केली, तिच्या योगें सर्व **इंग्लंड**भर आणि **स्काट्लंड**भर रस्त्यांची फारच सुधारणाही झाली. ह्या

मकाडमाइझ्ड (खडी पसरलेले) रस्ते.

मकाडमाइझ्ड (खडी पसरून तयार केलेल्या) रस्त्यांवरून, पूर्वीप्रमाणें गाड्यांना मुंगीच्या पायांनीं रेंगत रेंगत चालावयाचें न लागून, दर तासास दहा किंवा बारा मैल ह्या वेगानें धांवतां येऊं लागलें, आणि माणसें बसून जावयाच्या गाड्या आणि ओझ्यांचे गाडे चिखलांत चाकांपर्यंत बुडून रुतून पडतनासे झाले.

शेवटीं, १८३० त सेप्टेंबरच्या १५ व्या तारिखेस, **लिव्हर्पूल** आणि **मांचेस्टर** ह्या दोहों शहरांच्या दरम्यान, पहिला **इंग्लंडां**तील मोठा **रेलवे** (लोहमार्ग, लोखंडी रस्ता) बांधून तयार होऊन सुरू झाला. **जार्ज स्टीफन्सन** नांवाचा दगडी कोळशांच्या खाणींत खपणाऱ्या एका गरीब मजूराचा मुलगा होता. तो एक प्रमुख

एन्जिनीयर (यंत्रांच्या कामांत निपुण) निपजला होता. त्यानें सर्व अडचणी जिंकून, एक **लोकोमोटिव्ह एन्जिन** (स्थानांतर गमनशक्त, एका जागेंतून दुसऱ्या जागीं आपोआप जाण्याला समर्थ असें वाफेचें यंत्र) बनविलें. त्या यंत्रानें, **चाट मॉस्स** नांवाच्या एका विख्यात दलदलीवरून देखील आरपार लोखंडी

लिव्हर्पूल आणि मांचेस्टर ह्यांच्या दरम्यानच्या लोखंडी सडकेवरून आगगाडी चालविण्याची सुरवात होते, १८३०.

सरांची सडक त्यानेंच बांधली होती, तीवरून दर तासास पसतीस मैल ह्या वेगानें एक मोठमोठ्या गाड्यांची माळ किंवा तांडा ओढून नेतां येऊं लागला. तो आगगाडीचा रस्ता सुरू करण्याच्या दिवशीं मोठा थाटमाटाचा समारंभ केलेला होता, त्या दिवसावर एका दुःखकारक गोष्टीनें काळोखी आणली. ज्या **हस्किस्सन** नांवाच्या पुरुषानें **इंग्लिश** व्यापाराच्या सुबत्तेकरितां इतके कष्टे श्रम केले, त्याचा **वेल्लिंग्टन**च्या **ड्यूका**शीं फार दिवस स्नेह तुटलेला होता. तेव्हां त्या दिवसाच्या त्या ट्रेनींत (गाड्यांच्या तांड्यांत) ते दोघेही असून तो **हस्किस्सन** त्या **वेल्लिंग्टन**च्या **ड्यूका**शीं चार शब्द बोलण्याकरितां आपल्या डब्यांतून खालीं उतरला. तो त्या **ड्यूका**च्या गाडीच्या दरवाज्याशीं बोलत उभा असतां शेजारच्या लैनीवरून एक ट्रेन आली, तिचा धक्का त्याला लागून तो खालीं पडून चेंगरून ठार मेला. असें असतांही, खुद्द **हस्किस्सनानें**, हजार वांट्यांनीं, त्या दिवसानें साऱ्या देशाला जें मोठें हित पहिल्यानेंच प्राप्त झालें त्याच्याशीं तुलनेनें आपला मृत्यु कसपटासारखा तुच्छ मानला असता. यंत्रें आणि वाफ, हीं, कांहीं काळापासून कारखान्यांत, खाणींत, आणि दुकानांत, माणसाचीं चाकर बनलेलीं होतीं, तींच यंत्रें आणि वाफ हीं माणसाचा माल खुषकीनें

आणि जलमार्गानें लांबवर दूर दूर देशीं नेण्याच्या कामीं उपयोगांत आणलीं.

ह्या व्यापाराच्या संवृद्धीनें वरिष्ठ आणि मध्यम वर्गांतील लोक अधिकाधिक श्रीमान होऊं लागले; आणि पूर्वींहून संपत्ति वाढल्यामुळें तिजबरोबर रस्त्यांत, इमारतींत किंवा हवेल्यांत, आणि सर्व मोठमोठ्या शहरांतल्या इतर व्यवस्थांत सर्व प्रकारच्या सुधारणा झाल्या. **लंडनांतील** मार्किटें (बाजार) मोडून नवीं बांधलीं, पूर्वींपेक्षां रस्त्यांतील फरसबंद्या चांगल्या केल्या, आणि रस्ते पहिल्यापेक्षां स्वच्छ ठेवूं लागले. **रीजेन्ट्स पार्क** नांवाचें कृत्रिमवन किंवा रमणा (बाग) ह्याची रचना केली. **हाइड पार्क**, आणि **सेन्ट जेम्स पार्क** हीं कृत्रिमवनें किवा रमणे (बाग) ह्यांत पुनः झाडांची लागण करून तीं त्या अतिदाट रहदारीच्या रस्त्यांमध्यें किंवा चहूंकडून कोंडलेल्या वस्तीच्या भागांमध्यें उश्वासासारखीं आरोग्यकारक मोकळ्या हवेचीं रमणीय स्थानें बनविलीं. **धि झोओलॉजिकल गार्डेन्स** (प्राणीसंग्रहालयें आंत असणारे असे बाग) १८२८ त तयार करून ते पाहणारांना खुले केले. **युनिव्हर्सिटी कालेज** आणि **किंग्झ कालेज** ह्या नांवांच्या पाठशाळा स्थापल्या. अखेरीचें परंतु उपयोगानें अति लहान नव्हे असें कृत्य हें होतें. दुसऱ्यांनींच रक्षण केलें पाहिजे ज्यांचें अशा लोकांच्या जतनेकडे लक्ष्य पोहोंचलें, आणि **हान्वेल्ल** एथें एक विशाल आश्रयस्थान बांधलें. त्यांत लाचार वेडे सुखानें राहूं लागले, आणि त्यांची पूर्वीं सांखळ्यांनीं बांधून ठेवून हेळसांड होई तशी आतां न होतां, त्यांचें ममतेनें संगोपन होऊं लागलें.

वेडे लोकांकरितां आश्रयस्थान.

आणखीही आतां, ज्या लोकांजवळ निर्वाहाला पुरून उराया-

जोगा पैसा होता, त्या लोकांना अधिक ज्ञानाची तृष्णा उत्पन्न होऊन, तें ज्ञान दुसऱ्यांना देण्याची इच्छा होऊं लागली. १८२३ त सभ्य गृहस्थांच्या एका समुदायानें लंडनांत पहिली **"मेक्यानिक्स इन्स्टिट्यूट"** (शिल्पी किंवा कारिगर लोकांच्या शिक्षणाकरितां शाळा, किंवा संस्था) स्थापली. त्या समुदायांत **डॉक्टर बर्क्बेक** हा मुख्य होता. हाच कित्ता इतर शहरांनीं उचलला, आणि एकीकडे **सरकार** मुलांच्या शिक्षणाकरितां द्रव्याच्या देणग्या देत होतें, आणि दुसरीकडे ह्या **इन्स्टिट्यूट्स** (संस्था) वयानें मोठे झालेले कामकरी किंवा कारिगर ह्यांना संध्याकाळच्या तासांत शिक्षण देऊं लागल्या. पुढें लवकरच ह्या लोकांना वाचतां यावीं अशा पुस्तकांची किंवा ग्रंथांची जरूर दिसून आली, आणि १८२५ त, **लार्ड ब्रूम** वगैरे गृहस्थांनीं **"धि सोसाएटी फॉर धि डिफ्यूझन आफ् यूस्फुल नॉलेज"** (उपयुक्तज्ञानप्रसारासाठीं मंडळी) ह्या नांवाची एक मंडळी स्थापली. तिनें इतिहास, पदार्थविज्ञानशास्त्र, आणि इतर विषय, ह्यांवर सोपे आणि स्वस्त असे ग्रंथ छापून प्रसिद्ध केले. पूर्वी वर्तमानपत्रांवर जमाबंदीखात्याकडील छाप किंवा शिक्का (टिकिट) भारी किंमतीचा लागत होता, तो १८३६ सालीं कमी करून एक पेनी किंमतीचा केला, त्यामुळें वर्तमानपत्रें वाचण्याची आवड पूर्वीहून फार विस्तीर्ण परसली.

पहिली मेक्यानिक्स इन्स्टिट्यूट, १८२३.

उपयुक्त विद्याग्रंथकलाप.

आणि वरिष्ठ प्रतीच्या कामकरी लोकांच्या कल्याणाचे मार्ग ह्या प्रकारें वाढले, तथापि कनिष्ठ प्रतीचे गरीब कामकरी लोक शहरांत आणि खेड्यापाड्यांत सदा आरोग्यहीन, दुःखग्रस्त,

अज्ञान, आणि वारंवार मोठ्या विपत्तींत असत; आणि १८३७ त जेव्हां **चौथा वुइलियम** वारला, तेव्हां **इंग्लंडांत** गरीब लोक परम दुर्दशेंत असून त्यांच्यामध्यें पराकाष्ठेचा असंतोष उत्पन्न झालेला होता.

कामकरी लोकांच्या वर्गाची दुर्दशा.

सत्य म्हणून इतकेंच आहे कीं, जेव्हां लोकस्थितींत मोठेमोठे फेरफार होतात, तेव्हां नेहमी कांहीं काळपर्यंत, विपत्ति उत्पन्न होते, आणि जे अतिगरीब, आणि त्या स्थित्यंतराला अनुसरून आपल्या स्थितींत त्वरित फेरफार करण्याला अति असमर्थ असतात, त्यांवर मुख्यत्वेंकरून ती विपत्ति गुदरते. ज्या स्वस्थतेच्या वीस वर्षांचें आम्ही वर्णन करीत आलों त्या वीस वर्षांत सर्व गोष्टींची फारच त्वरेनें अभिवृद्धि होत आलेली होती. व्यापाराला एकाएकीं ऊत आला, यंत्रें उपयोगांत आलीं, लोखंडी सडका आणि आगगाड्या ह्यांची कृति निघाली, ह्या सर्व गोष्टी परिणामीं अत्यंत दरिद्र्यांनादेखील बहुत कल्याणकारक झाल्या. परंतु त्या गोष्टींनीं, त्या त्या पळमात्रापुरतीं (अल्पकाळापुरतीं) मजूरांची किंवा कामकऱ्यांची जरूरी असलेलीं स्थलें पालटून, आणि करावयाच्या मजूर कामाचे प्रकार पालटून, पुष्कळ लोक बेरोजगारी झाले, त्यामुळे मजूरी किंवा मजूरीचें मोल खरोखर वारंवार पूर्वींहून कमी झालें, आणि तें मिळवणेंही पूर्वीपेक्षां कठीण झालें. अन्न तर अझून फार महाग होतेंच, आणि भिकारपट्टया वगैरे कर फार भारी होते, कारण भिकाऱ्यांविषयींच्या कायद्यांत केलेल्या फेरफारांनीं उद्योगी कामकऱ्यांवरील करांचें ओझें अद्यापि फारसें कमी झालेलें नव्हतें; तशांत, जुन्या भिकाऱ्यांविषयींच्या कायद्याप्रमाणें उद्योगगृहांबाहेर मिळणाऱ्या भिक्षेवर भिस्त ठेवून राहणाऱ्या लोकांची स्थिति आतां अर्थात् फार

वाईट झाली. शेतांत खपणाऱ्या मजूरांना जव किंवा सातू ह्यांची किंवा राइ नांवाचें एक धान्य आहे त्याची भाकर देखील क्वचित् विकत घेववे, आणि मिठविलेल्या डुकराच्या मांसाखेरीज दुसरें मांस तर त्यांच्या घरीं कधींही येत नसे, आणि पुष्कळ प्रांतांत लोक आपल्या कुटुंबांना केवळ उपासमारीपासून जेमतेम रक्षण करीत.

प्रकरण २६.

इंग्लंड आणि त्याच्या वसविलेल्या राज्यशाखा

व्हिक्टोरिया, १८३७ पासून

कारकीर्द पन्नास वर्षें झाली तन्निमित्त उत्सवाच्या १८८७ ह्या लाख्या वर्षापर्यंत.

१८३७ सालीं जूनच्या २० व्या तारिखेच्या पहांटेस पांच वाजतां, **लार्ड चेम्बरलेन** (राजाचा खासगीकडील कारभारी) आणि **कांटर्बरीचा आर्चबिशप** हे दोघे, आपण **इंग्लंडची राणी** झालां हें सांगण्याकरितां आले होते, त्यांचें आगतस्वागत करण्याकरितां तरुण **प्रिन्सेस** (राजपुत्री) **व्हिक्टोरिया** हिला झोंपेंतून जागें केलें. तिनें एकच महिन्यापूर्वीं आपला फक्त अठरावा जन्मदिवस (वाढवीस) समारंभानें केलेला होता. परंतु, तिनें जातीवर भिस्त ठेवणारी दुसऱ्यांविषयीं विचारी, आणि आपलें कर्तव्य करण्यामध्यें निश्चींची किंवा कडक, असें व्हावें असें तिला काळजीनें वळण

व्हिक्टोरिया राणी.

लावलेलें होतें. **तिसऱ्या जार्जाच्या** तिघां वडील पुत्रांना वारस किंवा संतति नव्हती, आणि त्याचा चौथा पुत्र **केंटचा ड्यूक** ह्याची ती एकुलतें एकच मूल होती, म्हणून तीच **चौथ्या वुइ-लियमाच्या** मागून गादीवर बसेल ही गोष्ट फारा दिवसांपासून माहीत झालेली होती; आणि वैधव्य प्राप्त झालेली **केंटची डचेस्स** (ड्यूकाची बायको) हिनें आपल्या लहान मुलीला निवांत एकांतवासांत पालनपोषण करून व शिक्षण देऊन इतकें चांगलें तयार केलें कीं, ती न्यायी राज्यकर्त्री, आपल्या प्रजेच्या सुखदु:खाविषयीं कन्हवाळू अशी राणी, पतिनिरत पत्नी, सदाचाराविषयीं निर्मल आणि उमदा कित्ता, आणि पन्नास वर्षें प्रभुत्व करून नंतर, जी केवळ नांवापुरतीच राज्य करीत नसून, आपल्या प्रजाजनांच्या अंत:करणांवर राज्य करीत आहे, अशी राज्ञी, बनली; ह्यास्तव सर्व **इंग्लंड** त्या **डचेस्सचें** अत्यंत ऋणी आहे.

हानोव्हर हें इंग्लंडापासून वेगळें होतें, १८३७.

हानोव्हर देशच्या कायद्याप्रमाणें तेथील गादीवर पुरुष वारसच बसला पाहिजे असा नियम होता, म्हणून तो देश आतां **इंग्लिश** राज्यापासून पृथक् झाला, आणि **राणीचा** चुलता, **कंबर्लंडचा ड्यूक**, हा **हानोव्हरचा** राजा झाला. ही गोष्ट मोठ्या हिताची झाली, कारण, शेवटीं आतां कधींना कधीं परदेशांशीं कलहांत ज्याच्या योगें गुंतावें लागण्याचा संभव राहणार असा **यूरोपांत इंग्लंडच्या** मालकीचा मुलूख कांहींच उरला नाहीं, आणि पुढल्या पन्नास वर्षांमध्यें महत्वाचीं म्हणून जीं काय युद्धें उत्पन्न झालीं तीं, साक्षात् किंवा पर्यायानें, आमच्या **हिंदुस्तानांतील** व **आफ्रिकेंतील** मुलुखांच्या संबंधापासून उत्पन्न झालीं हें पुढें पाहण्यांत येईल. ह्या पन्नास वर्षांतील आमचा

इतिहास म्हटला म्हणजे, त्या काळांत स्वदेशीं आमचे कायदे न्यायाचे आणि शाहणपणाचे करण्याविषयीं, आणि आमच्या परमुलुखीं वसविलेल्या राज्यशाखांना चांगली राज्यव्यवस्था करून देण्याविषयीं, जे प्रयत्न झाले त्यांचें त्यांत मुख्यत्वें वर्णन आहे.

तेव्हां पहिला प्रश्न जो उत्पन्न झाला तो **कानडा** देशाविषयीं होता. ह्या देशाचे १७९१ त **पिट्ट** ह्यानें विभागून **अप्पर कानडा** (उत्तरकानडा) आणि **लोअर कानडा** (दक्षिणकानडा) ह्या नांवाचे दोन वेगळाले प्रांत केले, आणि त्या प्रत्येकाला राजानें निवडून नेमलेला एकेक गव्हर्नर आणि एकेक कौन्सिल, आणि लोकांनीं निवडणुका करून नेमलेली एकेक सभा, अशीं असावीत, अशी व्यवस्था केली. **उत्तर कानड्यांत** ही व्यवस्था बरीच सुरळीत चालली. परंतु **दक्षिण कानड्यांत** अझून लोक मुख्यत्वें **फ्रेंच** जातीचे होते, त्यामुळें तेथें मोठमोठ्या अडचणी उत्पन्न झाल्या, आणि शेवटीं परिणामीं एक बंड उद्भवलें. तें बंड १८३७ त **राणी** गादीवर बसण्याच्या समयासच **उत्तर कानड्यांत** पसरलें. तेव्हां त्या साऱ्या देशांत लष्करी कायदा चालू केला, आणि **डर्हमचा अर्ल** म्हणून एक मोठा काबील आणि प्रामाणिक पुरुष होता, त्याला त्या देशाचा **गव्हर्नर-जनरल** (सर सुभेदार) नेमून नवीन राज्यव्यवस्था करण्याविषयीं उत्तम मार्ग कोणता ह्या गोष्टीविषयीं रपोट करण्यासाठीं त्या देशीं पाठविलें. दुर्दैवानें त्यानें रपोट केला इतकेंच नव्हे, परंतु आपल्याच अधिकारानें तो फार वागला. त्यानें त्या देशीं वसाहती करून राहिलेल्या लोकांनाच नवीन कायदे करण्याच्या कामीं आपणाला साहाय्य करण्यासाठीं पाचारिलें. ह्या गोष्टीचा परि-

कानडा देशांत बंड होतें, १८३७.

णाम त्या देशाला स्वतंत्र करणें हाच झाला असता. तेव्हां **इंग्लंडांतील** **सरकारानें** त्याला, कडक **टपका** लिहून पाठविला, त्यानें त्याला इतकी **चीड** आली कीं राजीनामा पाठवून हुकुमाची वाट न पाहतां काम सोडून तो माघारा आला. तो निराश होऊन १८४० च्या जूलईंत वारला.

लार्ड डर्हम ह्याला कानडाचा गव्हर्नर–जनरल नेमलें, १८३८.

तथापि त्या **लार्ड डर्हमची** कल्पना **इंग्लंडांतील** **सरकारानें** स्वीकारली, आणि **इंग्लंडाने** आपल्या सर्व नवीन वसविलेल्या राज्यशाखांना ज्या स्वतंत्र राज्यव्यवस्था ठरवून दिल्या आहेत त्यांचा पाया त्या **लार्ड डर्हमच्या** कल्पनेनें घातला. **कानडा** देशाचे ते दोन्ही विभाग १८४० त संयुक्त केले, आणि त्यांना आपलें आपण राज्य चालविण्याची परवानगी दिली, आणि आमच्या **लार्ड्स** आणि **कामन्स** ह्या दोन **सभांच्या** मेळाच्या **अप्पर हौस,** आणि **लोअर हौस** ह्या नांवांच्या दोन सभा करून त्या सभांना त्या देशांतील सरकारी कामदारांना जबाबदार केलें. त्या देशांत **राणीचा** प्रतिनिधि म्हणून एक **गव्हर्नर जनरल** नांवाचा अधिकारी **इंग्लंडांतून** नेमीत जावा असा ठराव केला. **इंग्लंडचा** त्या देशावर कबजा म्हणून फक्त इतकाच राखला. पुढें सत्तावीस वर्षांनीं, म्हणजे १८६७ सालीं, **लार्ड डर्हम** ह्याची शेवटची सूचना सिद्धीस नेली, आणि **उत्तर अमेरिकेंतील** **ब्रिटिशांच्या** अमलाखालचे सर्व मुलूख, देश किंवा **संस्थानें,** ह्यांना **कानडा** देशाशीं संयुक्त होऊन, **"डोमिनियन** (राज्य) **आफ् कानडा"** ह्या नांवाचें एक **"फेड-**

कानडा देशांतील राज्यव्यवस्था, १८४०.

डोमिनियन आफ् कानडा नांवाचें संयुक्त-राज्य बननें, १८६७.

रेशन" (अनेक संस्थानांचें सामयिक संयुक्तराज्य) बनविण्याला परवानगी दिली. **नोव्हास्कोशिया, न्यू ब्रन्स्वुइक,** आणि **हडसन्स बे टेरिटरी** (हडसनच्या अखाताच्या कांठचा मुलूख), हीं १८६७ त त्या सामयिक संयुक्तराज्यांत मिळालीं. **मानिटोबा** ह्या नांवाचा मुलूख १८७० त त्या राज्याचा विभाग बनविला. **व्हान्कूव्हर**चें बेट, **प्रिन्स एड्वर्ड** नांवाचें बेट, हीं दोन्हीं त्या संयुक्तराज्यांत १८७३ त मिळालीं. सारांश आतां ३५००००० पसतीस लक्ष चौरसमैल इतक्या क्षेत्रफळाचा मुलूख एकत्र मिळून **ब्रिटिश सरकार**च्या अमलाखालीं एक विस्तीर्ण राज्य बनलें आहे, आणि **कानेडियन पासिफिक रेल्वे** नांवाची १८८६ त चालू केलेली दीर्घ लोखंडी सडक, **अट्लांटिक** महासागराच्या किनाऱ्यावरील **नोव्हास्कोशिया** नांवाच्या देशापासून, **पासिफिक** महासागराच्या किनाऱ्यावरील **ब्रिटिश कोलंबिया** नांवांच्या देशापर्यंत, **ब्रिटिशां**च्या सत्तेखालची जमीन कोठेंही सोडावी न लागतां, कोणाही प्रवाशाला आगगाडींतून घेऊन जाते. **उत्तरअमेरिकें**तील **ब्रिटिशां**च्या वसविलेल्या राज्यशाखांपैकीं, त्या संयुक्तराज्यांत मिळालेलें नाहीं असें फक्त एक **न्यू फौन्डलंड** बेट आतां वेगळें राहिलेलें आहे.

ह्या नवीन देशाच्या ह्या वरील संक्षिप्त इतिहासानें आम्हांला **व्हिक्टोरिया** राणीच्या बहुतेक साऱ्या कारकीर्दीमधून पार नेलें असें म्हटलें पाहिजे, कारण, वर सांगितलेला प्रचंड आगगाडीचा लोखंडी रस्ता अगदीं अलीकडे, म्हणजे १८८६ त, सर्व तयार झाला. आम्हांला आतां ह्या कारकीर्दीच्या आरंभाकडे माघारें गेलें पाहिजे, आणि पहिल्याच थोड्या वर्षांमध्यें त्या प्राचीन देशांत (इंग्लंडांत) कोणकोणत्या सुखाभिवृद्धि त्वरेनें होत गेल्या, हें

पाहिलें पाहिजे. १८३७त व्हुईट्स्टन आणि कूक ह्या नांवांच्या गृहस्थांनीं, पहिला इलेक्ट्रिक टेलिग्राफ (दूरची बातमी लिहून पाठविण्याचें विद्युद्यंत्र किंवा तारायंत्र) नांवाचें बातमी पाठविण्याचें पहिलें यंत्र कल्पनेनें बनवून, तीं यंत्रें त्यांनींच तयार करावीं आणि त्याचा फायदा कांहीं वर्षें त्यांनींच घ्यावा, इतरांनीं त्यांची कल्पना चोरून तसलीं यंत्रें करून त्यांचा फायदा बुडवूं नये, अशा हक्काची त्यांनीं सरकारापासून सनद मिळविली, आणि ब्लाक्वॉल नांवाच्या आगगाडीच्या लोखंडी रस्त्यावर त्यांनीं तें यंत्र पहिल्यानें चालू केलें. १८३८ त फक्त वाफेच्या शक्तीनें चालणारीं जहाजें इंग्लंडापासून निघून, त्या सफरीला पुरण्याजोगा दगडी कोळशांचा पुरोठा वर बाळगून, समुद्रावरून न्यू यार्कला गेलीं; आणि १८३९ त, मिस्टर हिल्ल (ह्याला पुढें सर रोलंड हिल्ल हा किताब मिळाला) ह्या नांवाच्या पुरुषानें, साऱ्या युनायटेड किंग्डमभर (संयुक्तराज्यभर) टपालच्या हांशिलाचा दर एकसारखा एक पेनी करण्याची आपली कल्पना सरकारच्या मनांत भरवून, ती सिद्धीस नेण्याला त्यानें त्यांना प्रवृत्त केलें. ही तजवीज मोठ्या औदार्याची होती कारण, ज्या लोकांना खर्च करण्याचें उत्तम सामर्थ्य होतें, म्हणजे पार्लमेंटचे सभासद ह्यांना, आपलीं व आपल्या मित्रांचीं पत्रें फ्रांक करण्याचा, म्हणजे आपली लखोट्यावर सही करून टपालहांशील न देतां टपालांतून मुफत पाठविण्याचा, हक्क होता, आणि गरीब माणसांला खेड्यापाड्यांत पत्र पाठविणें झाल्यास, स्थलाच्या अंतराच्या मानानें, सहा पेन्सांपासून एक शिलिंग

इलेक्ट्रिक टेलिग्राफ, १८३७.

पेनि पोस्टेज (टपालाच्या हांशिलाचा एकसारखा एक पेनी दर) होतो, १८३९–१८४०

चार पेन्सपर्यंत टपालहांशिल द्यावें लागे. १८३९ त अर्धा औंस वजनाच्या लखोट्याला (स्थलांचें अंतर कितीही असो) टपालहांशिलाचा एकसारखा चार पेन्स हा दर प्रथम चालू केला, आणि नंतर १८४० सांतील जान्युअरीच्या १० व्या तारिखेपासून, **इंग्लंड, स्काट्लंड,** आणि **आयर्लंड,** ह्या देशांच्या कोणत्याही भागांत एका पेनीनें (तितक्याच वजनाचें) पत्र पाठवितां येऊं लागलें.

अशा नवीन नवीन सुधारणा होत असतां, ह्या कारकीर्दीच्या अवलींत किचाटें उत्पन्न झाल्यावांचून राहिलीं नाहींत. पूर्वी पाहण्यांत आलेंच आहे कीं, गरीब लोकांना निर्वाहाची पंचाईत झालेली होती, आणि जनस्थितींत आणि **पार्लमेंटांत** सुधारणांची फार जरूर होती. परंतु, **राणी** गादीवर बसल्यावर जें नवीन **पार्लमेंट** निवडणुका होऊन भरलें, त्यांत प्रधानांच्या तरफेचा बहुपक्ष इतका लहान होता कीं, नवीन कायदे पसार करविण्यापुरतें पाठबळ त्यांना नव्हतें, आणि **लार्ड मेल्बर्न** हा चालढकल्या पुरुष असून, त्याला सर्व गोष्टी आहेत तशा राहूं देऊन त्यांत हात घालावयाला नको होतें, त्यामुळें, आपल्या तरुण **राणी**ला आपल्या विपत्तीविषयीं बेफिकीर राहण्याविषयीं तो शिकवितो, असें लोकांना वाटूं लागलें. ह्याशिवाय कामकरी लोक असंतुष्ट झालेले होते, कारण कीं, **पार्लमेंटा**करितां सभासदांच्या किंवा प्रतिनिधींच्या निवडणुका करण्यांत मत देण्याचा अधिकार दुकानदारांना दिलेला असून, त्यांना तो दिलेला नव्हता.

चार्टिस्ट्स (सनद-मागणाऱ्या) लोकांचा उदय, १८३८.

पुढें १८३८ त जूनच्या २८ व्या तारिखेस, **राणी**ला राज्याभिषेक झाला त्यानंतर फक्त थोड्या आठवड्यांनीं, **बर्मिंग्हम** एथें एक टोलेजंग सभा भरली, आणि तिनें एक ज्ञापनपत्र तयार केलें,

त्याला **ओ'कॉन्नेल्ल** ह्या नांवाच्या एका गृहस्थानें **"पीपल्स चार्टर"** (लोकांची सनद) असें नांव दिलें. त्यांत सहा सुधारणुकेच्या गोष्टी मागितल्या होत्या, त्या येणेंप्रमाणें. (१) पुरुषमात्राला प्रतिनिधि निवडतांना मत देण्याचा अधिकार असावा; (२) प्रत्येक वर्षी नवीन **पार्लमेंट** निवडून नेमावें; (३) मत किंवा संमति घेणें ती गुलिकाद्वारा किंवा लेखद्वारा गुप्त संमति घेत जावी; (४) कोणाही माणसाला स्वतःची जमीन नसतांही **पार्लमेंटांत** बसण्याला प्रत्यवाय नसावा; (५) **पार्लमेंटाच्या** सभासदांना मुशारा मिळत जावा; (६) **पार्लमेंटा**करितां निवडणुकांच्या संबंधानें देशाचे विभाग समान करावे. ह्या सहा मागण्यांपैकीं नंबर ३ आणि ४ हीं मागणीं मान्य होऊन त्यांविषयीं तेव्हांपासून कायदे झाले आहेत; आणि आतां इतक्या पुष्कळ पुरुषांना निवडणुकांत मत देण्याचा अधिकार मिळालेला आहे कीं, पहिल्या नंबरचें मागणें बहुतेक दिल्यासारखेंच आहे. परंतु ज्या समयीं तीं सारीं मागणीं केलीं, त्या समयीं त्यांपैकीं एकही मागणें देणें फारच अविचारीपणाचें काम झालें असतें. त्या **चार्टरा**वर सह्या करणारांना **"चार्टिस्ट्स"** हें नांव पडलें, त्यांनीं, तशांत, **बर्मिंग्हम, शेफ्फील्ड, न्यूपोर्ट** वगैरे गांवांत, लोकांना चिथवून दंगे करवून फार नुकसानी केली.

आन्टि-कॉर्न-लॉ लीग, म्हणजे धान्याविषयीं कायद्यांच्या विरुद्ध कट होतो, १८३८.

दरम्यानच्या वेळांत, विचारी पुरुषांचें एक लहान जूट जमून, ते, सर्व देशावर गजब करणाऱ्या खऱ्या अरिष्टावर कसा एलगार करावा, ह्या गोष्टीची वाटाघाट करीत होते. १८३८ त सेप्टेंबरच्या १८ व्या तारिखेस **मांचेस्टर** एथें एक सभा भरली, आणि परमुलुखी धान्यावरील जकाती काढून टाकण्याविषयीं **सरकाराला** आग्रह किंवा

निकड करण्यासाठीं एक मंडळी स्थापली. ही मंडळीच, जो पुढें **आन्टि-कॉर्न-लॉ लीग** (धान्याविषयीं कायद्यांविरुद्ध कट) नांवाचा कट झाला, त्याची सुरवात होती. त्या कटांत मुख्य पुढाईत, **मांचेस्टर** एथील **रिचर्ड कॉब्डेन** नांवाचा निर्मल बुद्धीचा, प्रामाणिक, कापसाचीं रंगीत छिटें छापून तयार करणारा कारखानदार, आणि त्याचा मित्र **जान ब्राइट** नांवाचा **राचूडेल** एथील गालिचे सत्रंज्या तयार करणारा कारखानदार, हे दोघे होते. पुढील पांच वर्षांपर्यंत, हे दोघे पुरुष, आणि त्यांच्याबरोबर उद्योग करणारे इतर पुरुष, ह्यांनीं, लहान लहान निबंध, व्याख्यानें, आणि भाषणें, ह्यांच्या योगें, हे **कॉर्न लॉझ,** म्हणजे धान्याविषयीं कायदे, गरिबांना किती अन्यायाचे होते हें सर्व लोकांना शिकविलें. कारण, जर बंदरें खुलीं करून परमुलुखी धान्य देशांत येऊं दिल्यानें त्या काळीं किंमत पडत होती तिच्या निम्मे किंमतीला कोणा गरीब माणसाला भाकर विकत मिळण्याजोगी होती तर, बंदरें परमुलुखी धान्याला बंद केल्यामुळें जी दुसरी निम्मे किंमत त्याला ज्यास्त द्यावी लागे, तितका **इंग्लंड** देशांतील शेतकऱ्यांच्या हिताकरितां परिणामीं तो त्या गरीब माणसांवर खरोखर कर बसविल्यासारखा होता. ह्या प्रकारें ज्या लोकांना अगदीं उपासमार पडत होती ते, पर्यायानें किंवा द्वारांतरानें जे खातेपिते किंवा सुखी होते, त्यांना पैसा देत होते, असें म्हणण्यास बाध नाहीं. तथापि त्या धान्याच्या कायद्यांविरुद्ध व्याख्यानकर्त्यांना पहिल्यानें आपल्या श्रोत्यांचीं मनें वळविण्याच्या कामांत मोठें संकटच पडलें. कारण जमीनदार आणि शेतकरी लोकांना, ते व्याख्यानकर्ते सांगत त्या कल्पनांनीं, शेतकऱ्यांना आपल्या जमिनीची लागवड करण्यांत वेळ घालविण्या-

पासून कांहीं फल किंवा अर्थ नाहीं असें होऊन देशाचा नाश होईल असें वाटे, आणि कामकरी लोकांना देखील, धान्यासंबंधी कायदे रद्द करविण्याविषयीं हुटहुट होती तीहून त्या **चार्टराविषयीं** (सनदेविषयीं) हुटहुट फारच होती. परंतु, ते व्याख्यानकर्ते सांगत त्या गोष्टी इतक्या स्पष्ट होत्या आणि त्यांनीं त्या इतक्या कौशल्यानें लोकांपुढें मांडल्या कीं, शेवटीं साऱ्या राष्ट्रांतील लोकांची खातरी होऊं लागली. **लार्ड मेल्बर्न** ह्यानें ह्यापूर्वीच धान्यावर कमी व एक ठरवलेली काईम जकात बसवावी म्हणून **पार्लमेंटां**त उद्दू काढलेला होता, आणि **हौस आफ् कामन्स**मध्यें आपल्या तरफेला बहुपक्ष मिळणें अशक्य झालेलें पाहून त्यानें जेव्हां १८४१ त राजीनामा दिला, तेव्हां **सर राबर्ट पील** हा त्याच्या जागीं मुख्य प्रधान झाला, आणि त्याचें प्रधानमंडल **कान्सर्व्हेटिव्ह** पक्षाचें होतें तथापि त्या प्रकरणीं कांहींतरी तजवीज केली पाहिजे, असें त्याच्या मनांत उतरलें.

राणीचा विवाह, तारीख १० फेब्रुअरी १८४०.

तरुण **राणीला लार्ड मेल्बर्न** हा परम विश्वासू सल्लामसलत देणारा झालेला होता, त्यामुळें त्याच्यापासून वियोग होतांना तिला दुःख वाटलें. परंतु आतां तिला तिचा सुजन पति हाच सर्वोत्तम मित्र आणि मंत्री झाला. १८४० च्या फेब्रुअरींत तिनें आपला **कझन** (मामेभाऊ) **साक्स कोबर्ग**चा **प्रिन्स** (राजपुत्र) **आल्बर्ट** ह्याच्याशीं विवाह केलेला होता, त्यावर तिचें अंतःकरणापासून प्रेम होतें. तें लग्न **इंग्लंडाला** सुखकर किंवा हितकर झालें. त्या राजपुत्रानें सात्विक आणि साचा निपजावें अशाच प्रकारचें तिच्यासारखेंच त्याचें शिक्षण आणि अध्यापन झालेलें होतें. तो आपल्या पत्नीवर निरत किंवा आसक्त असून तिच्या प्रजेच्या हि-

ताला वाहिलेला होता. त्यानें आपल्या प्रेमानें आणि पाठबळानें तिचें जन्म धन्य केलें, आणि विद्या आणि कला ह्यांना प्रोत्साहन देऊन, आणि त्या काळचे बुद्धिमान किंवा ज्ञाते पुरुष आपल्याभोंवतीं जमवून, त्यानें **इंग्लंडाच्या** आबादानीकरितां पुष्कळ प्रयत्न केला. त्याच वेळीं, **राणी** आणि तिची प्रजा ह्यांच्या दरम्यान कधींही न पडण्याविषयीं त्यानें काळजी ठेवली होती; इतकेंच नव्हे, परंतु त्यानें आपली महत्त्वाकांक्षा सर्वथा एका बाजूला ठेवली होती, आणि स्तुतीची हांव न ठेवतां तो बरें किंवा कल्याण करून तृप्त राही.

त्या नव्या प्रधानमंडलाच्या पुढें मोठें खडतर काम येऊन पडलें. **ओ' कॉनेल** हा, **डब्लिन**चा **लार्ड मेयर** (कोतवाल) झालेला होता, तो **आयर्लंड**मध्यें **रिपील आफ् धि यूनियन**, म्हणजे **इंग्लंडाशीं आयर्लंडा**चा झालेला संयोग मोडणें किंवा रद्द करणें, ह्या गोष्टीविषयीं चळवळ सुरू करीत होता. त्याला १८४३–१८४४ ह्या सालीं पकडून त्याची चौकशी झाली, त्या एकाच गोष्टीनें त्या चळवळीची समाप्ति झाली. **स्काटलंडांत प्रेस्बिटीरियन** धर्मांतील जनसंघांत मोठा कलह उत्पन्न होऊन दंगा मातला होता, त्या कलहानें "**फ्रीकर्क**" नांवाचा धर्मसंघ १८४३ त स्थापित झाला.

अफूच्या संबंधाचें चिनाशीं युद्ध, १८३९–१८४२.

चार्टिस्ट्स लोक सर्व देशभर सभा भरवीत होते, आणि **ब्रिटिश** व्यापारी **चिनई** लोकांना त्या देशांतील **सरकारा**च्या इच्छेविरुद्ध अफू विकीत त्या कारणानें १८३९ सालापासून **चीन** देशांत युद्ध चालू होतें. हें युद्ध १८४२ त संपलें, परंतु तें संपण्याच्या पूर्वी, एका साऱ्या **ब्रिटिश** फौजेची **अफघाणिस्तानांत** कत्तल उडाली असें भयंकर वर्तमान **हिंदुस्तानां**तून आलें.

इंग्लिश लोक फारा दिवसांपासून **हिंदुस्तानाचा** अधिकाधिक भाग हळू हळू खालसा करीत, म्हणजे आपल्या राज्याला जोडीत, चालले होते; एथपर्यंत कीं, **एशिया** खंडाच्या ज्या भागांत **रशियन्स** लोकांचें भारी वजन वाढत चाललेलें होतें त्या भागांच्या, आणि **इंग्लिशांच्या** सत्तेखालच्या मुलुखाच्या, दरम्यान फक्त **पंजाब** आणि **अफघाणिस्तान** एवढीं दोनच राज्यें राहिलेलीं होतीं (नकाशा नंबर ६ पहा). **इंग्लिश सरकाराला**, **रशियन्स** लोक **अफघाण** लोकांशीं दोस्ती जोडून **हिंदुस्तानावर** हल्ला करतील, अशी निरंतर भीति पडलेली होती. हें अरिष्ट टाळण्यासाठीं, **अफघाण** लोकांशीं व्यापारसंबंधाचा तह करण्याकरितां १८३७ सालीं **सर अलेक्झांडर बर्न्स** ह्याला **काबुलास** पाठविलें. तो तेथें असतां, **अफघाणांचा अमीर, दोस्त महंमदखान,** ह्यानें **रशियन्स** लोकांशीं कांहीं कारस्थान चालविलें आहे, असा संशय आला, म्हणून, त्या काळचा **हिंदुस्तानचा गव्हर्नर-जनरल, लार्ड ऑक्लंड,** ह्यानें अविचारानें **अफघाणिस्तानांत** फौज पाठवून, **दोस्त महंमदाला** पदच्युत करून, त्याच्या जागीं दुसऱ्या एका सरदाराला गादीवर बसविलें. ह्या कृत्याचा परिणाम असा झाला कीं, त्या जलाल, लढवय्ये, आणि विश्वासघातकी, **अफघाण** लोकांनीं, १८४१ त नोव्हेंबरच्या २ ऱ्या तारिखेस, **सर अलेक्झांडर बर्न्स** ह्याला दग्यानें ठार मारलें, आणि त्यांच्याशीं **सर वुइलियम माक्नॉटन** हा सलूख्याचें बोलणें करीत होता, त्यालाही पुढें दीड महिन्यानें तसेंच ठार मारलें. हा प्रकार झाल्यानंतर **जनरल (सेनापति) एलिफन्स्टन** ह्याच्यानें पुढें **काबूल** एथें आपला टिकाव काढवेनासें झालें, आणि **अफघाणांचा** अमीर **अकबर-**

अफघाणिस्तानांतील अरिष्टें, १८४१.

खान ह्याकडून तुमच्या फौजेला सुरक्षितपण माघारें जाऊं देऊं असें त्याला वचन मिळालें, म्हणून त्यानें **हिंदुस्तानास** परत जाण्याचा निश्चय केला. परंतु ह्या वचनाचा अव्हेर करून, **अफघाण** लोक **खुर्द काबूल** नांवाच्या बारीच्या दोहों बाजूंच्या उंच खडकांमध्यें छपून राहिले, आणि खालीं त्या बारींतून त्यांच्या पुढून त्या फौजेचे शिपाई चालून जाऊं लागले, तेव्हां त्यांपैकीं एकेकाला त्यांनीं गोळ्यांनीं टिपलें. सारांश तो एकंदर वृत्तांत फार भयंकर झाला, तो सांगण्याला त्या फौजेपैकीं फक्त **डॉक्टर ब्रैडन** नांवाचा एक पुरुष त्या कत्तलींतून निसटून पळून आला, आणि **खुर्द काबूल** आणि **खैबर** नांवाची बारी ह्यांच्या दरम्यान **जिल्लालाबाद** नांवाचा किल्ला **सर राबर्ट सेल** हा धरून राहिलेला होता, तेथें तो **डॉक्टर ब्रैडन** अर्धमेला झालेला येऊन पोहोंचला. **इंग्लंडानें** त्या अपमानाचा सूड उगवला हें खरें, आणि **जनरल पॉलॉक** आणि **सर राबर्ट सेल**, ह्यांच्या हुकमतीखालीं एका फौजेनें, जाऊन **काबूल** पुनः घेतलें, आणि बायका व मुलें तेथें पाठीमागें राहिलेलीं होतीं त्यांना शत्रूंपासून सोडविलीं. परंतु त्या भयंकर बारींत ४५०० कवाईत शिकलेले शिपाई आणि १२००० बाजारबुणग्यांपैकीं माणसें ठार मरून पडलीं, आणि पूर्वेकडील देशांत **इंग्लिशांच्या** सत्तेला जबर धक्का बसला होता.

ह्या परमुलुखांतील अरिष्टांना भर पडण्याला, स्वदेशीं जमाबंदीच्या संबंधानें अडचणी उत्पन्न झालेल्या होत्या. **लार्ड मेलबर्नचें** प्रधानमंडल राज्याच्या तिजोरीला पंचवीस लक्ष पौंड कर्ज करून सोडून गेलें. तें कर्ज वारलें पाहिजे होतें, म्हणून **पील** ह्यानें ती अडचण निभावण्याकरितां, **"इन्कम-टाक्स"** (प्राप्ति-

इन्कम-टाक्स बसविला, १८४२.

कर) नांवाचा एक कर बसविण्याचा निश्चय केला. सालीना दीडशें पौंडांहून ज्यास्त प्राप्ति असलेल्या प्रत्येक माणसानें आपल्या प्राप्तीच्या रकमेवर दर पौंडीं अमुक ह्या मानानें सरकाराला कर म्हणून रकम दिली पाहिजे, अशी योजना केलेली होती. हा कर फक्त तीन वर्षें चालू राहावा, आणि तो दर पौंडीं सात पेन्सांहून ज्यास्त कधींही नसावा असा मूळचा ठराव होता. परंतु तो १८४५ त फिरून दुसरीं तीन वर्षें बसविला, आणि तेव्हांपासून तो कधींही बंद केला नाहीं. त्या कराचा दर शिकस्त वाढला तो १८५५–५७ सालांत, दर पौंडीं १ शि. ४ पे. झालेला होता, आणि अति कमी दर तो १८७४–१८७६ सालांत दर पौंडीं २ पे. झालेला होता.

दुसऱ्या पक्षीं, पील ह्यानें देशांत आणलेल्या परमुलुखी मालावरील आणि मुख्यत्वेंकरून धान्यावरील जकाती कमी करण्यासाठीं आपल्याकडून होईल तितका प्रयत्न केला. तथापि देशांत विपत्ति अजून पूर्वींसारखीच राहिलेली होती, आणि पूर्वींहून ती अधिकच होणार होती. १८४५ त इंग्लंडांत सुगी बिलकूल साधली नाहीं, किंवा अगदीं बुडाली, आणि बटाट्यांवर रोग पडून आयर्लंडांतील जें मुख्य अन्न तें नष्ट झालें. दुष्काळ समीप येऊन ठेपला, आणि बंदरें खुलीं करून परमुलुखी धान्य देशांत येऊं द्या म्हणून लोक एकच मोठा ओरडा करून गजब करूं लागले. कॉब्डेनचें म्हणणें रास्त आहे, अशी पील ह्याची हळूहळू खातरी झालेली होती, त्यानें धान्यावरील जकाती किंवा कर काढून टाकण्याविषयीं एका कायद्याचा मसुदा तयार करून पार्लमेंटापुढें आणावा असा उहू काढला, आणि त्याच्यानें इतर प्रधानांकडून आपलें म्हणणें मान्य कर-

सुगी वाईट होऊन बटाट्यांवर रोग पडतो, १८४५.

ववेना म्हणून त्यानें राजीनामा दिला, आणि **लार्ड जान रस्सेल** ह्यानें धान्याविषयींच्या कायद्यांविरुद्ध एक सणसर पत्र लिहिलेलें होतें, त्याला आपली जागा पतकरण्यास आज्ञा करावी अशी त्यानें **राणीला** सल्ला दिली. आतां पुढें जें वृत्त घडलें त्यावरून मुख्य प्रधानाला काय काय अडचणी येतात हें कळण्याला साधन होईल. **लार्ड जान रस्सेल** ह्याच्याकडून प्रधानमंडल बनविणें होईना, कारण, त्याचे मुख्य पुरस्कर्ते **लार्ड ग्रे** आणि **लार्ड पामर्स्टन**, ह्या दोघांनाही धान्याचा व्यापार अप्रतिबंध किंवा प्रतिबंधशून्य व्हावयाला पाहिजे होता खरा, तथापि परराष्ट्रांशीं चालणाऱ्या व्यवहारसंबंधांत त्यांचें **लार्ड जान रस्सेल** ह्याशीं एकमत होईना. म्हणून **राणीनें पील** ह्यालाच पुनः कामावर येण्यास सांगितलें, आणि धान्याविषयींचे कायदे, **लिबरल** पक्षाच्या प्रधानाकडून रद्द न होतां, **कान्सर्व्हेटिव्ह** पक्षाच्या प्रधानाकडून कां रद्द झाले ह्याचें कारण हेंच होय.

पील हा प्रतिबंधशून्य व्यापार असावा ह्या मताचें पुष्टीकरण करतो, १८४६.

लार्ड जान रस्सेल ह्याच्यानें प्रधानमंडल बनवत नाहीं.

पुढें धान्यांविषयीं कायदे रद्द करण्यासाठीं एका कायद्याचें आपलें **बिल**, म्हणजे मसुदा, **पार्लमेंटापुढें** आणण्याचा **पीलचा** हेतु आहे ही गोष्ट लवकरच प्रसिद्ध झाली, आणि त्यामुळें सर्व देशभर अतिशय खवळाखवळ झाली. **कॉब्डेन** ह्यानें आपल्या परिश्रमाचें फल आतां शेवटीं आपल्या नजरेनें पाहिलें. **मांचेस्टर** एथें एक सभा भरली तींत एका दीड तासांत त्यानें उचललेल्या कामाच्या साहाय्यार्थ ६०००० पौं-

धान्याविषयींचे कायदे रद्द होतात, तारीख २६ जान्युअरी १८४६.

डांहून कमी नाहीं इतकी रक्कम वर्गणीनें जमा झाली. १८४६ त जान्युअरीच्या २२ व्या तारिखेस **हौस आफ् कामन्स**मध्यें, "**प्रोटेक्शन**" (व्यापारसंगोपन), म्हणजे व्यापाराला सरकारचें संगोपन पाहिजे हें मत, मीं कां सोडलें, आणि "**फ्री ट्रेड**" म्हणजे प्रतिबंधशून्य किंवा करविरहित व्यापार असावा हें मत स्वीकारून त्याविषयीं मीं उहू कां काढला, हें एका वाक्पाटवप्रचुर भाषणांत **पील** ह्यानें व्यक्त करून सांगितलें, आणि त्याच सालच्या जून महिन्याच्या २५ व्या तारिखेस एक धान्याविषयींचे कायदे रद्द करण्याविषयीं **बिल्ल हौस आफ् लार्ड्स**मध्यें पसार झालें, आणि धान्याविषयींचे कायदे रद्द झाले. त्या कायद्यांत १८४९ साच्या फेब्रुअरीपर्यंत धान्यावरील जकात हळू हळू कमी होत जावी असा ठराव होता, आणि त्या सालच्या त्या महिन्यांत दर क्वार्टरीं एक शिलिंग इतकीच काईम जकात उरली. ही एक शिलिंग जकात देखील १८६९ सालीं काढून टाकली. ही **पील** ह्याची शेवटची मोठी सुधारणा होती, कारण त्याचे जुने मित्र त्यावर फार रागावले, आणि **डिझरेली** (हा पुढें लार्ड बेकन्स्फील्ड हा किताब पावला) ह्यानें त्यावर एका समयीं भाषणांत कडक शब्दप्रहार केले. **पार्लमेंटांत** एक "**प्रोटेक्शन**" (व्यापारसंगोपन) पक्ष बनला, आणि जेव्हां **आयर्लंडां**त गुन्हे बंद करण्यासाठीं एक "**कोअर्शन बिल्ल**" म्हणजे कित्येक गोष्टी जुलुमानें बंद करण्यासाठीं कायद्याचा मसुदा, **पील** ह्याच्या मनांत **पार्लमेंटां**त आंणावयाचा होता, तेव्हां ह्या व्यापारसंगोपन–पक्षांतले लोक त्या **पील**च्या विरुद्ध **लिबरल** पक्षाला मिळाले. ज्या रात्रीं **हौस आफ् लार्ड्स** ह्यांनीं धान्याविषयीं कायदे रद्द करणारा कायदा पसार केला, त्याच रात्रीं

पील ह्याला राजीनामा देणें भाग पडलें, आणि लार्ड जान रस्सेल हा मुख्य प्रधान झाला.

१८४६ पासून १८५४ पर्यंतचीं पुढलीं आठ वर्षें हीं चार गोष्टींकरितां मुख्यत्वेंकरून ध्यानांत ठेवण्याजोगीं आहेत. त्या गोष्टी येणेंप्रमाणें, (१) चार्टिस्ट्स लोकांचा पाडाव झाला, (२) पंजाब खालसा केला, (३) वसविलेल्या राज्यशाखांत सोन्याच्या खाणींचा शोध लागला, आणि (४) १८५१ सालीं जगडवाळ सकलराष्ट्रीय प्रदर्शन झालें. १८४८ त पारिसांत दुसरी एक उलथापालथ किंवा राज्यक्रांति झाली. तथील राजा लूइ फिलिप्प हा इंग्लंडांत पळून आला, आणि फ्रान्स देशांत लोकसत्ताकराज्य स्थापित झालें. सर्व यूरोपांत अस्वस्थता झालेली होती. इटली, आस्ट्रिया, आणि प्रुशिया ह्या देशांत बंडें उद्भवलीं आणि त्या देशांतील राजांना आपआपल्या प्रजांना पार्लमेंटें देणें भाग आलें. आयर्लंडांत १८४७ त जेव्हां भयानक दुष्काळ पडला, तेव्हां, "यंग आयर्लंडर्स" (तरुण आयरिश लोक) नांवाच्या एका परमावधीस पावलेल्या पक्षानें, समाजानें, किंवा संघानें, स्मिथ ओ' ब्रायन नांवाच्या पुरुषाच्या हुकमतीखालीं, बंड केलें, परंतु त्याचा तत्काळ मोड केला. इंग्लंडांत चार्टिस्ट्स लोकांना आपल्या चार्टरकरितां (सनदेकरितां) आतां चळवळ करतां येईल असें वाटलें. त्यांनीं एक अर्ज तयार केला, त्यावर पन्नास लक्ष लोकांच्या सह्या होत्या असें म्हणतात, आणि नार्टिंग्हमचा सभासद किंवा प्रतिनिधि, फीर्गस ओ' कॉन्नॉर, ह्यानें १८४८ त एप्रिलच्या १० व्या तारिखेस केन्निंग्टन कॉम्मन नांवाच्या मोठ्या मैदानांत एक

यूरोपाची अस्वस्थतेची किंवा दंग्याची स्थिति, १८४८.

सनाठीं सभा भरविली, आणि तेथून त्या सर्व लोकांनीं हौस आफ् कामन्स एथें डौलानें मिरवत जाऊन तो अर्ज द्यावा अशी योजना केली. तेव्हां सर्व लंडन शहराला मोठी दहशत पडली; सरकारानें ती मिरवणूक बंद केली; वेलिंग्टनचा ड्यूक ह्यानें लंडनच्या सर्व भागांत दृष्टीआड लष्करी शिपाई ठेवले; आणि दंगाधोपा निवारण्यासाठीं त्या वेळापुरते पोलीसच्या शिपायांचीं कामें आपखुशीनें करण्यास तयार अशा सुखवस्तू २००००० दोन लक्ष सभ्य गृहस्थांनीं वेगळाल्या पारिशांतील देवळांच्या व्हेस्ट्री-हा-ल्सांत (पारिशांतील गांवकीसंबंधानें मंडळ्या जमण्याच्या खोल्यांत) शपथा घेऊन ते पोलीसचे शिपाई बनले. परंतु त्या साऱ्या आडंबरापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. फक्त पंचवीस हजार लोक त्या मैदानांत जमले. मिरवणूक तर झालीच नाहीं. तो अर्ज एका क्याबमध्यें (घोड्याच्या एका प्रकारच्या गाडींत) घालून वेस्टमिन्स्टर एथें नेला. तेव्हां त्यावर वीस लक्षांहूनही कमीच सह्या होत्या, आणि त्यांपैकीं पुष्कळ तर केवळ कपटाच्या किंवा लटक्या होत्या, असें कळून आलें. सारांश खरोखर १८४२ सालापासून पहिल्यापेक्षां देश आबादान होत चालला होता, आणि लोकांना आतां खाण्याला पोटभर अन्न मिळूं लागल्यामुळें ते त्या चार्टरबद्दल (सनदेबद्दल) परवा करीत नव्हते. त्या वेळापासून चार्टिस्ट्स लोकांचें अ-धिकोत्तर कांहीं ऐकूं येईनासें झालें.

चार्टिस्ट्स लोकांचा पाडाव होतो, १८४८.

पुढील सालीं म्हणजे १८४९ त नाव्हिगेशन लॉज (अमुक जहाजांनीं अमुक माल आणावा न्यावा ह्या संबंधाचे कायदे) ह्या नांवाचे एकंदर कायदे रद्द केले, आणि १८५० त इंग्लंडांतील

अत्युत्तम आणि पराकाष्ठेच्या शाहण्या राजनीतिविशारद पुरुषांपैकीं एक पुरुष गमावला. **सर राबर्ट पील** हा आपल्या घोड्यावरून पडून ठार मेला. त्या योगें साऱ्या राष्ट्रांतील लोकांना फार दुःख होऊन त्यांची हिम्मत खचली.

सर राबर्ट पील ह्याचा मृत्यु, १८५०.

दरम्यानच्या काळांत, पृथ्वीच्या दुसऱ्या बाजूस **ब्रिटिशांच्या** सत्तेखालचें राज्य वाढत होतें. १८४३ त **सर चार्लस नेपियर** ह्यानें **सिंध** प्रांतांतील तद्देशीय राजे ह्यांना जिंकून तो प्रांत खालसा केला. १८४५ आणि १८४९ ह्या दोन सालांत, **हिंदुस्तानाच्या** वायव्येकडे, जवळ जवळ **इंग्लंडा**इतका मोठा, **पंजाब** नांवाचा एक प्रांत आहे, त्यांत राहणाऱ्या **शीख** नांवाच्या एका शूर जातीच्या लोकांत आपआपसांत कलह होऊन, त्यांनीं **इंग्लिशांच्या** सरहद्दीवर स्वाऱ्या करून भारी उपद्रव दिला. शेवटीं **लार्ड गॉफ** ह्यानें १८४९ त फेब्रुअरीच्या २१ व्या तारिखेस **गुजरात**च्या लढाइंत जय मिळविल्यानंतर त्या वेळचा **हिंदुस्तानचा गव्हर्नर जनरल लार्ड डाल्हौसी** ह्यानें तो सर्व प्रांत खालसा करून किंवा **ब्रिटिशांच्या** राज्याला जोडून त्यावर अमल करण्याला **कर्नेल हेन्री लॉरेन्स**, त्याचा भाऊ **जान लॉरेन्स**, आणि **चार्लस ग्रेन्व्हिल्ल मान्सेल**, ह्या तिघांचें मिळून एक **बोर्ड**, म्हणजे मंडल किंवा मंडळी, नेमली. त्या दोघां **लॉरेन्स** उपनांवाच्या बंधूंच्या खंबीर आणि न्यायी अमलानें त्या शूर **शीखांच्या** अंतःकरणांत पूज्यभाव उत्पन्न केला. त्याच **शीखांनीं** पुढें आठ वर्षांनीं **हिंदुस्तानांतील** पलटणी शिपायांच्या भयंकर दंग्यामध्यें **इंग्लिशांची** फार चांगली कामगिरी बजावली.

पंजाब प्रांत खालसा केला किंवा ब्रिटिशांच्या राज्याला जोडला, १८४९.

१८४९ सालीं **कालिफॉर्निया** ह्या नांवाचा मुलूख नुकताच **युनायटेड स्टेट्स** (संयुक्त संस्थानें) ह्यांच्या सत्तेखालीं आलेला होता, त्या मुलुखांत सोनें सांपडतें असा त्या सालीं प्रथम शोध लागला, आणि **आस्ट्रेलियांतील व्हिक्टोरिया** नांवाच्या नवीन वसविलेल्या राज्यशाखेंत सोनें सांपडतें असा १८५१ त शोध लागला. ह्या शोधांनीं जी संवृद्धि झाली ती अगदीं वेगळ्या प्रकारची होती. सोन्याच्या किंमतींत चढउतार किंवा तेजी मंदी झाल्यानें परिणाम काय होतो हा प्रश्न फार कठीण आहे, आणि ज्यांना तत्संबंधी माहिती सर्वांहून विशेष आहे, त्यांचें देखील त्या प्रश्नाच्या संबंधानें पूर्ण मतैक्य होत नाहीं. परंतु त्या शोधांपासून दोन गोष्टी खचीत झालेल्या आहेत, त्या ह्या; १८५१ सालीं नवीन वसविलेल्या राज्यशाखांत सोन्याचा शोध लागल्यापासून आमच्या देशीं सर्व वस्तु पूर्वींहून स्वस्त झाल्या आहेत, आणि लोकांमध्यें त्या योगानें मोठी उठावणी किंवा आवेश उत्पन्न होऊन, पुष्कळ लोक प्रवृत्त होऊन त्या सोन्याच्या खाणींच्या प्रदेशांतच नव्हे, परंतु इतर वसविलेल्या राज्यशाखांतही, स्वदेशत्याग करून, राहवयास गेले. ह्या काळापासून त्या **कॉलोनिझ**चा, म्हणजे नवीन वसविलेल्या राज्यशाखांचा, इतिहास फार महत्वाचा होऊं लागला. **केप आफ् गुड होप** एथील वसाहत, **हिंदुस्तान**च्या वाटेवर असतांही, तिची संवृद्धि सर्वांत कमी झाली, कारण कीं तेथें **इंग्लिश** लोक जाण्याच्या पूर्वीं जे **डच बोअर्स** नांवाचे लोक जाऊन वसाहत करून राहिले होते, ते तद्देशीय मूळच्या लोकांशीं निरंतर कलह करीत असत, त्यामुळें **इंग्लिशांना** लहान लहान युद्धांत पडावें लागे. तथापि **काफर्स** आणि **झुलूझ**, ह्या लोकांशीं

सोन्याचा शोध लागतो, १८४९–१८५१.

चकमकी झडत असतांही इंग्लिशांचें तेथील राज्य वाढतच होतें.

केप कॉलोनीला पृथक राज्यव्यवस्था मिळते, १८५०.

नटाल हीं १८४३ त ब्रिटिशांची वसविलेली राज्यशाखा झालेली होती, आणि केप आफ् गूड होप ह्या राज्यशाखेला १८५० त पृथक राज्यव्यवस्था करून दिली, तथापि १८७४ सालापर्यंत पूर्ण स्वातंत्र्यानें तेथील सरकार आपला सर्व राज्यकारभार करीत नव्हतें.

आस्ट्रेलियामध्यें सर्व गोष्टींविषयीं संवृद्धि विशेष त्वरेनें झाली. आस्ट्रेलियांतील मूळचे राहणारे लोक उन्नतीच्या संबंधानें इतक्या निकृष्ट स्थितींत आणि हलक्या पदवीस पावलेले होते कीं, त्यांचा गौरवर्ण लोकांपुढें टिकाव न लागून ते लवकर वठणीस आले. न्यू झीलंडांतील मूळचे राहणारे बुद्धिमान माओरिझ हे लवकर निवळून, सन्मार्गी आणि शांत किंवा कलहपराङ्मुख नगरवासी लोक बनले. १८३७ सालीं, एड्वर्ड गिब्बन वेकफील्ड (हा पुढें कानडा देशांत लार्ड डर्हम ह्याचा सेक्रेटरी झाला) ह्यानें न्यू झीलंडांत वसाहत करण्यासाठी लंडनांत एक कंपनी उभारली होती; आणि त्याचा

न्यु झीलंड बेटांत वसाहतींची स्थापना, १८३९–१८५०.

भाऊ कर्नल वेकफील्ड हा न्यू झीलंड नांवाच्या दोहों बेटांपैकीं उत्तरेकडील बेटांत गेला, आणि, कूक्स स्ट्रेट्स नांवाच्या सामुद्रधुनीच्या कांठीं पोर्ट निकल्सन नांवच्या बंदरगांवीं त्यानें वसाहत केली. त्या वसाहतीच्या सभोंवतीं वेलिंग्टन नांवाचा प्रांत वसला. १८३९ त इंग्लंडांतील सरकारानें न्यू झीलंड ही वसाहत खुद्द इंग्लंडच्या राणीच्या ताब्यांत ठेवली आहे असें जाहीर केलें, आणि १८४० त तेथल्या

माओरी जातीच्या राजांनीं, **वैटान्गी** एथें तह केला, त्या तहानें, त्यांपासून किंमत देऊन ज्या जमिनी आणि जंगलें विकत घेतलीं जातील त्यांखेरीज, बाकीच्या त्यांच्या जमिनी आणि जंगलें त्यांनीं आपल्याकडे ठेवून, त्या दोन्हीं बेटांचें स्वामित्व **ग्रेट ब्रिटनास** दिलें. पुढें **माओरिझ** लोकांच्या देशानजीक उत्तरेकडील बेटांत **ऑक्लंड** नांवाचें दुसरें ठाणें घातलें. नंतर दक्षिणेकडील बेटांत एकामागून एक ठाणीं व वसाहती झाल्या त्या येणेंप्रमाणें. १८४१ त **नेलसन** नांवाची वसाहत, १८४८ त **ओटागो** नांवाची, आणि १८५० त **कांटबेरी** नांवाची, **क्राइस्टचर्च** नांवाच्या त्याच्या मुख्य शहरासुद्धां वसाहत करणाऱ्या लोकांना जमीन मुफत न देतां विकत देऊन तिचें उत्पन्न येईल तें रस्ते व पूल बांधण्याकडे खर्च करावयाचें असा **वेकफील्ड** ह्याचा परिपाठ असल्यामुळें, अवलीला **न्यू झीलंडांत** वसाहत करण्याला जाणारे, तेथें जाऊन नवा संसार मांडण्याला जवळ कांहीं तरी गांठीस पैसा असणारे असेच मुख्यत्वेंकरून लोक होते.

वैटान्गी एथील तह, १८४०.

त्या देशाची आबादानी होण्याला मोठ्या हरकती म्हटल्या म्हणजे, फक्त १८६१ पासून १८६८ पर्यंत **माओरिझ** लोकांशीं झालेलीं युद्धें होत. १८६८ पासून तद्देशीय लोक **इंग्लिशांशीं** पूर्ण मित्रभावानें वागत आहेत, आणि **न्यू झीलंडांतील पार्लमेंटांत** त्यांच्यावती **माओरी** जातीचे सभासद किंवा प्रतिनिधि आहेत.

माओरी लोकांशीं युद्धें, १८६१–१८६८.

ह्या प्रकारें, आतां **आस्ट्रलेशियन**, म्हणजे आस्ट्रलेशिया नांवाच्या द्वीपसमूहांत वसविलेल्या, **इंग्लंडच्या** राज्यशाखा सात आहेत, त्या ह्या; **न्यू झीलंड**, **टास्मेनिया**, आणि **आस्ट्रेलियाम-**

धील पांच राज्यशाखा. १८५० त लार्ड जान रस्सेल ह्यानें, न्यू साउथ वेल्स, व्हिक्टोरिया, साउथ आस्ट्रेलिया, आणि टास्मेनिया, ह्या चार राज्यशाखांना, पृथक एक एक इंग्लंडांतून गव्हर्नर मात्र नेमला जात जावा, आणि त्याच्या हाताखालीं आवडेल त्या प्रकारची राज्यव्यवस्था तेथील लोकांनीं पसंत करून स्थापावी, अशी मोकळीक देणाऱ्या एका कायद्याचा मसुदा पसार करविला; आणि पुढें थोड्या वर्षांनीं बाकीच्या तीन राज्यशाखांना त्याप्रमाणेंच आपली राज्यव्यवस्था करण्याची परवानगी मिळाली. न्यू झीलंडला तसली राज्यव्यवस्था करण्याची परवानगी १८५२ त मिळाली. मध्यावधींत १८५१ तील सोन्याच्या वेडानें त्या राज्यशाखांत स्वदेशत्याग करून राहवयास जाणाऱ्या लोकांचे लांबचलांब तांडे ओढून नेले, आणि त्या योगें मूळचा प्राचीन देश इंग्लंड आणि त्या राज्यशाखा ह्यांच्या दरम्यान जाण्यायेण्याची सतत वहिवाट पडली, तिच्यामुळें, त्या राज्यशाखांत स्वतंत्र राज्यव्यवस्था असूनही, तेथील लोक इंग्लंडाशीं अंत:करणानें आणि हितानें बद्ध झाले.

आस्ट्रेलियांतील वसविलेल्या राज्यशाखांसंबंधी कायद्याचा मसुदा, १८५०.

तेंच १८५१ वें साल पृथ्वीवरील "सर्व राष्ट्रांतील उद्योगधंदे आणि कसबें ह्यांच्या प्रचंड प्रदर्शनाचें" साल होतें. सर्व पृथ्वीवर सर्व प्रकारचे उद्योगधंदे उत्कृष्टतेच्या ज्या ज्या स्थितीला (पायरीला) पावलेले होते, त्या स्थितीची जितीजागती तसबीर पाहण्यास मिळावी, आणि इंग्लिश कारागिरांना इतर राष्ट्रांतील लोक कोणकोणते जिन्नस किंवा चिजा निर्माण करतात हें समजून घेण्यास प्रोत्साहन करावें, ह्याकरितां, त्या प्रदर्शनाचा घाट (कल्पना) मु-

१८५१ सालचें प्रचंड प्रदर्शन.

ख्यत्वेंकरून **प्रिन्स आल्बर्ट** नांवाचा जो **प्रिन्स कॉन्सॉर्ट**, म्हणजे **राणीचा** पति, होता, त्यानें प्रथम रचला आणि तो सिद्धीस नेला. **धि क्रिस्टल पालस** (बिलोरी राजमंदिर) ह्या नांवाचा जो इमला **सिडेन्हम** एथील भूमीवर आतां उभा आहे तीच इमारत **सर जोसेफ पाक्स्टन** ह्यानें ह्या दिव्य प्रदर्शनाकरितां बांधली. तें प्रदर्शन फारच उत्तम प्रकारानें सिद्धीस गेलें, आणि त्या वेळीं तर त्यापासून फार उपयोग झालाच, आणि त्यानें पुढें तसलीं दुसरीं प्रदर्शनें करण्याची प्रवृत्ति उत्पन्न केली, हाही त्यापासून तसाच फार उपयोग झाला. युद्धें समाप्त होऊन सर्व राष्ट्रें स्वस्थतामूलक उद्योगधंद्यांत वर्चस्व मिळविण्याकरितां मात्र परस्परांशीं झगडतील अशा नवीन काळाच्या आरंभाचें द्योतक तें प्रदर्शन होईल म्हणून पुष्कळ लोकांनीं आशा केलेली होती, तीप्रमाणें तें प्रदर्शन तत्कालारंभक न होतां, तें प्रदर्शन कांहींसें शांतीच्या पसतीस वर्षांची समाप्ति करणारें असें प्रत्ययास आलें, कारण त्या प्रदर्शनाच्या सालापासून झोंबटें उत्पन्न झालीं.

पारिसांतील कू-डे-टा. (कपट) नीतीचा किंवा जुलमाचा आकस्मिक घाला, तारीख २ डिसेंबर १८५१.

तें प्रदर्शन पुरतें बंद झालें नव्हतें तोंच, **फ्रान्सांतील** लोकसत्ताकराज्याचा तीन वर्षें **प्रेसिडेन्ट** (अध्यक्ष) असलेला, **प्रिन्स लूइ नपोलियन**, ह्यानें **पारिस**शहरचे रस्ते फौजेनें व्याप्त केले, ज्या कोणीं लोकांनीं प्रतिकार केला त्यांना गोळ्या घालून ठार मारलें, आपले राज्यसंबंधानें विरोधी होते त्यांना पकडून कैदेंत टाकलें, आणि आपणाला दहा वर्षें **प्रिन्स प्रेसिडेन्ट** (अध्यक्षराज) करण्याविषयीं समजूत करून **फ्रेंच** लोकांचें मन वळविलें, ही खबर येऊन साऱ्या **इंग्लंडाला** दहशत पडली. पुढें

एका वर्षानें तिसरा नपोलियन ह्या नांवानें तो सम्राट् किंवा बादशाहा झाला. पहिल्या नपोलियनानें उत्पन्न केलेली विपत्ति आणि हालअपेष्टा ज्यांना स्मरत होती त्यांना, तोच प्रकार पुनः सुरू होतो कीं काय, अशी भीति पडली; आणि तरुण तरुण इंग्रेज लोकांनीं आपखुशीनें लष्करी शिपायांची नौकरी करण्यास तयार अशा लोकांच्या पलटणी देशाच्या संरक्षणासाठीं बनविण्याला आरंभ केला. परंतु त्या समयीं लार्ड पामर्स्टन हा परमुलखी खात्यासंबंधी सेक्रेटरी होता त्याला लूइ नपोलियनाची पक्की माहिती होती; आणि तो नपोलियन ज्या इंग्लंडांत पुष्कळ वर्षे राहिलेला होता त्या इंग्लंडावर स्वारी करील अशी त्या पामर्स्टनला बिलकूल भीति नव्हती. हा पामर्स्टनचा कयास खरा ठरला, कारण तो तिसरा नपोलियन आपल्या जन्मभर इंग्लंडचा खंबीर दोस्त बनून राहिलेला होता. तथापि, डिसेंबरच्या २ ऱ्या तारिखेच्या फ्रान्स देशांतील कत्तलीला कू-डे-टा असें म्हणत, ती कत्तल अन्यायाची नव्हती अशी पामर्स्टन तिची संपादणी करूं लागला तें मात्र वाजवी नव्हतें, आणि त्याबद्दल त्यावर राणीची फारच इतराजी झाली.

पहिले आपखुशीनें लष्करी शिपायांची नौकरी करण्यास तयार झालेले लोक, १८५२.

परंतु जरी फ्रान्सदेशापासून इंग्लंडाला कांहीं उपसर्ग लागला नाहीं तरी, यूरोपांत युद्ध अगदीं सन्निध येऊन ठेपलें. १८५२ त, जरूसलेम एथील पवित्रस्थानांसंबंधानें, आणि डान्यूब नदीच्या कांठच्या ज्या देशांत टर्कीचा अंमल होता त्यांतील ख्रिस्ती लोकांच्या संरक्षणाच्या संबंधानें, रशिया आणि टर्की ह्यांचा कलह जुंपला. रशियाचा बादशाहा, निकोलस, ह्याचा विचार असा होता कीं, ते डान्यूब नदीच्या कांठचे देश बलात्कारानें घेण्याच्या

कामीं **इंग्लिश** लोक आपणाला साहाय्य करतील तर आपण, त्याच्या मोबदला, **ईजिप्ट** आणि **कांडिया** हीं जिंकून घेण्याच्या कामीं **इंग्लिशांना** कुमक करूं, म्हणजे **ट-र्कीशीं** आपल्या कलहाच्या प्रकरणाचा निकाल होईल. परंतु **इंग्लंडानें** आपल्या शेजाऱ्याचा मुलूख निष्कारण गिळंकृत करण्याचें नाकारिलें, आणि **यूरोपांतील** मुख्य मुख्य राजांनीं बखेडा न होऊं देतां सल्ला राखण्याविषयीं **रशियाच्या बादशाहाचें** मन वळविण्यासाठीं पराकाष्ठेचा प्रयत्न केला. परंतु **निकोलस** हा आवेशी आणि हेकेखोर होता. त्याचा तर्क होता कीं आपण कांहीं केलें तरी **इंग्लंड** युद्धाच्या भानगडींत पडणार नाहीं. म्हणून, **टर्कींतील खिस्ती** लोकांच्या संरक्षणाचा अधिकार आपणाला देत नाहीं असें जेव्हां **टर्क्स** लोकांनीं साफ सांगितलें, तेव्हां त्यानें **डान्यूब** नदीच्या कांठच्या **टर्कीच्या** अमलाखालच्या संस्थानांत फौज पाठविली. नंतर **टर्क्सांनीं डान्यूब** नदी ओलांडून जाऊन **रशियन्सांचा** खुशकीवरून पराभव केला, आणि **रशियन्सांनीं** १८५३ त नोव्हेंबरच्या ३० व्या तारिखेस, **सिनोपे** एथें **टर्क्स** लोकांचें अरमार जाळून उसनें फेडलें. त्या कलहांत **इंग्लंड** पडलें नसतें तर फार चांगलें झालें असतें, असें आतां पुष्कळ लोकांचें एकसारखें मत पडतें; आणि **लार्ड आबर्डीन** हा त्या वेळीं मुख्य प्रधान होता, त्यानें समेट राखण्याकरितां होईल तितका प्रयत्नही केला. परंतु **लार्ड पामर्स्टन** हा त्या वेळीं मुलकी खात्याचा **सेक्रेटरी** असून, परमुलखी खात्यावर त्याची हुकमत नसतांही, त्याचें प्रधानमंडलामध्यें वजन फार होतें, आणि **काळ्या समुद्रांतील रशियाचें** प्राबल्य मोडण्याची त्याला फार हुटहुट होती, तशांत मागें **अफघाणि-**

दी ईस्टर्न क्वेश्चन, म्हणजे पूर्वेकडील प्रकरण किंवा लढा, १८५३.

स्तानांत इंग्लिशांवर जें अरिष्ट कोसळलें होतें, तें घडवून आणण्याला रशियन्सांचें कारस्थान कसें सहाय झालेलें होतें हें इंग्लिश लोकांना स्मरतच होतें. म्हणून, इंग्लिश आणि फ्रेंच ह्यांचीं अरमारें १८५३ त आक्टोबरच्या १४ व्या तारिखेस डार्डोनेल्लस-नांवाच्या सामुद्रधुनींतून पलीकडे गेलेलीं होतीं, तीं टर्क्स लोकांचा बचाव करण्यासाठीं काळ्या समुद्रांत शिरलीं, आणि १८५४ त मार्चच्या २८ व्या तारिखेस इंग्लंड आणि फ्रान्स ह्या दोहों राष्ट्रांनीं रशियाच्या विरुद्ध आम्ही युद्ध करणार म्हणून जाहीर केलें.

स्वतंत्र दृष्टया तें युद्ध केलें ही चुकी झाली नाहीं असें म्हटलें तरी, तें युद्ध ज्या रीतीनें चालविलें तींत मनस्वी चुका झाल्या. तें युद्ध मुख्यत्वें, क्रिमीया नांवाचें काळ्या समुद्रांत रशियाच्या दक्षिणेकडून बाहेर वाढलेलें लहानसें द्वीपकल्प आहे, त्यांत झालें. तथापि, पांढरा समुद्र, बाल्टिक समुद्र, आणि अर्मीनिया देशाचा रशियाच्या अमलाखालीं असलेला भाग, ह्यांतही लढाया झाल्या. पांढऱ्या समुद्रांत आर्केंजल नांवाच्या बंदराची समुद्रांतून वेढा घालून नाकेबंदी केलेली होती, आणि रशियन अर्मीनियांत, टर्क्स लोकांनीं जनरल वुइलियम्स नांवाच्या सेनापतीच्या हुकमतीखालीं कार्स नांवाचा किल्ला घेऊन त्याचा शत्रूंपासून मोठ्या शौर्यानें बचाव केला, आणि त्या युद्धाची समाप्ति होण्याच्या समयास मात्र त्यांनीं तो सोडून दिला. फ्रेंच आणि इंग्लिश हे त्या युद्धांत साहाय्यसंकेती दोस्त झालेले होते. ते उभयतां १८५४ त सेप्टेंबरच्या १३ व्या तारिखेस, क्रिमीयामध्यें पोहोंचले, आणि सेप्टेंबरच्या २० व्या तारिखेस आल्मा नांवाच्या नदीवर त्यांनीं आपला पहिला जय मिळविला. ते जर तसेच पुढें दड-

क्रिमीयांतील युद्ध.
१८५४–१८५६.

पून चाल करीत जाते, तर **क्रिमीयामधील सिबास्टोपॉल** नांवाच्या मोठ्या किल्ल्यांत त्यांचा प्रवेश झाला असता. परंतु **फ्रेंचांचा** सेनापति, **सेन्ट आर्नो,** ह्यानें त्या जयानंतर शत्रूचा पाठलाग करीत जाण्याचें नाकारिलें, तेव्हां **इंग्लिशांकडील** सेनापति **लार्ड राग्लान** ह्यानें तो आग्रह सोडून दिला. त्यामुळें **रशियन्सांचा** महासमर्थ इंजनेर **टॉडल्बेन** ह्याला त्या किल्ल्याची मजबुती करण्याला फुरसत सांपडली, त्याकारणानें तें युद्ध एक वर्षाहून ज्यास्त दिवस लांबलें. **इंग्लिश** व **फ्रेंच** ह्या उभय सैन्यांतील शिपायांनीं फार मर्दुमीचें वर्तन केलें. **"लाइट ब्रिगेडचा चार्ज"** (सैन्याच्या एका सुटसुटीत किंवा सड्या तुकडीचा हल्ला) म्हणून जो विख्यात आहे तो **क्रिमीयामध्येंच** १८५४ त आक्टोबरच्या २५ व्या तारिखेस **बालाक्लाव्हा** एथील लढाईंत केला. त्या हल्ल्यांत सहाशें माणसांच्या एका तुकडीनें, तिच्या अमलदाराची वरिष्ठानें दिलेल्या हुकुमाची गैर समज झाली होती तरी, तो हुकूम मान्य करण्याला कांकूं न करतां, **रशियन्सांच्या** साऱ्या फौजेविरुद्ध, म्हणजे निश्चित मूर्तिमंत मृत्यूवरच, शौर्यानें हल्ला केला. पुनः नोव्हेंबरच्या ५ व्या तारिखेस, झालेल्या **इन्करमन्न** एथील लढाईंत, **धि गार्डस** (गार्डदी) नांवाची पलटण हिनें आणि थोड्या इतर **इंग्लिश** पायदळाच्या पलटणींनीं मिळून साऱ्या **रशियन्सांच्या** फौजेला, **फ्रेंचांची** फौज कुमकेला येऊन पोहोंचून जय मिळे तोंपर्यंत, अडवून धरलें होतें. परंतु सेनापतित्व चांगलें नसल्यामुळें मनुष्यांचा प्राणनाश फार भयंकर झाला. नंतर **सिबास्टोपॉल** ह्या किल्ल्याचा फार दिवस चाललेला आणि कंटाळवाणा वेढा सुरू झाला. त्याचें

लाइट ब्रिगेडचा चार्ज, तारीख २५ आक्टोबर १८५४.

काम एका साऱ्या कडक हिंवाळ्याभर चाललें. त्या हिंवाळ्यांत, इंग्लंडांतील गैर व्यवस्थेमुळें शिपायांना कपडालत्ता पुरा मिळाला नाहीं, आणि त्यांना अन्न व इतर जरूरीच्या जिन्नसांचा पुरोठा बिलकूल झाला नाहीं. अन्नसामग्री ज्या ठिकाणीं जमिनीवर उतरतां येण्याची बिलकूल सोय नव्हती अशा ठिकाणीं पाठविली. एक बूटांचें (चर्मी जोड्यांचें) भरताड जहाजांवरून भरून पाठविलेलें तेथें पोहोंचलें, परंतु ते सारे बूट डाव्या पायांचे होते. तशांत बीमारी उत्पन्न झाली, आणि त्या माणसांना वर पडून राहण्याला बुरणूस नव्हते; आणि जे कंत्राटदार घोड्यांना घासदाणा पुरवीत ते गवताच्या गठ्ठ्यांत वजनाकरितां खत भरीत. ही सारी अव्यवस्था आणि ब्रह्मघोळ ह्यांमध्यें एका नावाचें कृतज्ञतापूर्वक स्मरण चिरकाल राहील. त्यावेळीं संग्राम (युद्ध) संबंधी खात्याकडील प्रधान **सिड्नी हर्बर्ट** नांवाचा होता, त्यानें, रोग्यांच्या संगोपनाची कला शिकलेली अशी एक **मिस्स** (अविवाहित) **फ्लॉरेन्स नाइटिंगेल** नांवाची बाई होती, तिला दुखणेकरी आणि जखमी झालेल्या लोकांची शुश्रूषा किंवा संगोपन करण्यासाठीं, **क्रिमीयांत** बायांचा एक समुदाय घेऊन जाण्याला विनंती केली. ती बाई **स्कुटारी** एथील **हास्पिटलांत** (रोगीशालेंत) जाऊन पोहोंचतांच तेथें सर्व गोष्टींची व्यवस्था लागली. जखमांना यथायोग्य प्रकारानें पट्ट्या बांधल्या जाऊं लागल्या, दुखणेकऱ्यांचें संगोपन होऊं लागलें, मरणास टेकलेल्यांचें सुखसांत्वन होऊं लागलें; आणि ह्या वेळापासून कोमल अंत:करणाच्या, आणि

अव्यवस्था आणि ब्रह्मघोळ होतो.

मिस्स फ्लॉरेन्स नाइटिंगेल.

सुशिक्षित, बाया ह्यांनीं, तिचा कित्ता उचलून तरबेत होऊन, यूरोपांतील संग्रामभूमीवर तसल्या प्रकारचें साहाय्य केलेलें आहे.

मध्यावधींत इंग्लंडच्या साऱ्या राष्ट्रांतील लोक क्रिमीयांतून हालअपेष्टेचीं आणि हेळसांडीचीं वर्तमानें येत त्यांनीं फार अधीर किंवा उतावळे होत चालले, आणि राज्यकारभाराचें प्रमुखत्व लार्ड पामर्स्टन ह्यानें स्वीकारलें पाहिजे अशी त्यांनीं मोठी ओरड मांडली. इतक्यांत पार्लमेंट भरलें, तेव्हां लार्ड आबर्डीन ह्यानें राजीनामा दिला, आणि १८५५ च्या जान्युअरींत लार्ड पामर्स्टन हा मुख्य प्रधान झाला. अधिकाऱ्यांना अनुभव येत चालला तसतशा ह्यापूर्वींच सर्व गोष्टी पूर्वींहून बऱ्या चालूं लागलेल्या होत्या. सिबास्टोपॉल किल्ल्याच्या वेढ्यानें काम पुढल्या साऱ्या उन्हाळ्याभर यशस्वी प्रकारानें चाललें. शेवटीं रशियन्स लोक त्या किल्ल्याचे सारे कोट किंवा तट सुरुंगांनीं उडवून देऊन तें शहर सोडून निघून गेले. तेव्हां, १८५५ त सेप्टेंबरच्या ८ व्या तारिखेस सिबास्टोपॉल हस्तगत झालें. पुढल्या वसंतऋतूंत सल्ला झाला, आणि पारिस एथें १८५६ त मार्चच्या ३० व्या तारिखेस ज्या तहनाम्यावर सह्या झाल्या त्यांत रशियाच्या बादशाहानें काळ्या समुद्रांत अरमार ठेवणार नाहीं असें वचन दिलें.

पारिस एथील तह, तारीख ३० मार्च १८५६.

तदनंतर, चीन देशांत युद्ध चालू होतें तें खेरीज करून, इंग्लंडांत थोडे महिने स्वस्थता होती. इतक्यांत एकाएकीं एक भयंकर धक्का किंवा टोला बसला. फारा दिवसांपासून हिंदुस्तानांतील लोकांमध्यें, कांहीं वांट्यांनीं इंग्लिशांनीं पुष्कळ राज्यें खालसा केलीं त्यामुळें, आणि मुख्यत्वेंकरून १८५६ त अयोध्येचें राज्य खालसा केलें

त्यामुळें, असंतोष धुमसत होता. एका विचित्र आकस्मिक योगानें तो असंतोष १८५७ त अगदीं निकरास किंवा आणीबाणीस येऊन पोहोंचला. त्या सालाच्या थोडे दिवस पूर्वी एका नवीन प्रकारची राइफल (एका प्रकारची बंदूक) कल्पनेनें बनविलेली होती, तींत वापरावयाच्या काडतुसांना वरून कांहीं ओशट पदार्थाचें माखण असे, आणि पलटणींतील जे शिपाई **हिंदु** होते, त्यांचा समज, तो ओशट पदार्थ गाईची चरबी आहे, असा झाला, आणि गाईची चरबी वापरणें हें **हिंदूंच्या** मतीं महापातक होय. **मुसलमान** शिपाई होते त्यांचा समज, तो ओशट पदार्थ डुकराची चरबी आहे, असा झाला, आणि डुकराची चरबी त्यांच्या मतीं फार अपवित्र धरलेली आहे. **हिंदुस्तानां**तील सरकारानें तें काडतुसांवरचें माखण काढवून गुळगुळीत कागद वर लपेटविला, परंतु त्यानें त्या शिपायांची समजूत होईना; पलटणींतील अमलदारांनीं त्यांना पुष्कळ बुद्धिवाद करून समजूत करण्याविषयीं प्रयत्न केले, परंतु ते व्यर्थ गेले. **इंग्लिशां**च्या मनांत आपली जात बाटवावयाची आहे असा त्या शिपायांचा दृढ समज झाला. १८५७ सालच्या फेब्रुअरी आणि मार्च ह्या दोन महिन्यांत **बारकपूर** एथें लहान लहान दोन दांडगावे झाले. नंतर कांहीं दिवसपर्यंत सर्व निवांत होतें, परंतु ठायींठायींच्या माजिस्त्रेटांना, एका खेड्याहून दुसऱ्या खेड्याला, त्याहून तिसऱ्याला, अशा माळेनें चपात्या गुप्त प्रकारानें जाऊं लागल्या आहेत, अशा खबरा कळल्या. शेवटीं १८५७ त मेच्या ३ ऱ्या तारिखेस कांहीं पलटणी शिपायांनीं दांडगाई केली, म्हणून त्यांना **सर हेन्री लॉरेन्स** ह्यानें कैद करविलें, आणि मे महिन्याच्या १२ व्या तारिखेस **दिल्लीनजीक मेरठ** एथें शिपायांच्या तीन पलटणी बंड क-

हिंदुस्तानांतील पलटणी शिपायांचीं गाऱ्हाणीं.